१७७२
म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक ऊ. ना. जोशी | सन |
|---|---|---|
| नाटक | १५२ | |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव महादजी शिंदे अर्थात पाटीलबुवा. | |
| २५६ | | |

महादजी शिंदे

अर्थात

# नाटक.

१५२

नाटक



महाराज माधवराव शिंदे, जी. सी. एस. ऐ.

# पाटीलबोवा

अर्थात

# महादजी शिंदे.

( ऐतिहासिक नाटक. )

---

'Drama is the mirror of life'

Shakspeare.

लक्ष्मण नारायण जोशी

विद्यार्थी बॉम्बे व्हेटर्नरी कॉलेज

यांनीं रचिलें

तें

मुंबई येथें

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

---

सन १८९७.

---

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें राखून ठेविले आहेत. )

---

किंमत १२ आणे. ट. ह. १ आणा.

॥ पदातिपतिसैन्यपः स किल निष्ठुरो विष्ठुरो * ॥
॥ युधिष्ठिर इवापभीः समवलोक्य सेनां निजाम् ॥
॥ अरातिभिरुपद्रुतां समनुकूल देवेश्वरै- ॥
॥ र्निरुद्धतृणधान्यकामपससार धीरो बली ॥ १ ॥

१७–२० शिवकाव्ये.

---

* क्यापटन स्टुअर्ट.

सहस्ररश्मी दिवाकराचा उदय झाल्यावर ज्या-
प्रमाणें सूर्यकमल आपल्या प्रसन्न वदनानें
जगाला आल्हाद उत्पन्न करितें, त्या
प्रमाणें ज्यानें स्वामीनिष्ठ, स्वदेशभक्त,
रणबहादर शिंद्यांच्या कुलांत
जन्म घेऊन सर्वजन हृदया-
ब्धी आनंदवीचींनीं
उचंबळून टाकिला
आहे, असे जे
अलिजाबहादर दामइकबालहू राजेश्वर

**महाराज माधवरावसाहेब शिंदे**

त्यांच्या पदकमलीं ग्वाल्हेरच्या गादीचे
संस्थापक जे

**पाटीलबोवा** अर्थात **महादजी शिंदे**

त्यांच्या फक्त आठरा वर्षांच्या
कारकीर्दीचें हें पुस्तक नम्रतेनें
अर्पण केलें आहे.

नम्र सेवक
पुस्तक कर्ता.

# प्रस्तावना.

Freedom's battle once begun
Bequeathed from bleeding Sire to Son
Though baffled of't is ever won

*Byron.*

पांच हजार वर्षांपूर्वी ज्या रणमैदानावर कौरव-पांडवांसारखे वीरशौंड आठराअक्षौहिणी सैन्यासह धारातीर्थी कंठस्नानानें सुस्नात होऊन या भूगोलावरून अदृश्य झाले, त्याच पानिपतच्या रणक्षेत्रीं अठराव्या शतकाचा अर्ध उलटून गेल्यावर अकराव्या वर्षी, ह्मणजे इ० स० १७६१ सालीं हिंदुमुसलमानांमध्यें घडलेल्या घनघोर व शोकास्पद रणकंदनांत, मदोन्मत्त अहंमदशाहादी दुराणी गजांवर डुरकण्या फोडीत गेलेले दक्षिणी सिंहछावे, भाऊसाहेब. विश्वासराव, जनकोजी वगैरे महाराष्ट्रभूंतील वीरमणी अस्तंगत झाल्या कारणानें, महाराष्ट्रीयांवर भयंकर प्रसंग गुदरून त्यांचा स्वातंत्र्य मौक्तिककंठा खळकन तुटला व ते पारतंत्र्याच्या जबरदस्त लोहशृंखलेच्या तडाख्यानें पुरे जखडबंद झाले, असा सर्व भारतवर्षांचा समज होऊन जो तो खरा मराठा दुःखांत गटंगळ्या

खाऊं लागला होता. परंतु तो झालेला समज खोडून काढण्याकरितां ह्मणा किंवा आर्यमातेला आणखी कांहीं दिवस तरी म्लेंछ छलापासून अलिप्त ठेवण्या करितां ह्मणा जगदीशानें त्या घोर प्रसंगातून दोन लाल सुरक्षित ठेविले; व तेंच पुढें, एक **महादजी शिंदे** ऊर्फ **पाटीलबोवा** आणि दुसरे **नाना फड़नवीस** या नावांनीं प्रसिद्धीस आले.

**पाटीलबोवांनीं** आपल्या अंगच्या हिकमतीच्या, मुत्सद्दीपणाच्या व शद्वगांभिर्याच्या जोरावर सर्व मराठ्यांस कांहीं प्रसंगीं, स्वदेश, स्वराज्य व स्वधर्मप्रीतीच्या राक्षसी तृष्णेनें स्वदेशाच्या शत्रूंवर तुटून पडण्याविषयीं कसें उद्युक्त केलें व आडदांड, विद्याशून्य आणि हेकट यवनांस पूर्णपणें पादाक्रांत करून, युद्धकलानिपुणतेचा टेंभा मिरविणाऱ्या **इंग्रजांना** सुद्धां कांहीं प्रसंगीं 'त्राहि भगवन्' करून सोडिलें, वगैरे गोष्टींचें प्रकृत स्थलीं हुबेहुब चित्र वठविण्याचा यथामती प्रयत्न केला आहे..

मोठाले सरदार आपलपोटे बनल्याकारणानें पेशवाईचा कमजोर झाला असतांही तिला पुन्हां पूर्व स्वरूप देऊन आपला कीर्तिध्वज दिगंत अमर फडकत रहावा ह्मणून ज्या युद्धकलानिपुण मराठ्यांनीं अकांडतांडव करून हयात असेपर्यंत पर-

कीयांनां क्षुद्रवत् मानिलें, त्यांचें हें प्रस्तुतचें चित्र पाहून, भरतभूमीचा खरा अभिमान बाळगणाऱ्यांच्या आंगांतलें रक्त वीरश्रीसंचारानें खवळून जाऊन, त्यांच्या पूर्वजांनीं शत्रूचें पारिपत्य करून मराठी साम्राज्य प्रस्थापित करण्याविषयीं केलेल्या अचाट प्रयत्नांचा हुबेहुब देखावा त्यांच्यापुढें उभा राहिला व आपल्या सद्यःस्थितीविषयीं जागृत होऊन नेत्र भरून त्यांनीं ऊष्ण दुःखाश्रु टाकिले ह्मणजे माझ्या कृतीचें चीज झालें असें मी समजेन.

प्रकृत पुस्तकांत पानिपतच्या रणकंदनानंतरच्या पळापासून वडगांवच्या तहापर्यंतच्या ( Convension of Vergaon ) आठरा वर्षांच्या **पाटीलबोवांच्या** कारकीर्दीचा इतिहास गोंविला आहे.

या तहा नंतर कांहीं कारणामुळें **पाटीलबोवांची** स्वामीसेवा क्षयकारी होऊन ते इंग्रजांचे जे कट्टेवैरी होते ते पक्केदोस्त झाले. ही विलक्षण हकीगत जगापुढें याच तऱ्हेनें आणणें अत्यावश्य आहे; परंतु हें पुस्तक लोकादरास पात्र झालें ह्मणजे मग तो भाग मी सूज्ञांपुढें ठेवीन.

प्रकृत पुस्तक लिहितांना मी जुन्या बखरी, हिंदुस्थानांत प्रवास करीत असतांना मिळालेली

माहिती, कांहीं पार्शीभाषेंतलीं हस्त लिखितें कागदपत्रें, सद्यःकालीं उपलब्ध असलेले मराठ्यांचे इतिहास वगैरे बऱ्यांचाच उपयोग केला आहे. नूरजहानची हकीगत ज्या माहितीच्या आधारें या पुस्तकांत घातली आहे, ती पार्शी भाषेंत लिहिलेली असून अती त्रोटक आहे; व त्या लगतची इतर माहितीचीं पृष्टें अर्धवट मिळालीं आहेत. त्यांचा पूर्ण तपास लागल्यावर ( बहूतेक लागला आहे ) लवकरच जशीच्या तशीच मराठी तर्जुम्यांत प्रसिद्ध करण्याचा इरादा आहे.

कृत्यारंभीं सुमुहूर्त मिळून त्याचा शेवट गोड झाला ह्मणजे त्याच्या कर्त्याला धन्यता वाटते. प्रस्तुत पुस्तक छापण्याला कुमुहूर्त लागून त्याचा शेवटही कडूच झाला असें ह्मटलें पाहिजे. कारण हें पुस्तक वास्तवीक मार्चारंभीं आगाऊ वर्गणीदारांच्या हातीं पडावयास पाहिजे होतें; परंतु ग्रंथिक सन्निपात ज्वरानें त्रेधा उडवून दिल्यामुळें, सर्व गोष्टींची ह्मणजे, पुस्तक छापण्यास लागणाऱ्या सर्व साहित्याची महर्गता झाल्यामुळें बरीच अशुद्धें राहिलीं आहेत. तरी जेथें अतीच घोंटाळा झाला आहे अशा ठिकाणचें शुद्धीपत्रक मात्र पुस्तकास जोडिलें आहे. अशा तऱ्हेचें पुस्तक लोकांच्या हातीं

देणें जरी इष्ट नाहीं. तरी, 'अगाऊ वर्गणी घेऊन आह्माला फसविलें' हा आरोप लादून घेण्यापेक्षां नाइलाजानें दिवस जास्त लागले ह्मणून क्षमा मागून, असेच ग्राहकांच्या हातीं देतों.

या पुस्तकाची लेखी तीन अंकाची प्रत कै. प्रो. वा. बा. केळकर व पांच अंकाची रा. सा. ना. गो. फाटक सबजज्ज यांनीं तपासून दिली, याबद्दल पुस्तक कर्ता त्यांचा अत्यंत आभारी आहे. परम मित्र रा. ग. के. केतकर यांनीं या पुस्तकाची छापण्यास योग्य अशी लेखी प्रत लिहून दिली याबद्दल पुस्तकर्ता त्यांचाही फार आभारी आहे.

आतां शेवटीं सांगायचें एवढेंच कीं, या पुस्तकाची रचना रंगभूमीवर प्रयोगाकरितां मला जशी सोयस्कर वाटली तशी मी केली आहे. त्यांत ज्या चुका असतील त्यांचा दोषी बेलाशक मला ठरवून जेवढा भाग ग्राह्य दिसेल तेवढाच वाचकांनीं ग्रहण करावा अशी त्यांस माझी विनंति आहे.

पुस्तककर्ता.

# शुद्धीपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४ | १ | लाटांमध्यें | लोटाबरोबर |
| ५ | ७ | करितो.) | करितो. तो धरून.) |
| १० | १२ | कलेजे की | कलेजेकी |
| ३१ | ८ | चारवय | पोरवय |
| ३२ | २२ | जहागिरी | जहागीर |
| ४५ | १७ | प्रथापित | प्रस्थापित |
| ५५ | १६ | जाण्यास सांगितलें, | जाण्यास त्यांस सांगितलें. |
| ५७ | १४ | नाहींत | नाहीं. |
| ६१ | ५ | सोडवून | सुटून |
| ६५ | १२ | कोणच्यानू | कोणच्याना |
| ६६ | २० | जागा | जागीं |
| ६९ | ९ | उपरायमान | उपटायमान |
| ७० | १ | हुळुके | हुळुळे |
| ,, | २१ | घ्यावें. | द्यावें. |
| ७९ | ४ | सांगत | सांगते |
| ,, | ७ | पत्रें | पत्र |
| ,, | ११ | खडकाचा | खडगाचा |
| ८० | १८ | संबंध ! | संबंध पुरे ! |
| ८१ | १४ | दावाग्नीचा लोळ | दावाग्नीचा प्रचंड लोळ !! |
| ,, | १७ | हृदयार्सी | हृदयाशीं |
| ८३ | ६ | सहाह | सलाह |
| ८४ | ३ | बदनके | बह्यनके |
| ,, | ४ | चितन | सितन |
| ,, | १९ | कह्य | कह्यल |
| ८८ | १३ | तूं तोरसे | तूं इस तोरसे |
| ,, | १६ | धडके | धेडके |
| १०७ | ९ | तंषय | संषय |

# नाटकांतील पात्रें.

सवाई माधवराव.........( पेशवे )

रघुनाथराव दादा.........( त्यांचे चुलत आजोबा. )

नाना फडनवीस. }
सखाराम बापु. } ......( पेशव्यांचे मंत्री. )

हरिपंत तात्या फडके. }
भिवराव पानशे. } ( पेशव्यांचे लष्करी अधिकारी )

पाटीलबोवा. ............( पेशव्यांचा एक जाडा सरदार )

तुकोजी होळकर.........   ,,   ,,

मानाजी फाकडे.........( पाटीलबोवांचा नातेवाईक. )

राणाखान................( ,, मित्र. )

गंगाधर यशवंत..........( मानाजीचा कारभारी. )

अन्नपूर्णा. }
पार्वती. } ............(पाटीलबोवांच्या विवाहित स्त्रिया.)

नूरजहान. ................( इंग्रजांची हेर. )

गिरजा. }
मैना. } ................( दासी. )

अहमदशहा अबदली, आनंदगीर, नारोभगवंत, गुलामकादर, इष्टुरफाकडा, फारमर, भिल्ल, हेर, शिपाई, सैनिक, नांगरे, कुळकर्णी, महार, पवाडेवाले वगैरे इतर पात्रें.

# पाटीलबोवा



श्लोकार्ध.

उपजला तरि तोचि मला गमे
कुल समुन्नति ज्यास्तव घे रमे.

वामन.

# पाटीलबोवा

अर्थात

# महादजी शिंदे नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

स्थलः—पानिपतनजीकचें नदीकांठचें जंगल.

पात्रेंः—सरदार राणाखान भिस्त्याच्या वेषानें. प्रवेश करितो.

राणाखानः—हाय हाय! कैसी ये हमारी कमतरीन हालतहै! हायरे परवरदिगार! जिस रावसाहाब आपासाहाब सरीखे रनसूरोनें छतरपति शिवाजी महाराजने लगाये हुये हिंदु धरमके दरखतको, पानीडारके बढाया और आपने मालिककेसाथ नेकीका झेंडा कायमका फडकता रखा, और रणमैदानके बीच आपनी समशेर गजवाके दुष्मनोको नामोहरम करना यहि आपना पेशा और रणमैदानमे नेकी न कमाते भगज्याना

यह वडा नाहिंजारका काम है ऐसा समजतेथें,
ऐसा होके यह मेरा बदन जिनके समशेर बहादरीके
करतवसे दुष्मनोकी आखर होनेसे आजदीन तखके
इसतऱ्हांके आराममें वडगया, वोहि मय लडाईके
भीतर आपने मालिकलिये विनाज्यानकी आखर
करते इस्तोर भिस्तीका लिवाज लेके भगजाके
यह ऐसा कालाहुवा मू लेके घरकोबताने जाताहूं,
इसलिये छतरपति महाराज शिवाजीके और उन्के
साथकी ज्यानीदोस्त मदत्गारसरदारोके दिलमें
बेहस्तमे कितना सोंच होता होगा ! बस्स आफ्
सोस है मेरे लियानतको ! अरे कमअक्कल रानाखान!
तेरी मालिकके होकमूकी तामील बजानेकी नेकी
किधर ज्यातीरही ! खुद्द आपने मालिके तरफ्की
इसतोरकी कमतरीन हालत हुइ होके, तेरे दिलमे
घुसेवन करोल इंगार जमाके जिस बदखतर मुसल-
मीनोनें तेरे सेनापती भाऊ साहाबको इसजमीके
फानिमेंसे बेहस्त पहूंच्या दिया, उन कमजाद मुस-
लमीनोकी खवर लेनेकेवास्ते कमरबंदमे बंधी हुयी
यह समशेर एकदम म्यानमेंसे बहार खेंचके उन्के
वदनपर मर्दुमकीसे दौडके ज्याके उन्के सर धडसे
जुदे करनेके छोडके, उलटा रनमैदानसे हायहाय
करते यह कोयले मुवाफक बनाहुवा मू आपने
मा बेहेनको बतानेके वास्ते चलाहै । थू थ, है तेरे

जिंदगीपर! हायरे नामर्द! तेरी औरत और कबीला घरको ज्यानेकेबाद तुजको क्या कहेंगे! (ऐकलेंसें करून) अरे यह इधरके नालेमे क्या गिरगया! और यह घोडा किसका तडफ्डता है! क्या होगा भलाये? ज्याके देखनातोसै? ( जातो व महादजी नाल्यांत पडलेला परंतु सावध आणि सखेदाश्चर्यचकित मुद्रेनें चहूंकडे पहात असतां पडदा उघडतो. )

पाटील:—अरे रेरेरे!!! मेलोरे मेलो? ईश्वरा खरोखरच तूं मला माझ्या कृतघ्नपणाबद्दल योग्य शासन दिलेंस. अहाहा! काय माझे शौर्य. नपूंसका आतां जिवंत राहून अक्षय लोकांनीं बोटें दाखवून कृतघ्नपणा केल्यामुळें मनाला होणाऱ्या दुःसह यमयातना सोशीत, व अपजयापासून आलेली काळोखी आणि या नाल्यांतल्या चिखलानें जास्त काळें झालेलें हें द्विगुणीत कृष्णवदन लोकांना दाखवून आपलें आयुष्य कंठणारना? नीचा! स्वामीघातका ज्या तुझ्या रणबहाद्दर मराठेभाईबंदवीरांनीं स्वधर्म व स्वदेश रक्षणाच्या भयंकर राक्षसी तृष्णेनें आपल्या प्राणाचे बळी त्या पानिपतच्या घनघोर संग्रामरूपीं रणयज्ञांत दिले, त्यांतच तूं आपल्या प्राणाची आहुती दिली असतीस तर खरोखर तुला मुक्ति मिळून स्वामीकार्यी इतर एकनिष्ठ वीरांबरोबर यानेंही आपला देह अर्पण केला

अशी तरी कीर्ती झाली असती ! धिःकार ! धिःकार असो मला ! अहो शिखानष्ट संहारक मत्प्रियदेशबांधवहो ! खरोखर हा अधम तुह्मां चकाकणाऱ्या हिऱ्यांच्या खाणींत एक चुकून गारगोटीच निपजला ह्मणून खिन्न वदनें करून बसलां असाल ! केवढा हा मी कुलांगार ! शिव ! शिव !! काय हें. आज इतकीं वर्षें या माझ्या शरीरांत म्लेंछ निर्दालनार्थं उकळ्या फुटत असलेलें रक्त व शौर्यमदानें ताठून गेलेले बाहू ज्यांनीं आजपर्यंत कित्येक गजतुल्य विरानां छाटून जमीनदोस्त करून टाकिलें ते एका दीड प्रहरांत अगदीं थंडे पडले व त्यांची स्वधर्मरक्षणाची व या नीच यवनानां या भरतभूमीवरून पिटाळून लावण्याची ईर्षा व हुरूप पार नाहींशी झाली अँ ! धिःकार ! धिःकार असो मला, हर ! हर ! काय हें, कोण हा माझा अधमपणा व शिवछत्रतींची मानहानी ! आतां असें वाटतें कीं, या नाल्याला एकदम मोठा पूर येऊन हें मद्ध झालेलें निरुपयोगी शरीर जर त्याच्या प्रचंड लाटांमध्यें वहात जाऊन एखाद्या खडकावर आपटून छिन्नविछिन्न होईल तर फार बरें ! ( राणाखान येतो त्यास पाहून ) अरे हा कोण ! एका लांडग्यानें मला वार करून या नाल्यांत पाडिलें व बेशुद्ध करून

टाकिलें ! त्यांतून जरासा शुद्धीवर येतो न येतो तोंच ही दुसरी लांडी व्याध तयार ! काय माझें नशीब माझ्या हात धुवून पाठीस लागलें आहे तरी ! ये इकडे तर ये, जवळ आलास कीं या खंजिरानें तुला धडावेगळा केलाच समज ! ( राणाखान पुढें आल्यावर त्यावर जंबिया घेऊन उठण्याचा प्रयत्न करितो )

**राणाखान**–अबे रनसूर सिपाहि, ये क्या करता है ? नाहक दूसरेकी ज्यान लेके सरके उपर बदीका बोजा लेना तुमको किसतौर मंजूर होताहै ? मै और तुम एक हूं !

**पाटील**–(आपल्याशीं)अरे मला हा उपदेश करणारा माझ्या सारखाच अधम, नीच, घातकी, असा दुसरा कोण आहे बरें. मला इतका वेळ वाटत होतें कीं मी एकटाच कायतो कुलांगार असेन,पण नाहीं ! आणखी देखील कांहीं माझ्यासारखे स्वामी हत्येचें पातक शिरावर धारण करणारे आहेतच ! हर ! हर ! ! ईश्वरा, तुझी लीला अगाध आहे. ( संतापून ) अरे चांडाळा तूं कोण आहेस !

**राणाखान**–नहीं ! नहीं ! सिपाहि बावा, मै तुमारेही तरफका एक मुसलमीन भिस्ती हूं ? और मुजको रानाखान कहते है ! देखो किसमतका नविस्ता बडा अजब् है ! दिलके बेकरा-

रीसे और घुस्सेसे चारो तरफ बद्यकाये हुये इंगारसे तुमारे दिलकी तौर जो कभी कजाने घेर लियी है. तोभि हरवख्त गमखाना यह बात दिलमे लाके तुमारे दिलका ऐसा समझ होगाके उतावले दिलसे कुछभी होनेका नही ! ( पायावरची जखम पाहून ) हाय ! ए कितनी भारी जखम लगी हे ! ( जखम बांधूं लागतो )

**पाटील**—भाई ! अब उस जखमको काह्यके लिये बांधता है ? यह मेरे कलेजेपे हुवे जखमको इस खंजरसे जियादी बढाके, यह निकंमे और बहोत थोडे जीके रहेले आशनाको एकदम बंद कर दे ! बातको फिर तेरे इस् अह्यसानकेलिये दुसरे जिंदगीमे मै तेरा बहोत सरफराज बन जाउंगा.

**राणाखान**—सिपाहिबाबा ! मै तुमको यकीन कहता हूं के, खुदाने तुमारी ज्यान बचाई है, इसमे कुछ तोभी इस्के दिलकी आशना होगी ! वास्ते मै कहता हूं के, तुम् अपने दिलको जो कभी थोडे बिच्यारसे ठिकनपे लावोगे तो बने हुये आफतके लिये क्या करना, ये तुमारा तुमारे दिल्कोही समजमे आवेगा.

**पाटील**—अब मेरे हाथसे क्या होनेका है ! मै इसतोरका कम तखदीर इनसान ! मुझसे जानवर बहोत अच्छे ! रानाखान ! यह बने हुये गमगीन

और कठन करतबका बदला लेके मै अपने बाप दादोंके अफसोससे अलग बनजाऊंगा ऐसा तुमारे दिलमे आता है क्या ?

**रानाखान**–बेषख्, मेरे दिलको इस रुबाबको देखके ऐसा यकीन हुंवा, इसलिये मेने तुमारा हात उपरसे पकड लिया ! इसालिये मै कहता हूं के आप मेरेसाथ मेरे बैलके उपर बैठके चलो.

**पाटलि**–आछीबात है ! तुमारे मर्जी मुवाफक मै कुबूल हूं ! मगर, वो मेरा दिलका साथी जानवर किधर है ? हाय हाय !! वो देखो उदर किसतोर पडा है ! ( आत्मगत ) अरे इमानी प्राण्या तूंच ना मला त्या रणभूमीपासून वांचवून एथपर्यंत आणलेंस ! खरोखर तुझ्या सारखी इमानी घोडी आतां मला पुन्हा मिळणार नाहीं. ज्याप्रमाणें माझे पूर्वज माझें हें लाजिरवाणें तोंड पुन्हा दृष्टीस पडणें नको ह्मणून स्वर्गीं आपले डोळे घट्ट मिटून बसले असतील त्या प्रमाणेंच तूंही आतां या कृतघ्नाचे मुखावलोकन करणें नको ह्मणून हा लोक सोडून परलोकची वाट धरलीसना ? अरे विश्वासू प्राण्या, तुझ्याच जोरावर आजपर्यंत मी कित्येक शत्रूंचे कंठ छेद केलेना ? माझ्या लाडक्या जर त्या वेळीं तूं नसतास, तर त्या रणकंदनांतून मी एथपर्यंत जिवंत आलो असतो कां? ( उघड ).

खैर रानाखानभाई ! आब चलो एक वख्त मेरे इस दिलज्यान घोडीको आखरकी नजरसे देखके उसूका बोसा लेके बाद चले जाएंगे.

प्रवेश पहिला समाप्त.

## प्रवेश दुसरा.

**स्थल:**—पानिपतचें रणमैदान.

**पात्रें:**—( अहमदशहा अवदल्ली विश्वासरावाचें प्रेत मांडीवर घेऊन बसला आहे व त्याचा एक सरदार गुलामकादर आणि नारोभगवंत व उमरावगीर गोसावी बाजूला उभे आहेत, असा प्रवेश उघडतो. )

**अहमदशाहा**—हायरे परवरदिगार ! इसतोरका ये खुबसूरत पुतला के, जो अपने खुबसूरतीसे सिछन्सित्वन्सेभिआला, और दुनियाके पडदेउपर अपने मर्दुमकीका उजियाला पाडनेवाला चमकसे भरा हुवा तजेलादार दूसरा सुरजही अल्ला तुने पैदा किया होके, इस तऱ्हांके यह जवान नजाकती बदनके उपर हामारे यह दगाबाज, कमतरीन, करडे मुसलमीनोकों हल्ला करनेकी उफलत दियी ! जिन कमजादोनें यह इसतौरके कमाल नजाकती गुलके मुवाफ़ुक बदनके-उपर हल्ला करके उसीके दिलज्यान प्यारे और-

तके दिलरमानेकेचमनके उपर आफत डाली, और उस्के जिंदगीको बरबाद कर डाली, उस खानदानी गुनभरी लियाकतवान नाजनी परीने इस तोरकी अफलागकी कजा आपने सरके उपर पडेली हवाल सुनते हम दगलबाज, बदख्तर मुसलमीनोको दिलसे काह्यल होके हाजारो गालियाके कोरडे खेंचके किस तऱ्हां दिलकी बेकरारी किई होगी ?

**गुलाम**—गरिबनूनवाज ! जो हुवासो अछा हुवा है ! क्योंके इन मरेठोनें आजदीन तख्के हमको बहोत सताया, और तकलीफ उठाने लगाया, उसके लायक बदला खुदाने उन्को दिया, उस्मे क्या बुरा हुवा है ? सरकार, आपने फौजमे बडे-बडे लढव्हये रनसूरसरदार सिपाही के, जो एक वख्त् रनमैदानमे आपने मर्दुमकीसे करडा आवाज करने लगे के, इन मावलोंकी तबियत घबरा जातीथी, हाथमेके हतियार फेंक देके चारों तरफ भग जातेथें, वोहि यह मावले दो चार लढाईमे उन्की सरसी होनेसे इत्ने मगरूर होगये, और शेखी बताने लगे, हम्को निकंमे समजने लगे, यह बात खुदाको किसतोर मंजूर होगी ? सरकार; मै इस लिये कहताहूं के, आप आपनेदीनको बढानेके लिये तहाजिंदगी तकलीफ उठानेका यकरार

किया होके, दुष्मनकी इस्तोर तारीफ करते बैठते हो, और हम्को नाहक खामी देते हो !

**उमरावगीर**-अय् नामर्दो !! ऐसेहि तोरसे तुम् अपनी मर्दुमकी गजवाके अपने रनसुरीसे नियतका निशान फडकावोगे ? अबे इसतऱ्होंके यह कमतरीन विचार तुमारे दिलमे किस्तौर आता है ? कैसा तुमारा पथर सरीखा कठन कलेजा है ? मुझे यकीन है के, जो कभी आज तुमारी फत्ते हुयी है, और हम मरेठोंको पुरा तडाखा बताया है, तोभी इस्के आगे तुमारे दिलमे इस तऱ्होंके कमतरीन सलाह्को ठिकान देवोगे और इसतोरकी पथरके कलेजे की करतबगारी करोगे, तो यकीन है तुमको अब फिरसे तुमारी बिना फत्ते होते, दोजखमेके तमाम किडोंसे भरेहुवे मैलोंके खाईको हासल करना पडेगा. इसलिये कहता हूं के, जो कुछ करनेका होगा सो बिना यकीन छोडते खुदाको प्यारसे मंजूर होगा ऐसाहि करना चाहिये. क्यौंके खुदाको सब इनसान सरीखे है, और किसीको वो जुदाई करता नही; वास्ते कहताहू् के, खुदाने मेहर करके आपकेपास इनसानका जो कुछ थोडा अखत्यार रखा है, उसे जो कभी आप फेंक देंगे और कमतरीन बदकारी करने लगोगे तो फेर कैसा होगा ?

यकीन है के, हम आपके दुष्मन तो है; मगर खुदाने बडे तकलीफ़से बनायी हुयी इनसानकी मूरता जो कभि आप फक़्त दुष्मनीसे बरबाद करने लगोगे तो परवरदिगारकी आपके उपर करडी नज़र होनेकी नही क्या ? हायरे भगवत्, तेरी यह करामत तमाम ख्यालमे आईके जानकी तोर बडी चलाख होके, एक पलख तोभि चेन-तरावटमे ज्यान बहक रहती है, और आराम पाती है. जिस शहजादोने फुलोंकी बिछायत करके दिल रमानेके लिये मेहेलमे हामेषा इष्कका मजा लेते खबसुरत उमर लायक औरतकेसाथ रतन जडावके पलंगपर आरामसे निंद लेना, वोहि यह बिसवासराव अबतक् जिस्के मूपर मूछ निकली नही, इसतोरके यह आला खबसुरत गुलरूने तुमसरीखे करडे, हटेले मुसलमीनोकेसाथ अपने देसके और धरमके आशनासे चढायीं करने खातर रनमैदानके बीचमे आके, वोहि बिछोनेपर निंदलेना क्या ? किसतोरका ये गजब ? हूज़ूर, अब यह मुरदा मेरे हावाले करदेना, फिर हमारे धरमके मुवाफक मै आखरका इतला कर डाल-ताहूं !

**अहमदशहा**—नहि, यह खुबसुरत पुतळा जो कभि लडाई होनेके पाहिले मेरे नज़र आता, तो

एकदम उस्को जिंदा पकडके आपने कंपूमे चला जाता. फिर सब दखन मेरे आख्त्यारमे आगयीथी ! मगर अब कोनसा इलाज़ है ? आय परवरदिगार, तूं बडा रेहम्वाला, झूटेका नाम्भि तेरे पास नही, और सब इनसानोपे सरीखी रेहम करनेवाला, होके ये ऐसा दिल्मे हाय हाय, पैदाकरनेवाला मोहरा, सब सरदार रनसूर मरेठोंका कलेजा, और हिंदुओके रियासद्का सिरताज यह दुनियामेसे उडाके बेहेस्त पहुंचानेकी आशना हामारे लोगोंके दिलमे कैसी पैदा किई ?

**गुलाम**—खुदावंत, पहिले लढाईके भीतर दुष्मनोकी औरता बचे और दुसरे कहिएक मर्द आपने तावेमे मिलगये है, उन्का क्या करनेका, उस्का हुकूम होना.

**अहमदशहा**—पहिले वो रहिनेदे, ऐसाहि चला-जा, और जिस्ने यह गुलाबके फूलको जबर-दस्तीसे गिराके बरबाद किया उस्का तलाश लगाके इस घडीको इस्को मेरे रूबरू ले आव. फिर वो कभी मेरा पिसर होगा तोभि बेहेतर है, उस्को जल्दलाके मेरे साम्ने खडा कर, बाद उस्को यह शेरके नखोंसे छीलके, उस्के बदनके टुकडे टुकडे कर डालताहुं; ज्या, जल्द ले आव, नही तो तुम सबको तोफके मूसे बांधके उडाताहूं. चल

निकल जाव. ( गुलाम जातो. ) . वाहव्वा ! यकीन जिसतोर अफलागमे चांदनीया षमाकेमूजब चमकती है, लेकिन् उस्मे एकही बडा मेहताब आपना धीमा उजाला च्यारोतरफ फैलाता है उस् मुवाफिक दुष्मनोके सब फौजके जमावमे यह इतनाहि लाल आपने उजालेसे चूमकताथा, सो नामोहरम होनेसे सब जाग्य च्यारोंतरफ आंधेरा बनगया है.

**नारोभगवंत**—बादशहा, अब इस दिलदार नीयतवालेके वास्ते कितना अफसोस करोगे ? आब चाहेसो करो मगर एक वख्त हवामे हवा मिलगई, फिर वो पहिले मुवाफिक जुदी किसतोर नझर आवेगी ? वास्ते कहताहूं के यह मुरदा मेरे हवाले करदेना बाद उस्का आखरका मामला हमारे धरम रिवाज मुजब कर डालताहूं, अब इस सुरजका अजवाला आखरका जाता रहा, सो अब फिर कभी नझर आनेका नही.

**अहमदशहा**—नही, इसमेरे दिलजान शहजादेको मै आपने पाससे कभी दूर करनेका नही. इस्के पेटमे घांस भरके हामेशा मै आपने पास रखा करुंगा.

**उमरावगीरः**—हुजूर ! अब यह् मट्टी पास रखनेसे कौनसा फायदा है ? हामेशा आपके पास् रख्यनेसे आपके दिलकी हालत दिवाने मुवाफ़क होके आपका अनाजभी चलनेका नही, वास्तें

एकदम उस्को जिंदा पकडके आपने कंपूमे चला जाता. फिर सब दखन मेरे आख्त्यारमे आगयीथी ! मगर अब कोनसा इलाज है ? आय परवरदिगार, तूं बडा रेहमूवाला, झूटेका नामूभि तेरे पास नही, और सब इनसानोपे सरीखी रेहम करनेवाला, होके ये ऐसा दिल्मे हाय हाय, पैदाकरनेवाला मोहरा, सब सरदार रनसूर मरेठोंका कलेजा, और हिंदुओके रियासद्का सिरताज यह दुनियामेसे उडाके वेहेस्त पहुंचानेकी आशना हामारे लोगोंके दिलमे कैसी पैदा किई ?

**गुलाम**—खुदावंत, पहिले लढाईके भीतर दुष्म-नोकी औरता बचे और दुसरे कहिएक मर्द आपने तावेमे मिलगये है, उन्का क्या करनेका, उस्का हुकूम होना.

**अहमदशहा**—पहिले वो राहिनेदे, ऐसाहि चला-जा, और जिस्ने यह गुलाबके फूलको जबर-दस्तीसे गिराके बरबाद किया उस्का तलाश लगाके इस घडीको इस्को मेरे रूबरू ले आव. फिर वो कभी मेरा पिसर होगा तोभि बेहेतर है, उस्को जल्दलाके मेरे साम्ने खडा कर, बाद उस्को यह शेरके नखोंसे छीलके, उस्के बदमके टुकडे टुकडे कर डालताहुं; ज्या, जल्द ले आव, नही तो तुम सबको तोफके मूसे बांधके उडाताहूं. चल

निँकल जाव. ( गुलाम जातो. ). वाह्‌वा ! यकीन जिसतोर अफलागमे चांदनीया षमाकेमूजव चमकती है, लेकिन्‌ उस्मे एकही बडा मेहताब आपना धीमा उजाला च्यारोतरफ फैलाता है उस्‌ मुवाफिक दुष्मनोके सब फौजके जमावमे यह इतनाहि लाल आपने उजालेसे चूमकताथा, सो नामोहरम होनेसे सब जाय च्यारोतरफ आंधेरा बनगया है.

**नारोभगवंत**—बादशहा, अब इस दिलदार नीयतवालेके वास्ते कितना अफसोस करोगे ? आब चाहेसो करो मगर एक वख्त हवामे हवा मिलगई, फिर वो पहिले मुवाफिक जुदी किसतोर नझर आवेगी ? वास्ते कहताहूं के यह मुरदा मेरे हवाले करदेना बाद उस्का आखरका मामला हमारे धरम रिवाज मुजब कर डालताहूं, अब इस सुरजका अजवाला आखरका जाता रहा, सो अब फिर कभी नझर आनेका नही.

**अहमदशहा**—नही, इसमेरे दिलजान शहजादेको मै आपने पाससे कभी दूर करनेका नही. इस्के पेटमे घांस भरके हामेशा मै आपने पास रखा करुंगा.

**उमरावगीरः**—हुजूर ! अब यह्‌ मट्टी पास रखनेसे कौनसा फायदा है ? हामेशा आपके पास रखनेसे आपके दिलकी हालत दिवाने मुवाफ़क होके आपका अनाजभी चलनेका नही, वास्ते

कह्यताहूं के, आपने हामारे गुजारिषको कुबुल करना.

अहमदः—गुसांई ! तुमारा कह्यना सब यकीन है; मगर तुमने च्याह्य इतनी गुजारिष कियी अगर्च्य कोशिष कियी तोभि मै इस गुल्को तुमारे कब्ज कबी देनेवाला नही. यह मुरदा मै आपने मुल्ख ले जाउंगा.

उमरावगीरः—हुजूर ! आप क्या कह्यते हो ? पुरा विचार करो ! मै यकीन कह्यता हूं के यह मुरदा मै आपने तरफ ले जाइंगे इस्मे बिलकुल षख नही ! इस् मुरदेके वास्ते मेरे बाकी रहेले देडसो गुसांईके साथ यह नारोभगवंत और मै उमरावगीर दोनो सिपाईके बच्चे, तुमको, तुमारे सब आफसर और लष्करके साथ जंग करके सबकु बिना दोजख पहुंच्ये दिये, यह मुरदा इस जायसे कभी न हिलाने देउंगा ! मारेंगे अगर्च्य मर जाइंगे ! यही हमारा यकरार है ! फिर कहिये आपना क्या कहना है ?

अहंमदशहाः—देखो इसतोर करारपे आनेकी कुछ जरुरी नही है. अब मेरे हातसे तुमारा कुछ भी होनेका नही. वास्ते तुम इसतौर जान लेनेके और गमानेके वास्ते क्यौं तयार होते हो ? यह् इस् गुल्का मुरदा समालो, और आजके आज

इस्की आखरकी वासदा लगावो. मै अब् कंपूमे ज्याके इस्के आखरके कारभारके वख्तको तीनसो तोफकी सलामी देनेका होकूम् करता हूं, और मैभि उस वख्त वहांपे हाजीर रहुंगा. आप कंपुमे ज्यानेके बाद एक म्याना और उम्दा लिवाज् भेज देता हूं. वो इस्के बदनपे चढाके इस्को जलादेना.

**उमरावगीरः**–वाहवा ! आप जातके मुसलमीन होके, दिलकी कमाल आश्नासे रहेम बताई, इसलिये आपके उपर आफलागमेसे परियोके हातसे फूलके गोटे गिरिंगे इस्मे बिलकुल शक नही.

**अहमदः**–बहोतखुब ! आब मै चला जाताहूं और कहे मूजब सब चिजें भेज देता हूं !

**उमरावगीरः** जैसी आपकी मर्जी. ( अहंमदशाहा जातो. ) नारोभगवंत, आपण हें प्रेत तर मिळविलें: आतां याचा ठरल्याप्रमाणें प्रेतविधी उरकून, पाटीलबोवांविषयीं चवकशी करून नंतर पुण्याचा रस्ता सुधारायचा ! कसेंकाय ? असेंचना ?

**नारोभगवंतः**–आपलें ह्मणणें मला कबूल आहे.

( पडदा पडतो. )

प्रवेश दुसरा समाप्त.

## प्रवेश तिसरा.

स्थल—आडरान.

( अन्नपूर्णा व तिची दासी गिरजा एका झाडाखालीं बसल्या आहेत. )

**अन्नपूर्णाः**—माझ्या प्रालब्धाची आतां मात्र सीमा झाली ! देवा मी तुझा असा अपराध तरी कोणचा केला होता कीं, त्यांची व माझी त्या, नकोगबाई अंगावर शहारेच उठतात. काय मेल्यानीं आमच्या हिंदूच्या सुरेख सुरेख बायका पोरं, दासी, दास करून काबूल कंदाहारला नेलीं व बाकीच्यांचे रांगेनं उभे करून सपासप शिरछेद केले. खरच गिरजे, त्यावेळीं तो उमरावगीर आपले नारोपंत व तो आपला शिपाई मल्हारी जर तिथें नसते तर आपली ही इतरांच्या सारखीच स्थीति झाली असती नाहीं ? गिरजे विश्वासरावांनां गोळी लागल्यावर महातानें सैन्याचा धीर सुटूनये ह्मणून तें प्रेत हातांत बंदूक घेतलेलं हौद्याशीं रेशमी रशीनं कसं चातुर्यानं बांधून ठेविलं होतं तें-ही तूं बघितलं असशील ! कितीतरी बाई आमच्या लोकांचा धोरणीपणा व समयसूचकता. ही ! काय ग, पुढें त्या अहमदशहा दुराणीनं हत्तीला व महाताला ठार मारून तें प्रेत आपल्या लोकांनां नीट जपून ठेवण्याकरितां सांगितलं त्यांत त्याचा

काय बरं हेतू असेल, अथवा त्या दुष्टाच्या मनांत त्या मृत शरीराचे हाल तर करायचे नसतील ना ?

गिरजाः-बाईसाहेब आतां त्या गोष्टींचा विनाकारण शोक करण्यांत अर्थ तो काय ? आपल्याला आपल्या मालकांची काय दशा झाली आहे त्याबद्दल अगोदर शोध नको का करायला.

अन्नपूर्णाः-तें तरी कशाला पाहिजे आतां ति कडली व माझी गांठ पडेल असें स्वमांत सुद्धां आणायला नको. ते एका नाल्यांत पडले व घोडी ही मेली; परंतु आयुष्याची दोरी जबर असल्यामुळें एका भिस्त्यानं आपल्या बैलावर घालून त्यांस नेलं हें आपल्याला मघाशिच कळलंना. मग ?

गिरजाः-अहाहा ! बाईसाहेब काय सांगु तें त्या रणकंदनाच्या वेळचं महाराजांच्या आंगांत भरलेलं स्फुरण, वीरश्रीनं पूर्णालिंगन दिल्यामुळें त्या मुखकमलावर आलेलं तें तेज आणि शत्रूंचीं वक्षस्थलं विदारण करण्याच्या इच्छेनं हातांत सज्ज करून घेतलेलं तें धनुष्य ! मलातर प्रती शंकरच शंभुरासुराचा वध करायला सिद्ध झाले आहेत कीं काय असं त्या वेळेस वाटलं !

अन्नपूर्णाः-खरंच गिरजे, मला ती शंकर मूर्ती पुन्हा बघायला सांपडेल का ? अग, जेवढ्या उपमा तिकडे द्याव्यात तितक्या थोड्या-

च ! ( रडूं लागते. )

**गिरजाः**—बाईसाहेब हें ऊन पाहिलंत का किती झालंतें ! आपण जर नुसत्या शोक करीत या जंगलांत राहिलात तर आपला पुढचा कार्य-भाग आपल्याला उरकता येईल का ? ह्मणून ह्म-णते, कीं आपण जितका लवकर रस्ता आटपेल तितका आटपूं. ह्मणजे सरकार याच रस्त्यानं पुढें गेले आहेत, तर त्यांची व आपली लवकर गांठ पडेल.

**अन्नपूर्णाः**—गिरजे, आतां कसली गांठ नी काय. या उपर भेट होण्याची आशा धरणं ह्मणजे निव्वळ वेडेपणा आहे.कारण ज्या मनुष्यानं त्यांनां बैलावर घालून नेलं, तो तर मुसलमान आहे असं त्याच्या त्या राणाखान नांवावरून स्पष्ठ दिसतं; आणखी हे यवन तर आह्मा हिंदूच्या हात धुऊन पाठीस लागले आहेत. तेव्हां अश्वासन देऊन त्या मेल्यानं फसवून पुन्हां पानिपतास त्यांच्या गोटांत त्यांस शिरच्छेद करण्या करितां नेलं नसेल कशावरून ?

**गिरजाः**-आपण वीरपत्नी असून असं भ्यावं ? आपला जर तसाच समज झाला असेल व होणं हो रास्तच आहे. तर ह्या माझ्या व त्या तुमच्या सांगानीं एकमेकींना एकदम धडा वेगळया करूं;

ह्मणजे ज्याप्रमाणें त्यांनां मुसलमानांनीं पुन्हां पकडून नेलं आहे, त्याप्रमाणें आपल्या वर तरी प्रसंग यायला नको ! मग कसा काय आपला विचार ?

अन्नपूर्णाः–विचार कसला ! अग मी शूराची बायको आहे. शिवाय आपल्या बरोबर ज्या बायका लढाई बघण्याकरितां आल्या होत्या त्या तर बहुतेक सर्व धाराक्षेत्रींच आपले देह ठेऊन मुक्तीला गेल्या. असं असून आपण आपलीं हीं खग्रास ग्रहणं लागलेलीं तोंड दाखवायाला दक्षिणेंत जावं काय ? धिक् आपलं जिणें ! शिवाय आपल्या गोतापैकींहीं सर्व माणसं शत्रूंनीं छाटून टाकिलीं असं तूं ह्मणतेस, तेंव्हां आतां जिवंत राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं असंच मला वाटतं. गिरजे, युक्ती खरीच नामि काढलीस. याबद्दल तुझी तारीफ करावी तेवढी थोडीच. चल हो तर तयार, ही बघ मी आपली सांग उपसली.

गिरजा–बाई साहेब, पुढलं कृत्य उरकण्याच्या अगोदर मला अर्धी शेवटलं आपल्या पायानां कडकडून भेटूं द्या ह्मणजे स्वर्ग लोकीं हीं, ही गिरजा अशीच आपल्या सेवेत हजर राहील. ( पाया पडते. )

अन्नपूर्णा–हं ! हो तयार !

गिरजा–ही पहा झालें. पण घाव एकदम पडले पाहिजेत.

**अन्नपूर्णा**—माझ्याबद्दल बिलकूल काळजी करूं नकोस. तूं मात्र संभाळ. घे देवाचं नांव. जयः— ( एकमेकींवर तलवारी उगरतात तों **नारोभगवंत** व **गोसावी** येतात व गिरजेस ठार करितात. )

**गोसावी**—अन्नपूर्णाबाईसाहेब, कोण हो ही तुमच्या जिवावर उठली होती ? महाराज सुखरूप आहेत. चला मी आपल्याला त्यांनां भेटावितो.

**अन्नपूर्णा**—कोण , उमरावगीर ? काय केलंत हें ! त्या माझ्या गिरजेला उगीच ठार केलीत.

**उमरावगीर**—असें कसें होईल ? तिनें आपल्यावर तलवार उगारलेली पाहून मी तसें केलें.

**अन्नपूर्णा**—फार मोठी चूक केलीत ! तिच्या सारखी इमानी दासी पुन्हा कधीं हो मिळायची नाहीं ! ती होती ह्मणून तर मी इथवर सुखरूप आलें ! असो झालं तें झालं ! पण हे कोण ? नारोभगवंत ? पण काय हो, महाराजांची कांहीं हकिकत कळलीका ?

**नारोभगवंत**—विश्वासरावांच्या प्रेताचा अंत्यविधी अहमदशहाच्या मदतीनें तीनशे तोफांच्या सरबत्तीनें उरकून पाटिलबोवांच्या शोधाकरितां आह्मी निघालों, तों वाटेंत पाटीलबोवा एका भिस्त्याबरोबर याच रस्त्यानें पुढें गेले व ते सुखरूप आहेत अशी खात्रीलायक बातमी आह्माला मिळाली आहे.

अन्नपूर्णा—खरंचना पण हें ?

गोसावी—अगदीं खरें! पाटिलबोवा याच रस्त्यानें पुण्याकडे गेले असा मला पक्का तलास लागला आहे! बरें पण या मुडद्याचें काय करायचें!

अन्नपूर्णा—इथेंच जाळून टाकला पाहिजे! करा तयारी.

गोसावी—ठीक आहे!

अन्नपूर्णा—बरं चला मी थोडा वेळ त्या शंकराच्या देवळांत विश्रांती घेते. तोंपर्यंत दहन विधी उरका व मग उज्जनचा रस्ता धरूं ?

गोसावी—जशी आपली मर्जी ?

पडदा पडतो.

( प्रवेश तिसरा समाप्त. )

## प्रवेश चौथा.

स्थलः—पर्वती नजीकच्या छावणीतील एक खोपटें.

पात्रेंः—राणाखान एकटाच विचार करीत बसला आहे.

राणाखान—उस नालेके पाससे निकलके यह परबती नजदीक के झोपडीमे आके रहिनेको आज आंदाजसे दसदिन हुये. आजदीनतखके, मै और मेरा लंगडा सिपाही, ऐसे दोने वडे मजामे यह् झोपडीमे रहे है; मगर परसुके दिनसे वो किधर जाता रहा है, उस्का आबतखके पता नहीं. ये क्याबात है ? पेसवेकी मुलाखात न होती तो न चलता क्या ? माधवरावपेसवेकी सवारी परवतीको आईथी, उसवख्तको उन्के साथके खिजमतगार के साथ उस्ने ज्यो बाते कियी, वो नकियी होती तो क्या होता ? खैर उधर जाके, पीछे आते वख्त रस्ता भूल गया ऐसा कह्यना, तो शहरमे ज्याके मैने बहोत तलाश किया, मगर कुछ पताही लगता नहीं. शाम होके सुरज जमीके फानीको छोड चला, आब कांहांतक राहा देखना ! पेसवेका खिजमतगार बुलाने आयाथा वोह् मुलाखत् तो अबतख् न हुयी होगी ? नही. ऐसा किसतोर

बनेगा ? "आब ही मुलाखत होनेकी है" यह उस खि्जमदगारके लब्ज् मैने सुने है. यह मेरा लंगडा दोस्तदार मुलाखत् करके पिछे आते वख्त गार्डीके अगर्च्य घोडेके तडाकेमे तो नही मिल-गया ! अगर्च्य पेसवे सरकारने गिरफदार करके जेलखानेमे डार दिया नहि ! अगर्च्य रेहेमनझर होके उसे जहागीरदार बनाके नोकर कररखा, और उसीसे मुजको भूलगया ? क्या कौनसा आंदाज करना ? ज्यो कभी वो जहागीरदार बनगया तोभी मेरे साथ दगलबाजी कभी करनेका नही ? (पाहून) खैर, वैसाभी होगा ! वो साला आज दो दीन मेरेको फसाके यहांसे निकल गया है ! कुछ फिकिर नही ! कभी तोभी मेरे रूबरू आयगा ! फेर नमकहराम बदमाषको बतायगा मेरा इला-ही तोबा कैसा कठन है वो ! (पाहून) अँ एक्या ! ए मसालका इतना आज्यवाला कायका है, और ये सब हत्यारबंद सिपाहीलोक मेरे झोपडी तरफ काह्यके लिये आते है ? मेरे दोस्तको गिरफ्दार करके मुजको कब्ज् करनेकेलिये तो आते नही ? अँ एक्या होगा भला ! आनेदे सालियोंकु मेरे आगे ! फेर देखेंगे उस्का मजा ! ( महादजी स्वच्छ पोषाख के-लेला एकदम येऊन राणाखानाच्या गळ्यास मिठी मारून "भाई भाई" असें ह्मणतो ) अबे, कौन हो तुम ? निकलजाव.

काद्यके लिये मेरे झोपडीमे आके बकवा करते हैं ? (महादजीस हिसडा मारून) ज्याव भाईबीई इधर कुई नही ? काद्यके लिये नाहक हमारी ठिटोरी कर रहेहै ? तुम यहांसे एकदम निकल ज्याव, नही तो इस खंजरसे सबोके सर कुल्म करेगा ! (आत्मगत) ये क्या अजब कारस्थान है ? मुजको भाई कह्यनेवाला मेरे लंगडे दोस्त विना और कोई नही है ! मगर इस्का आवाज पैछानका मालुम होता है ! येक्या भला होगा? मै ख्वाबमे तो नही हूं ? बिलकुल नही. (स्तब्ध रहातो)

**पाटिलबोवा**:—आय मेरे प्यारे दिलज्यान भाई, आपने मुजको पैछाना नही ? जिस्को आपने पानिपतसे आपने बैलके उपर बिठाके इस पूनेमे लाया, और ज्यो परसुकेदिनतख इस झोपडीमे आपके पास लंगडा सिपाईथा, सोहि आज पेसवेसरकारके मेहेरबानीसे और आपके आह्यसानसे बुलंदिपे चढेला यह उज्जनका मालिक महादजीसिंदा है. आपके दिलकी खातरी न होती होगी तो ये निसानी देखीये. (पाय दाखवितो) अब आगया दिलको भरोसा के नहीं ?

**राणाखान**:—गुस्ताखी मुआफ कीजिये ! मेरी बडी भूल होगई ! आँपका सच्चा इतबार बिना पैछानते आजदीनतख आपकेसाथ मै बरा-

बरीका रफ्त रखा यह मेरी खता मुवाफ करना.
( पाय धरतो ते सोडवून पाटील त्यास आलिंगन देतो. )

**पाटीलः**-दिलजानभाई, ये क्या करते हो? आप मुजको मेरे बापसेभी जियादे वालीद हो! जिस वख्त मै बेहोष होके नालेमे गिरगयाथा उसवख्त आपने वहांपे आके मुजको पानी न दिया होता तो मेरी जान कांहासे वचती? और यहां तख आपने जो मुज्को समालके न लाया होता, तो आजका ये सुन्नेका दीन किसतोरसे नजर आता? आज मुजको जो इतमाम मिलगया है, वो सब आपके मेहेरबानीका बदला है! मुजको उस वख्त महादजीसिंदा समजके आपने मेरे उपर आह्यसान किया नही, मगर एक लाचार बेकार सिपाही समजके कियाहै; अब ये आपने बताये हुये आह्यसानके रस्तेसे चलनेको मै तहाजिंदगी कभी भूलनेका नहीं. तो भाई, अब मेरे साथ चलना; आजदीन तख जिसतऱ्हां मेरे तकलीफके हिस्सेदार बन गये हो उस मुजब यह तुमारे छोटे भाईको हांसल हुये रियासतके इतमामकेभी हिस्से दार बनजाव! आपने प्यारे बैलके उपरकी पखाल निकलके आजसे उसके बदला यह जरतारी झूल मै उस्के उपर रखुंगा. चलो, अब मेरे छावनीमे जाके कल् उज्जनको कूच करेंगे.

ये देखिये दरवज्जेपास आपने खातर म्याना तयार है।

**राणाखानः**—महाराज, मेरे उपर ये आपका निहायत आह्यसान है। आच्छा, अब वो मेरी वाकल और दुसरे फटेले कपडे मुजको लेनी देव. इतमाम पाया तोभि उन्को छोडना न चाहिये।

**पाटीलः**—मै वो सब लाताहूं. अब चलीये, म्यानेमे बैठीये ?

**राणाखानः**—आय परवरदिगार ! तूं लाचारोंका मदद्गार है इस्मे बिलकुल षक् नही. क्यौंके मेरा ये जानीदोस्त सरताजका बेकार बन्गयाथा तोभी फिरसे उस्को तूने बेकार का सरताज किया, और उसीसे मुजकोभी ऐष आरामका आजमायष लेनेका वख्त आया. तो हामेशा हामारे उपर इस तऱ्हांकी रेहेमनजर रख्के हाम लोगोंको और किसीके ताबेदार मत् बनाव. इतनाही तेरे कदम पास मै बडे उल्फतसे आर्ज करताहूं ? ( पडदा पडतो )

प्रवेश चवथा समाप्त.

## प्रवेश पांचवा.

**स्थलः**—अटकनदीकांठचें मैदान.

**पात्रेः**—रघुनाथराव दादा व त्यांचें सैन्य.

**रघुनाथः**—शूरहो, चला धांवा, व तुमच्या वडलांनां ज्या नीच लांडग्यांनीं यमपुरींत खेचलें आहे त्यांच्या रक्तानें त्यांनां शेवटची तिलांजुली द्या! ज्या लोहहस्तत्राणांनीं युद्धप्रसंगीं मोठमोठ्या वीरराजांचा संहार होतो, मृगया समयीं भयंकर आणि क्रूर सिंहशार्दुलांचीं वक्षस्थलें विदारण होतात त्या यांच्या सपाट्यांतून हे असले लेचे पेचे अल्लांचे दोस्त निसटून जातील असें तुम्हाला वाटतें काय? मनांत शंका सुद्धां आणूं नका! त्या हरामखोरानें खूप याद राखून ठेवावी कीं हा वायूचाअवतार राघूभरारी आपल्या भावाच्या व पुतण्याच्या मृत्यूबद्दल सूड, त्या अहमद शहाच्या छातींत लाथ मारून त्याच्या ताज्या उन्हुन कंठरुधिराच्याघुटक्यानें भरून काढल्या शिवाय कधीं हीं राहणार नाहीं! चोर, हिंदुपदपादशाही बुडवूं पाहतो आहे. आह्मा मराठ्यांच्या वायूवेगापुढें तुह्मा काळया ढगांचा काय पाड! ज्या आह्मा क्षत्रिय मराठ्यांचा युद्ध चमत्कार पाहून श्रीकृष्णपरमात्म्यासारखे देखील आमचें

दास्यत्व स्वीकारून राहिले. ज्यांच्या नामोच्चारा बरोबर शत्रूंची वक्षस्थलें दुभंगून जाऊन त्यांनां " त्राहि भगवन " होतें व जे रणयज्ञांतली क्रीडा हाच आपला सदोदीतचा उपवनविहार असें मानतात त्यांच्याशीं असला नीचपणा काय ? चला शूरहो, धावा ! तें पहा त्या हरामखोर शहाचें लष्कर मोठया डौलानें चाललें आहे; त्याच्यावर एकदम वाघासारखे तुटून पडून त्यांच्या आतडचा आतडचा लोंबवून हाडामांसाचा चिखल व रक्तांचे-पाट वाह्यला लावून या भरतभूमीला संतुष्ट करा ! धांवा, ह्मणा " हर हर महादेव " ( सर्व जातात व भ्यालेला अहमदशहा सैन्यासह येतो )

**अहमदः**–हाय, तोबा, तोबा ! राघुभरारी तो बिलकुल नजूदीक आन पहुंच्या ! अब कैसा करना ! अब मेरा बदन कुछ यह शेरके तडाखे मेंसे छुटता नही ! तोभि हिम्मत छोडनेसे कुछभी हासल होनेका नहीं ! ( उघड ) आय मेरे धरमके रिशतेदारों, वो देखो वोह् दुष्मन राघूभरारी मगज बिघडे हुवे कुत्तेके मुवाफक आपने सब फौजके साथ आपने लोगोंके उपर दौडके आताहै, वास्ते मैने इशारत करतेही एकदम दीन गजवाके उन्के फौजके उपर करो हल्ला और करडालो बिस मिल्ला ! और मै खुद उसभरारीको पकडके उसके

बदैनके छिलटे छिलटे उडादेताहूं !

**गुलामः**-हुजूर आप काहेके लिये इतनी तकलीफ उठातेहो ! मै उस्को करदेताहूं दुनियाके पार ! मेरे रनसूर लढनेवाले सरदारों, तैयार रहो ! इस दुष्मनकी फौज आगे आईके एकदम एकदिलसें उस्के उपर कसालाकरके पानिपतके लढाईमें तुम् सबोंके गरमहुवेमगज अबतख थंडे हुये नही, सो इस दुश्मन्के सरकटवानेसे थंडे करो.

**अहमदः**-नही, नही ! यह गनीमको मय दोजख दहूंच्या देताहूं ! क्यौंके, यहि दुश्मन्ने लाहोरके नजूदीक मुज्यको दोवख्त हाटा दिया हाय, इसलिये उस्काबदला खुदबखुद मुजकोही लेना चाहिये. मेरे जवामर्दो, तैयार हो जाव ! वो देखो गनीम आपहुंचा. ( दोन्ही फौंजा लढतात; मराठ्यांची सरशी होते. )

**राघोबाः**-( अहमदशहाचे छातीवर गुढगा देऊन ) आरे नाहिजार ! हमारे मुल्खमे दौलतके तिश्नगीसे आके हमारे हिंदु जातको नामोहरम करने च्चाहताहै ! इस वख्तको मेरा लोही ऐसा गरम होगयाहे के, पांवसे सरतखके सब बदनको इंगार लगी रहा है ! इसवख्तको मेरे बदनमे दसहजार हाथीकी कुवत आई है; छातीके बंद,

आस्तेनी तुजको देखके भरेले घूसेसे तुट जाती है! हाय हारामखोर, मेरे रिशतेदार बिसवासराव, भाऊसाहाब सरीखे रनसूरकी पानिपतको तुने जान लियी, उस्का बदला आब तेरा गला फोडके इस रनमैदानके जमीको तेरा लोही पिलाके लेताहूं? अबे हराम जादे, अब दुनियाके पार हो ज्यानेकी तयारी कर! अब तेरी जान लिये बिगर मेरी तिश्नगी जानेकी नही! इसलिये तुजको दोजख पहुंच्या देताहूं! तेरे सरीखा बदकार जमीको भारदेनेवाला आज मेरे हाथसे दुनिया पार होता है, यहदेखके, पानिपतमे जिनकी जान जाती रही है सो मेरे रिशतेदारोंको ज्यानको बेहेस्तमे बहोत आराम होगा! कर अब खुदाकी याद! मगर नही, खुदाकी याद मतकर. तुजको ऐसाही मार डालताहूं! (कंठ फाडतो)

**अंक पहिला समाप्त.**

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

**स्थल**—फाकड्यांचा दिवाणखाना.

( गंगाधरयशवंत व मानाजी फाकडे शिंदे विचार करित बसलेले प्रवेश करितात. )

**गंगाधर**—कां सरकार, नानासाहेब वारल्याबरोबर माधवरावांनां राज्याभिषेक होऊन, त्यांचें परिवय असल्या कारणानें रघुनाथरावांच्या हातांत राज्यकारभार आल्याबरोबर आपल्याला शिंदेशाहीचीं वस्त्रें मिळणार ह्मणून मी ह्मटलें तसें झालें कीं नाहीं ?

**मानाजी**—अहो, होणारच ! या मानाजीराव फाकड्याचें नशिबच तसें बलवत्तर ऊर्फ जोरदार' आहे. सरदारी हिम्मतीवान पुरुषालाच मिळावयाची. दादासाहेबांनीं महादजीला सरदारी न देतां, या पठ्याला दिली यावरून आमच्या सारखे पुण्यवानपुरुष आह्मीच कीं नाहीं, सांगा ?

**गंगाधर**—यांत काय संषय, आपला प्रतापच तसा आंहे. आपण पानिपतच्या लढाईंतून पळून परत आलांत ह्मणून काय झालें, शुर तो शूरच.

**मानाजी**—मग शंका आहे कीं काय ? आमच्यासारखे वीरमणी जर त्या प्रसंगीं गैरहजर असते तर मराठ्यांचें सैन्य त्या ठिकाणीं एक क्षणभर तरी स्थित झालें असतें का ?

**गंगाधर०**—मुळींच नाहीं. आपण होतां ह्मणून बराच वेळ तरी टिकाव लागला. आणखी त्या प्रसंगीं आपण आपली मर्दुमकी गाजवलीत ह्मणून तर आपल्या नावांच्या सनदा दादासाहेबांनीं आपल्याला करून दिल्या.

**मानाजी**—अगदीं खरें बोललांत. आतां काय हवी तशी चैन करून सोडणार. पहिल्याप्रथम एक जंगी जनानखाना तयार करायचा. आपला वाडा मोठा आहेच. कसें, असेंच कीं नाहीं ? बाग काय अन् बगीचे काय, गर्दीच करून देतो अगदीं. मग तुह्मीच ह्मणाल कीं ऐषआराम, चैनबाजी, या इष्कबाज हिम्मतबहाद्दरांनेंच करावी.

**गंगाधर०**—सरकार आपण कराल तेवढें थोडेंच आहे. ( आपल्याशीं ) काय मूर्ख आहे पहा सरदारकी मिळाली, एवढी बातमी मात्र कळली, परंतु ऐवज अजून हातांत कोठें आला आहे. आतांच इतका हा बैलोबा उड्या मारयला लागला आहे, आणखी मग जहागीरी हातांत आल्यावर काय करील कोणाला ठाऊक. आपल्याला

कीय आपली तुंबडी भरल्याशीं कारण. मग तिकडे कांहींका होईना. या फाकडयाला सरदारकी मिळाली खरी परंतु वशिला कोणाचा दादांचा आणखी मध्यस्ती कोणाची माझी, ह्मणजे बहुत करून ती सरदारकी, नन्नाच्या पाडयाकडे लवकरच वळेल ह्मणायला हरकत नाहीं; कारण आह्मांला व दादानां विचारतो कोण? आधीं सर्व राज्यसूत्रें दादांच्या हातांत रहातात कीं नाहीं याचीच शंका. कारण मंत्री मंडळांत तशा प्रकारचीं खलबतें चाललीं आहेत. घोडयालाच जर रजा मिळाली तर त्याच्या मोतद्दाराला विचारतो कोण. तद्वतच या फाकडे साहेबांची व आमची स्थिती! या फाकडयांचें शहाणपण पहा! ह्मणे पहिल्याप्रथम जनानखाना बनवायचा, नांवाप्रमाणेंच शहाणपण! आपल्या हातीं येणाऱ्या आधिकाराप्रमाणें, ही दीर्घशहाणी बेअक्कल स्वारी कसें वर्तन ठेवील याची शंकाच आहे! शंका कशाला? अधिकाराचा दुरुपयोग होणारच. ( उघड ) बरें सरकार! मी घेतो आतां निरोप. घरीं गेलें पाहिजे.

**मानाजी**—बसाहो! आतां घर कसलें आणि दार कसलें! हेंच तुमचें घर. इतउत्तर तुह्मी आमचे कारभारी व आह्मी तुमचे मालक ऊर्फ यजमान.

आतां काय महादजी न् फिदजी सर्व या राजमूर्तींच्या पाद्यकमळीं अगदीं लोळकंडचा खाउन या मर्दाची सेवा करून आह्मी सुप्रसन्न केव्हां होतों ह्मणून वाट पहात जातील. असें होईल कीं नाहीं सांगा ?

**गंगाधर०**—तें सर्व खरें, पण आधीं सर्व हक्क हातांत तर येऊंद्या, मग पुढील व्यवस्था—

**मानाजी**—त्याबद्दल तुह्मी मनांत साशंकाचा किंतु सुद्धां आणूं नका. ही मानाजी फांकडे लावण्यलतिका मूर्ती अशी लल्लाटवान ऊर्फ नशिबाची आहे कीं, एकदां या बहाद्दराच्या नांवानें आज्ञापत्र सुटलें कीं तें पुन्हां मागल्या मार्गाकडे ह्मणून गच्छित होणारच नाहीं. बरें तें असो; पण तें, तें आमचें माषुक, त्याचें कसें काय ? तें जर कां आह्माला आप्राप्य झालें तर मग आह्मी नाक्यवासीं गच्छ केलेंच समजा. त्याप्रकर्णी मनसोक्त द्रव्यव्यय करायला हा पठ्ठा अगदीं अग्रपादावर उभा आहे.

**गंगाधर०**—त्याबद्दल आपण बिलकूल काळजी करूं नये; तें काम आपलें ( आपल्याशीं ) आपलें काय ? थैली मिळाल्याशीं कारण. मग ती या मदनमूर्तीवर आषक होवो अथवा न होवो. बहुत करून नकाराकडेंच गेलें पाहिजे. कारण स्वारीचें

बोलणें काय, संस्कृत शब्दांची रेलचेल; मग ते शुद्ध कां अशुद्ध बघतो कोण. पोषाख पहा, जसा झोजामल्हार. ( उघड ) हरप्रयत्न करून मी तिला आपल्यावर प्रेम करायला लावणारच.

**मानाजी**—खरेंचना पण हें, नाहीं तर अनृतवदाल. पण काय हो आह्मी त्या सुंदरी कृशांगीच्या मर्जीतून उतरलों असें श्रुत केलें तें असत्यना ?

**गंगाधर०**—असत्य ह्मणजे, खोटें असलेंच पाहिजे. आपल्या शृंगारिक चेष्टा, आपला मधुर कंठ, व आपलें सुस्वरूप हीं कांहीं तिला माहित नाहींत कीं काय ? शिवाय आपल्या वैभवापुढें इंद्र सुद्धां कांहींच नाहीं हें ही तिला ठाऊक आहे.

**मानाजी**—खरेंच कां ? काहो जर ती आमच्यावर प्रीत्य करित नसली तर मग काय कृत्य ऐष्टच आहे. आह्माला वाटतें कीं तुह्मी भक्कम, लठ्ठ, जाडाभरडा असा आमचा गौरव्य तिला प्रात्यदिनी काथिन्य करावा. ह्मणजे मग तिच्या मानसीं जरी नसेल तरी ती सौम्यसुवर्तिनी सवासिन् आमच्यावर लुब्ध होईल. कां, आमचें ह्मणणें सत्य कीं असत्य ?

**गंगाधर०**—आपलें ह्मणणें सर्व खरें आहे ! ( आपल्याशीं ) आतां या मदनमूर्तीपासून लवकरच उठलें पाहिजे, नाहीं तर मलाच ती समजून

आमच्यावरच प्रेम कोसळायचें. शिवाय या पा- व्हाळांच्या गोष्टींचा काथ्याकूट करण्यांत अर्थ काय ? ( उघड ) सरकार येतों मी आतां. कारण तिच्या खटपटीला लागलें पाहिजे.

**मानाजी**–ठीक आहे, परंतु ती वस्तू हृदयापासून अस्थीर्य होऊं देऊं नका बरें, वश्य होणेंच लाभ्यदायक आहे. ( जातात )

प्रवेश पहिला समाप्त.

---

## प्रवेश दुसरा.

**स्थल**–रस्ता.

( पाटील प्रवेश करितात. )

**पाटील**–एकंदरींत मी ह्मणजे इतका कुचकामाचा ठरलों अँ. आज माझ्या दोन तीन पिढ्यांनीं पेशव्यांची एकनिष्ठपणानें जिवाची पर्वा न करितां हाडांचीं काडें करून इतकीं उत्तम प्रकारें चाकरी बजावली इतकेंच नव्हे परंतु यजमानाच्या जिवाकरितां आपले जीव धोक्यांत घालून शेवटीं प्राणास मुकले. त्यांचाच मी खरा वंशज असें असून मला सरदारकी दिलेली काढून घेऊन मानाजीला दिली काय ? बरें यांत त्यांनां तरी दोष देण्यांत अर्थ काय ? कारण माझ्या अंगांत

माझ्या पूर्वजांसारखी मर्दुमकी नाहीं, असें त्यांनां वाटल्याशिवाय कां त्यांनीं माझी सरदारकी काढून घेतली! खरोखर नारायणा, आतां मात्र हें मला सहन होत नाहीं! ज्याअर्थीं तूं मला निर्माण केलें आहेस त्याअर्थीं माझी तुझ्याजवळ एवढीच विनंती आहे कीं, आतां या अपमानरूपीं यमपुरींतल्या होणाऱ्या दुःसह यातनांतून सोडवून लवकर माझे डोळे मिटिव. अहाहा! मागलें माझें वैभव डोळयांपुढें उभें राहिलें ह्मणजे काळीज कसें फाटून जातें! अरे माझें हें लाजिरवाणें तोंड माझ्या स्वर्गस्थ पूर्वजांच्या दृष्टीस पडतांच तीं पहा त्यांनीं आपलीं तोंडें पार लपवलीं! अरेरेरे खरोखर मी तुळशीमध्यें भांगच निपजलों! अहो पंजोबा, अहो आजोबा, अहो बाबा खरोखर मी तुमच्या कुळांत जन्म घेऊन तुमच्या नांवाला बट्टा लावला. अहो रणधीर प्रतिकृतांत माझे पूर्वजांनों मी जर तुमच्या तेथें आलों तर मला थोडीशी रहावयास जागा द्याल काय? काय नाहीं! बरें तुमची मर्जी. मी असाच येथें खिचपत पडावें अशी तुमची इच्छा आहेना? अहो नकाहो नका. असे निष्ठूर कां होतां? तुह्मांला जर माझी दया येत असेल तर, तुह्मी आपल्याबरोबर जें तुमच्या मुत्सद्दीपणाचें भांडार, शौर्याचें गाठोडें,

व शहाणपणाचें पोतडें नेलें आहे तेवढें तरी या कुलांगाराकरितां खालीं फेकून द्या ह्मणजे त्यावर तरी हा आपलें नष्टऐश्वर्य परत मिळविण्याची पुन्हा एकवार खटपट करीन! अरे पण मी असा भ्रांतिष्टासारखा बडबडतो आहे काय! कांहीं असो. आतां प्रथम आपली बीडकडे जाण्याची व्यवस्था करावी; कारण गोपाळरावपटवर्धन, भवानरावप्रतिनिधी, वगैरे सर्व माझ्या संबंधानें पुण्याच्या दरबारांत भांडणारी मंडळी निजामाकडे गेली आहे, अशी काल्च बातमी लागली; तेव्हां आतां तिकडेच जाण्याचा बेत करावा. कारण आतां येथें रहाण्यांत अर्थ नाहीं; जाऊन प्रयत्न करावा. पुढें आपलें प्रारब्ध.

प्रवेश दुसरा समाप्त.

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—उज्जनी मधल्या वाड्यांतील महाल.

( अन्नपूर्णाबाई पलंगावर निजलेली व मैना दासी पलंगापाशीं उभी आहे असा प्रवेश उघडतो )

**मैना**—बाईसाहेब, बाईसाहेब, अजून उठण्याची वेळ नाहीं कां झाली, कितीवेळ निजायचं,

थंडी नाहीं कां होणार (अन्नपूर्णा जागी होऊन)

**अन्नपूर्णा**—कोण मैने, कांग मला हांक मारलीस स्वारी कां आली आहे ?

**मैना**—स्वारी नाहीं, पण आपण दुपारपासून इतका वेळ निजलां होता, ह्मणून ह्मटलं कीं दिवसा फारवेळ निजणं चांगलं नाहीं; थंडी होते.

**अन्नपूर्णा**—अग मग करायचं काय वेळ देखील जात नाहीं; मेलं गाणं बिणं तरी कांहीं ह्मण; माझी प्रकृती किनै आतांशा कशी अगदीं बिघडली आहे; मेलं काय तरी, किती दिवस झाले इकडली आठवण सुद्धां होत नाहीं. कशाला होईल ! अग मेला आमचा बायकांचा जन्मच असला. मैने, खरंच सांगूंका तुला, महाराजांनीं दुसरं लग्न करून ती पार्वती घरांत आणल्यापासून तर किनै सगळा वेळ तिच्याकडे घालवितात. मेलं मी काय पातक केलं आहे कुणाला ठाऊक कांहीं सुचत नाहीं नी कांहीं काम हातीं घेतलं तर त्यांत मन देखील लागत नाहीं. पानपतांत इतर बायकांप्रमाणें मीही मेलें असतें तर फार नामी झालं असतं. पण तसं कुठलं व्हायला. हे सुखसोहाळे व्हाव्यचे आहेतना ! उगीच मी परत यायच्या भानगडींत पडलें.

**मैना**—बाईसाहेब, महाराजांनां जर आज मी

इकडे घेऊन आलें तर मला काय द्याल ?

**अन्नपूर्णा**–हो, कांहीं तरी मेलं बोलतेस ! इतकी कुठे आहे बाई मी नशिबाची ! अग इतकं जर असतं तर अशी स्थिती कशाला बाई झाली असती ?

**मैनाः**–हें पहा पण मी ह्मणतें उगीच अशा कल्पना करून त्यांनां कां बरं दोष देतां ? मघांशीं मी सांगितलें तें कबूल आहे कां ! असेल तर सांगा, मी आतां जाऊन घेऊन येतें; इतकं कशाला, मी ह्मणते कीं बोलावणं न जातां जर महाराज आले तर मला काय द्याल ?

**अन्नपूर्णाः**–अग तसं कुठलं घडायला ! हें बघ जर आज या माझ्या महालांत यायचं झालं तर किनै मी तुला हा माझा कंठा बक्षीस देईन. ( इतक्यांत पाटील येतात. )

**पाटील**–कायग मैने, काय चाललें आहे काय ? एवढ्या पैजान् बाक्षिसें कसली चालली आहेत ?

**मैना**–महाराज, आपल्या येण्याबद्दल नी दुसरं काय ? ( अन्नपूर्णेस ) बाईसाहेब, द्या आतां माझं बक्षिस मला. ही पहा महाराजांची स्वारी.

**अन्नपूर्णाः**–मग देतां येईल. एवढी उतावळी काय झाली आहेस.

**मैनाः**–अगोदर द्या ( थांबून ) नाहीं तर मग दो-

घांच्या चालतील गोष्टी नी माझी मुळींच राहणार नाहीं आठवण. म्हणून म्हणते कीं बक्षीस द्या अगोदर. नाहीं तर महाराजांनां कांहीं मी सोडणार नाहीं.

**अन्नपूर्णा**:—येवढंचना? इतके दिवस गेले तसाच आजचा. उद्यां तर नाहींना तूं अडवीत. (आपल्याशीं) हो पण उद्यांचा तरी काय नेम. आज किती दिवसांनीं स्वारी चुकून इकडे आली आहे तर आपण होऊन संधी कां दवडावी. ( उघड ).गिरजे हा घे कंठा. आतां तर तुझी कांहीं आडकाठी नाहींना. ( कंठा देते व पलंगाच्या बाजूला उभी राहते. पाटील पलंगावर बसतात. )

**मैना**:—( आपल्याशीं जातांना ) जोडा कसा अगदीं नक्षत्रासारखा शोभतो आहे वरका ! ( जाते )

**पाटील**:—( हंसत ) कां अशा नव्या माणसासारख्या दूर दूर कां उभ्या ? आज चेहरा रागावल्यासारखा दिसतो आहे. कांहीं कमी जास्ती आहे वाटतें ? छेः बोवा आतां नाहीं आपल्याच्यानें धीर धरवत. उभें किती वेळ रहायचें, आपले तर पाय दुखायला लागले बुवा.

**अन्नपूर्णा**:—येऊन तरी काय करायचं आहे ? असंच किनै. आठवड्यांतून एकदां तरी इकडे यायचं होतं कां. आह्मी बायकांनीं असं पुरुषांचं काय घोडं मारलं असतं कोणाला ठाऊक. मेलं

आमचं जिणंच फुफट. हा बायकांचा जन्म ह्मणजे असाच, नेहेमीं कसं होईल नी काय होईल याच विवचनेंत आमचे दिवस जायचे. पुरुषांची किती सेवा करा, प्रेम दाखवा, आपल्या जिवाच्या पलीकडे अट्टाहासकरा, पण आमची येवढी तरी दया येते कां ! त्यांतून नवी माणसं ह्मणजे नवलपरिची, आणखी आवडेनं पारखेची ह्मणून घरांत आणलेली; मग मेली आमची ती काय कथा; अन् आमच्याकडे यायची आठवण तरी कशाला होईल !

**पाटील**:—हं हं समजलों, एवढी आमच्यावर पुष्पांजली कां चालली आहे ती? हें पहा इकडे तर याल आधीं. ( असें म्हणून धरून आणून बसवितो ) अहाहा, नुसता स्पर्श होतांच अंतःकरणांत जी कांहीं भयंकर आग पेटली आहे तिचें शांतवन होऊन कशी अगदीं जागच्या जागीं दबून पार विझून गेली. हें पहा, आतां अंत किती पहायचा ? माझा राग का आला आहे तुह्माला ?

**अन्नपूर्णा**:—होः, तेवढं ह्मटलं ह्मणजे झालं ! बरं पण आपली व्यवस्था कशी काय झाली ? इकडेच सरदारीच्या सनदा मिळायच्यानां ?

**पाटील**:—अग पण तो मानाजीराव आहेना, दादासाहेबपेशव्यांनीं त्याच्या नांवच्या सनदा करून दिल्या.

अन्नपूर्णाः—अग बाई, खरंच का! हो पण मी सुद्धां असंच ऐकलं कीं मानाजी भाऊजींना जहागीर द्यावी असं पुण्यास दरबारी मंडळीच्या जरी मनांत नाहीं तरी पण दादासाहेबांच्या मनांत आहे. यांत खरं काय? पण हे पहा माधवराव साहेब, होळकर, नाना, वगैरे मंडळी आहेतचना आपल्या पक्षाची? त्यांच्या पुढें एकट्या दादासाहेबांचें तें काय चालणार. पण तें कांहीं कां असेना. इतके दिवस इकडे कां येणं झालं नाहीं तें सांगायचं आधीं.

पाटीलः—हें पहा कांहीं जरी झालें तरी ओढा हा नदीलाच मिळायचा; तो कधीं समुद्राकडे एकटाच एकदम धांवत गेला आहे कां? नदीच आपल्या बरोबर त्याला खेंचून नेऊन जलनिधीशीं भिडवून मुक्ति देते.

अन्नपूर्णाः—हें पहा मला कनी हीं असलीं खुबीची बोलणीं कांहीं समजत नाहींत.

पाटीलः छेः हो तुह्माला कुठलीं समजायला.

अन्नपूर्णाः—बरं मला सगळं कळून मी आपलं उगीच वेड्याचं सोंग घेते आहे, मग तर झालं ना?

पाटील.—बरें राहिलें, चुकलो, माफ करा! राग कसा अगदीं त्या नकट्या नाकाच्या शेंड्यावर ठेवलेला आहे.

**अन्नपूर्णाः**—आणखी कांहीं थोडीशी शाल-जोडीतली—

**पाटीलः**—कशाला ! पण हें पहा आतांशा कनी माझें मन कसें अस्वस्थ झालें आहे. कांहीं सुचत नाहीं. अम्मळ बागेंत जाऊं ह्मणतो येतेस का ?

**अन्नपूर्णाः**—माझी कुठे ना आहे ! माझी तीच इच्छा आहे.

**पाटीलः**—मग चलातर ! वः तुमच्या इच्छेविरुद्ध जावें कोणी. नाहीं तर "फट ह्मणतां ब्रह्महत्या" व्हायची.

**अन्नपूर्णा**.—बरं पण आपण येणार हें पुढें सांगून नको कां धाडायला ?

**पाटीलः**-कशाला, जाऊंदे कीं कोण जातो आतां. आपले तर आतां एथून पायच हालत नाहींत. रात्रभर एथेंच विश्रांती घेऊं झालें. कारण उदईक एथून निघून बीडमुक्कामी जावें असें मनांत आहे ?

**अन्नपूर्णाः**—तें कशाला ?

**पाटीलः**—कशाला ह्मणजे अग खटपट नकोका करायला ? तिकडे जाऊन पुन्हां कांहीं साधलें तर पहायचें. नाहीं तर प्रभुसत्ता. (पडदा पडतो.)

प्रवेश तिसरा समाप्त.

## प्रवेश चवथा.

स्थलः—फाकड्यांचा दिवाणखाना.

( गंगाधरयशवंत विचार करित एकटाच बसला आहे. )

गंगाधर०—आतां याला युक्ति काय काढावी? पुण्याच्या दरबारांतून या "फाकडे बहाद्दरांची सरदारकी काढली व महादजीला दिली" असें इतक्यांतच पत्र आलें आहे. आज सरदारकी मिळते व उद्यां जाते. हें राज्य नव्हे, सर्व पोर खेळ आहेत. बरें पण महादजीला मिळाली यांत वाईट तें काय झालें! तो त्या पदाला योग्यच आहे. शिवाय त्याच्या सर्व गुणांच्या मानानें पाहिलें तर हे आमचे अतीशहाणे सरकार ह्मणजे "काहां भोजराजा व काहां गंगाराम तेली" अशांतली स्थीति. दादा ह्मणजे कांहीं कमी आहेत असें नाहीं. त्यांच्या हातांतला अधिकार जरी सध्यां काढून घेतला आहे तरी ते हवी ती खटपट करून पुनः आपलें नष्टऐश्वर्य प्रथापित करणार हें खास. पण अधीं जो मी आजपर्यंत या स्वारीचा हवा तसा पैसा उपटून चैन मारतो आहे, त्याबद्दल त्याला अंशतःतरी मोबदला दिला पाहिजे. पण याला काय युक्ति काढावी? ( विचार करून ) अँः, ही एक युक्ति दिसते खरी; आणखीं तसें झालें ह्मणजे आपला

इष्ट हेतू साधण्यास ह्मणजे फारशी अवधी लागेल असें नाहीं. हो; असेंच करायचें ! ( फाकडे येतात )

**फाकडे**:–कां कारभारी, चिंतातुर्यसे स्थित झालां अहांत ! कांहीं अंतर्बाह्य अत्यकट्ठ असें वैषम्य प्राप्य झालें आहे वाटतें ?

**गंगाधरः**–छेः सरकार, तशांतलें नाहीं कांहीं. पण ती आपली नूरजहान–

**फाकडे**:–बरें मग, तिचें काय ? कांहीं अधिकोत्तर वर्तमान्य आहे वाटतें ?

**गंगाधरः**–तसें मुळींच नाहीं; बाकी थैली मागते आहे, अन् ती थोडी थोडकी नाहीं. बरीच मोठी !

**फाकडे**:–इतकेंचना ! मग तुह्मी अंतर्यामी इतके भ्रामक कां होता ? एक शतकडी सोडून एक्याण्णवशें शतकड्या खर्च करण्याला हे बहाद्दर फाकडे अगदीं अग्रपादीं तात्पर्य आहेत ! इतकें अंतर्यामी कांप्ययमान होण्याचें प्रयोजन्य काय ?

**गंगाधरः**–तें असूंद्या. पण आपलीं सनदा पत्रकें जप्त झाली व ती महादजीस मिळाली.

**फाकडे**:–खरेंच कां काय ? अं अन् असें झालें ? तर मग आतां या बहाद्दराचा अवतार सांपुष्टयाप्रत गमन करिता झाला ह्मणायचा ? छेः हो पण

मराठी ग्रंथ संग्रहालय

यद्धत होणें अगदीं असंभवनीय आहे.

गंगाधरः—नाहीं सरकार, हें अगदीं खरें आहे.

फाकडेः—सत्यच जर असेल तर असत्य होणें ह्मणजे दुस्तरच नाहीं कां? पण हें असें झालें तरी कसें! छे बुवा आतां आपण तर मृत्युवत् होणार! कारण आह्मला आतां विचारणार कोण? पण काय हो तुह्मी ही वस्तु श्रुत कोठें केलीत?

गंगाधरः—ऐकली नाहीं परंतु प्रत्यक्ष वाचली. हें पत्र पहा ( पत्र देतो तें वाचून रडूं लागता ) सरकार हें काय? आपणच धीर सोडलात तर मग आम्ही काय करावें? उठा भागुबाई सारखें रडावें काय? मी एक खाशी युक्ति काढली आहे. पसंत होईल तर सांगतो.

फाकडेः—काय युक्ति, अन् ती कोणची?

गंगाधरः—( कानांत सांगतो ) उडवायचें न् काय! मग दुसरा वारस कोण आहे.

फाकडेः—हो, हो! हें तुमचें म्हणणें सायक्तिक दिसतें खरें! पण स्थान कोणचें?

गंगाधरः—सरकार, आतां ते हिंदुस्थानांत स्वारीला जाणार आहेत तर ते जायला निघायच्या अगोदर उज्जनीस आपल्या महालांत निजले असतां उडवान् काय!

फाकडेः—काय, मी स्वतः? छेः आपलें तर

धाष्टर्य होणार नाहीं, तुम्हीच करा तेवढें !

**गंगाधरः**—छेः, आपल्या हातून तर नाहीं होणार; तें काम उरकायला आपल्या सारखेच वीरमणी पाहिजेत. मी मदत करीन पाहिजे तर.

**फाकडेः**—असें काय बरें ? करानात तेवढें तुह्मी ? बरें पण केव्हां उरकायचें हें ?

**गंगाधरः**—अहो ते निजले असले ह्मणजे, जा तेथें आणखी खुपसा जंबिया.

**फाकडेः**—अन्त्या, त्याच्या बायका असतिलना तेथें. त्यांनीं मोठ्यानें कोलाहल्य केल्यावर मग ?

**गंगाधरः**—त्यांनां ही उडवा.

**फाकडेः**—छेः, बुवा, दुसरी कांहीं युक्ति काढा; ही नाहीं जमत.

**गंगाधरः**—झालें, असें म्हटलें म्हणजे मग पुढलीं सर्व कृत्यें निर्विघ्न पणें तडीस जाणार कशीं ?

**फाकडेः**—बरें बुवा आम्ही करतो. पण तुम्ही आमच्या पार्श्वस्थानीं तिष्ठायमान असलें पाहिजे।

**गंगाधरः**—ठीक आहे तें माझें काम.

**फाकडेः**—जातो तर मग आतां ! तजविजेला लागतो ( परत येऊन पुन्हा ) पण तो मार्ग गामिन्या करितां कधीं निघणार ?

**गंगाधरः**—बहुतकरून दोन चार दिवसांतच

निघतील.

फाकडेः-बरें, जातो! पण दुसऱ्या कामाचें आहेना लक्षांत?

गंगाधरः-त्या बद्दल काळजी नको! नूर-जहान उद्यां आपली म्हणून समजा!

फाकडेः-बास, बास! मग काय झालेंच माझें काम! एवढें काम झालें कीं मग तुमची पैशांची नुसती चैन करतो! जाऊं आतां? जातो अँ!

गंगाधरः-हं, बेलाशक! ( गेलासें पाहून ) जा! बैलोबा खुशाल जा! महादजीला ठार मारायला तुला सांगितलें खरें. परंतु त्या ठिकाणीं तूं मेला नाहींस ह्मणजे पुरे. मेलास तर कटकटच चुकली. पण नाहीं अजून कांहीं दिवस जिवंत राहिला पाहिजेस; माझी पोळी चमचमीत झाली म्हणजे मग खुशाल मर. मग जर मेला नाहींस तर मात्र कांहीं तरी युक्ति लढवून तुला ठार करवीन हें खास! ( पडदा पडतो. )

प्रवेश चवथा समाप्त.

## प्रवेश पांचवा.

स्थळ–दुभईच्या इंग्रजांच्या छावणींतील दादांचा तंबू.

( रघुनाथरावदादा सचिंत विचार करीत बसले आहेत. )

दादाः–शाबास, बापू, शाबास! तुमचे मी उपकार किती मानूं? खरोखर मुत्सद्दी असावा तर असाच. परंतु तो एकटा धूर्त, अक्कलवानपुरुष काय करणार! या शिंदे होळकरांनीं मला मदत देतों ह्मणून थापा मारून ऐन प्रसंगीं जर फसविलें नसतें तर त्या हरीपंताचें व नानाचें कांहीं तरी चाललें असतें का? या दोन सरदारांनीं टाळा दिला तो दिलाच, परंतु गोविंदराव गायकवाड तरी तसें करणार नाहीं असें मला पक्कें वाटत होतें; परंतु त्यानेंही त्यांच्या सारखीच साखर पेरली. तिकडे पुण्याकडे मोरोबा फडनवीस, बापुजीनाईक व बजाबापुरंदरे, यांनीं 'नाना, हरीपंत, गंगू व तिचा कारटा या सर्व मंडळीस कैद करून बंदींत घालूं, व माझा अधिकार चालवूं' ह्मणून खटपट करण्याचें कबूल केलें, परंतु तीही मसलत फसली. मी स्वारीवर गेलों असतां एक दिवस माझ्या तंबूंत मला एक बापूंच्या सहीचें पत्र सांप-

डलें. तें वाचून पाहून मी त्याच रात्रीं तसाच झटकन इंग्रजांकडे गेलों. त्यांनीं मला आश्रय देण्यास मागें पुढें एवढें तरी पहायचें होतें; मुळींच नाहीं. इंग्रजांनां लढाई करण्यास उद्युक्त करून एकामागूनएक अशीं बरींच शहरें घेतलीं. व कालच हें दुभई शहर हस्तगत झालें. आतां काय, असाच, या इंग्रजांच्या साह्यानें प्रथम कोंकण जिंकून नंतर पुण्याकडे जाणार. एकदां सर्वत्र आमचा अंमल बसला, ह्मणजे नानाला व हरिपंताला विचारतो कोण! शिंदे होळकर वगैरे सरदारांनीं स्वार्थपरायण होऊन पुण्यांतील ब्राह्मण मुत्सद्यांचा हेवा करण्याची खटपट तर सुरू केलीच आहे; तेंव्हां ही एक संधी उत्तम आहे. गायकवाडानें इंग्रजांशीं तह केला, ही बातमी समजल्याबरोबर शिंदे होळकरांनीं नर्मदा पार होऊन गुजराथेंत तळ दिला आहे. शिंद्यानें सहा हजार स्वारांची एक तुकडी मही नदीचें कांठीं धाडिली व आपण बाकीच्या सैन्यासह पावागडचा रस्ता सुधारून दुभईनजीक तळ देऊन इंग्रजांच्या तोंडावर राहिला आहे. कांहीं हरकत नाहीं. जें पुणें शहर पेशव्यांची राजधानी ह्या नांवानें गाजत आहे, ज्या ठिकाणीं माझ्यासारखे पराक्रमीयोद्धे व बापूंसारखे मुत्सद्दी अजून हयात आहेत व ज्या ठिकाणीं सशाला

भिऊन कुत्रीं पळतात त्याच ठिकाणीं नाना व हरिपंतासारख्या अक्कलशून्य लोकांनीं यथेच्छ वावरावें काय? मी स्वारीवर गेलों इतकी संधी साधून नानानें त्या गंगीच्या कार्ट्याच्या नांवानें द्वाही फिरवली? बरें कांहीं हरकत नाहीं; जो मी पूर्वी स्वतंत्रतेनें वागत होतों, तोच मी आतां यांचा बंदीवान होऊं काय? बापू ह्मणजे लुडबुडे दुटप्पी वर्तन करणारे, आणि मी राजद्रोही, असें काय? पाहून घेतों आतां. त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें कीं हा राघोबा जोंपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत हरप्रयत्न करून पेशवाई संपादन करणार. मग त्यांत देहावसान झालें तरी बेहत्तर आहे. ज्यांच्या घरचें अन्न खाल्लें त्यांच्यावरच उलटता काय? कांहीं चिंता नाहीं. बापूंनीं, शिंदेहोळकरांनां, नानास साह्य न करण्याविषयीं कर्णमंत्र फुंकून जराशी लालूच दाखविली कीं त्यांची स्वामीसेवा क्षयाच्या भावनेवर जाऊन आमचा फायदा खास होणार! मग काय! पुढारी ह्मणून मराठी राज्यशकटाच्या दोऱ्या ज्या ब्राह्मणांनीं सध्यां हातांत धरल्या आहेत त्यांनां खाड्यांत पाडायला तो किती उशीर? असो, सध्यां मराठी राज्याचें खवळलेल्या समुद्रांत सांपडलेलें तारूं खेंचून बाहेर आणून, त्याचें आपण मालक बनण्याविषयीं तर खटपट करणार

मग पुढें प्रभूसत्ता ! एकंदरींत मला इंग्रजांची मदत मिळून सध्यां नेहमीं मिळणाऱ्या जयांवरून तर असें दिसतें कीं माझें पूर्ववैभव मला पुनरालिंगन दे............( हुजऱ्या येतो ).

शिपाई:-सरकार ! दरबारला जायची वेळ झाली, सगळे टोपीवाले वाट पहात आहेत.

दादा-ओ हो ! बराच वेळ झाला. माझी घोडी तयार करायला सांग पाहूं ? ( पडदा पडतो. )

प्रवेश पांचवा समाप्त.

## प्रवेश सहावा.

स्थल-जंगलचा रस्ता. (दोन सरदार प्रवेश करितात)

पहिला-काय हो मग पुढें काय झालें ?

दुसरा-पुढें काय. कोणत्याही मनुष्याला मोठ्या पदवीची जागा द्यायची ह्मणजे त्याची परीक्षा नको कां बघायला ! त्या प्रमाणें पुण्याच्या मुत्सद्दी मंडळानें परीक्षा बघण्याकरितां पाटीलबोवांची माळव्यांत रवानगी केली; “ तुह्मी माळव्यांत जाऊन तिकडे बंदोबस्त करून इकडे नि-

घून यावें " अशा अर्थाचें पत्र पाटीलबोवांस दक्षिणें तून आलेलें पावलें त्या वेळीं ते उज्जनीस अगदीं निरुत्साह होऊन बीडमुक्कामीं जाण्यास निघाले होते.

पहिला—बरें मग पुढें काय ?

दुसरा—पुढें ते जे निघाले तो त्यांनीं थेट राजपुतान्याचा रस्ता सुधारला. राजपुतान्यांत मेवाड संस्थानांत उदेपूरच्या गादी विषयीं तंटा लागला होता. राणा राजसिंग मरण पावल्यावर त्याचा चुलता हरशी हा वास्तविक गादीचा खरा अधिकारी नसतां फक्त मनगटाच्या जोरावर गादी बळकावून बसला होता; त्यामुळें तो सर्व प्रजेला न आवडून तेथील कांहीं बलाढ्य व प्रमूख मंडळींनें, रतनसिंग नांवाचा एक नवाच राणा उत्पन्न केला व त्यास कमळनेर येथें गादीवर स्थापून ते हरशी विरूद्ध लढाण्यास उभे राहिले.

पहिला—सगळाच घोटाळा ! बरें पुढें ?

दुसरा—इकडून आपले पाटीलबोवा तिकडे चाललेच होते. ते जों क्षिप्रा नदीच्या तीरावर तळ देत आहेत, तोंच त्या दोन्ही पक्षांकडून आह्माला मदत पाहिजे अशा मागण्या त्यांच्याकडे आल्या. परंतु पाटीलबोवांनीं रतनसिंगास मदत करण्याचें अभिवचन पूर्वींच देऊन ठेविलें आहे. ही बातमी हरशीच्या लोकांस जेव्हां कळली तेव्हां

त्या लोकांनीं पाटील बोवांच्या छावणीवर एकाएकीं हल्ला करून त्यांस उज्जनीकडे पळवून लाविलें.

**पहिला**–ह्मणजे ह्मणतां काय, पराजय झाला? मोठी वाईट गोष्ट झाली ह्मणायची!

**दुसरा**–पाटीलबोवांचा पराजय होऊन त्यांनां जय मिळाला खरा; परंतु तो फारवेळ टिकला नाहीं. ते हरशीचे लोक लुटी साठीं इकडे तिकडे फिरत असतां पाटीलबोवांनीं त्यांच्यावर असा जोरानें एकदम हल्ला केला कीं त्यांनां जागच्याजागीं गारदच करून टाकिलें.

**पहिला**–तर ह्मणावा शूर; मग पाटील परतले वाटतें?

**दुसरा**–छेः हो! परतात कसले; पढें हरशी ऊदेपूराकडे गेला ही बातमी समजतांच रतनसिंगाच्या लोकांनीं त्यांच्यावर पुन्हा चाल करून जाण्यास सांगितलें, त्या सरशी पाटीलबोवांनीं चाल करून जाऊन शहरास वेढा दिला. आणि एकलिंगाच्या टेंकडी वरून शहरांवर एकसारखा तोफांचा भडीमार सुरू केला.

**पहिला**–मग काय, आंतल्या लोकांची अगदा गाळण उडाली असेल?

**दुसरा**–गाळण कसली. अहो त्या शहराला चोहीं कडून जरी वेढा पडला होता तरी एका

बाजूस मोठा तलाव असल्याकरणानें आरवली डोंगरा कडून काटक लोक आंतल्या लोकांनां अन्न सामुग्री पुरवीत होते. या मुळें वेढा बरेच दिवस तसाच पडला होता. पुढें वेढा अजून उठत नाहीं असें जेव्हां हरशी यानें बघितलें, तेव्हां त्यानें पूर्वी अधिकारावरून दूर केलेल्या अमरचंदास बोलावून आणून निरुपायानें त्यास पुन्हां प्रधानकीचीं वस्त्रें दिली. तो मोठा दूरदर्शी, कावेबाज व काळवेळ बघून काम करणारा असल्यामुळें, त्यानें असें बोलणें लावलें कीं आह्मी तुह्माला सत्तरलक्ष रुपये देतो. तुह्मी वेढा उठवून जावें. परंतु रतनसिंगानें पाटील बोवांस असें सांगितलें होतें कीं, शहर जर हातीं आलें तर सत्तरलक्षाच्या दसपट पैसा आपल्या हातीं लागेल. तेव्हां पैशांची आशा सुटून पाटीलबोवांनीं मागणी जास्तकेली; हें पाटीलबोवांचें कपट अमरचंदानें ओळखून पर्वीचें करार पत्र फाडून त्याचे तुकडे पाटील बोवांकडे त्यानें धाडून दिले; व आपले लोकांस बरेंचसें उत्तेजन देऊन मारा किंवा मरा ह्मणून सांगून तो पुन्हा लढाईला सिद्ध झाला. ही बातमी कळतांच पाटीलबोवांनीं आतां लढणें चांगलें नाहीं असें जाणून पुन्हा बोलणें लाविलें. त्यांत साठलक्ष रुपये रोख व जावडा, निमच, मोरवण आणि मालोनी हे प्रांत त्यांस ब-

क्षीस मिळाले. त्या प्रसंगीं त्यांची पत्नी गंगाबाई, ईस मालोनी येथें देवाज्ञा झाली. तेव्हां तोच गांव तिच्या स्मारका करितां ह्मणून लाऊन दिला; व त्याचें नांव गंगापूर असें ठेविलें.

पहिला—नंतर मग ते पुढें कोणीकडे गेले ?

दुसरा—तेथून जे निघाले ते थेट बीड येथें गेल्यावर त्यांस त्यांच्या या कृत्याबद्दल पुण्याच्या दरबारांतून शाबासकीचीं वस्त्रें मिळाली, व सरदारकी हीं मिळाली; आणि पुन्हां हिंदुस्थानांत स्वारीवर जावें असा हुकूम तत्क्षणीं मिळाला.

पहिला—कां तिकडे काय पुन्हा उत्पन्न झालें ?

दुसरा—तिकडे दतियेकर जाठ फार पुंडाई करित आहेत व 'चौथाई आणि खंडणी यांच्या बाक्या तुंबल्या आहेत त्या देत नाहींत' असें उद्दाम पणाचें त्यांच्याकडून जबाब आल्यामुळें माधवराव साहेबांनीं चिरडीला जाऊन त्यांचें पारिपत्य करण्याचा विचार योजिला; व त्यामुळेंच तिकडे जाण्याची त्यांनां आज्ञा झाली.

पहिला—बरें चला, वाटचालूं लागा. दिवस पहा किती आला तो ! बारा वाजण्याच्या आंत आपल्याला नानांच्या घरीं जाऊन पोहोंचलें पाहिजे.

दुसरा—खरेंच बोलण्यांत बराच वेळ गेला. चला चालूं लागा. ( जातात )

अंक दुसरा समाप्त.

## अंक तिसरा.

—०-००-०—

### प्रवेश पहिला.

**स्थलः**– रान.

**पात्रें**ः–पाटील बोवांची पत्नी पार्वती सरंजामासह उज्जनीस चालली आहे.

**पार्वतीः**–अरे भिमाजी मला थोडं त्या पलीकडच्या विहीरींतून प्यायला पाणी आणून देरे, फार तहान लागली आहे. कोण तरी बाई उन्हाचा कडाका हा !

**भिमाजीः**–आणतो बाई साहेब ( पाणी आणण्यास जातो. )

**पार्वतीः**–( दुसऱ्यास ) कायरे हनमंता, आपण ऐकलं होतं कीं शिरसिंग ठाकूर आतांशें बंडाळी करून आपल्या मुलुखांतील लोकांनां फार त्रास देतो; तें खरं कायरे ? काय तरी बाई नाहीं नाहीं तीं नवी संकटं गुदरतात !

**हनमंता**–आई साहेब, उज्जनला जायचा रस्ता मागें राहून चुकन त्याच्याच मुलुखाच्या हद्दींत आपण आलों आहो. तरी पण आपल्याला भिण्याचें कांहीं कारण नाहीं; आलीच वेळ तर आह्मी मागें घेऊं असें आपण बिलकूल समजूं नये.

**पार्वती**:—छेः तसं मुळींच नाहीं, पण समज आलीच तशी वेळ अन् तो आपल्या बरोबर बरेच लोक घेऊन आला तर तुह्मी एवढेसे लोक त्याच्या पुढें काय रे करणार ?

**हनमंता**—वेळ तर येउंद्या ह्मणजे मग हा हनमंता आपली कृती हनुमाना सारखी करण्यास कधीं हीं मागें घेणार नाहीं. शूराचें खाल्लेलें अन्न कधीं ही फुकट जाणार नाहीं. ( भिमाजी पाणी घेऊन येतो. )

**भिमाजी**—बाईसाहेब हें पाणी द्या.

**पार्वती**—( पाणी पिऊन ) हं हाका गाडी ( दोन भिल्ल येतात. )

**१ ला भिल्ल**—कोणाची गाडी आहे ती उभी करा !

**पार्वती**-अग बाई हें काय ? हनमंता, आतांच तुला ह्मणत होतेंना ? बघ आलीच वेळ. मेले, यम आहेतका कोण, कुणाला ठाऊक ! देवा, आतां आमचा त्राता तुझ्या शिवाय कोणी नाहीं.

**हनमंता**—आई साहेब आपण स्वस्थ असा. आपल्या एका केसालाही धक्का लागूं देत नाहीं. फक्त गम्मत काय होते ती पहा.

**पार्वती**—जीव जायची वेळ आली अन् मेल्या गम्मत कसली ! खरंच मी बीडाहून एकटींच न निघतां स्वारी गेली त्या वेळेला बरोबर गेलें असतें

ह्मणजे या वेळीं उज्जनीस सुखासमाधानांत असतें. पण मेलं हें अरीष्ट यायचं होतंना ? मग तशी इच्छा कुठची व्हायला.

**हनमंता**-आई साहेब बिलकूल घाबरूं नका (भिल्लास) कायरे तुह्माला कोण पाहिजे ? आह्मी वाटसरूं आहोंत.

**२ रा भिल्ल**-कोणीकडून आलांत व चाललात कोणीकडे ?

**हनमंता**-मोंगलाईत बीड ह्मणून एक शहर आहे तेथून आलों व चाललों उज्जनच्या शिंद्यांच्या लष्करांत.

**पहिला भिल्ल**-( दुसऱ्यास ) कायरे मग हेंच दिसतें आहे संधान; चला महाराजाकडे घेऊन ( उघड) पण गाडींत कोण आहेरे ?

**हनमंता**-कोणीकां असेना तुला काय करायचें आहे ? आपल्या वाटेनें चालता हो. नाहीं तर विनाकारण प्राणांस मुकशील. ( तलवार उपसतो )

**१ ला भिल्ल**-( तलवार उपसून ) कां फारशी जीभ वळवळते आहे, मुकाट्यानें सांगायचें आहे कीं नाहीं ? ( असें म्हणून गाडीकडे जावयास लागतो तों हनुमंताची व त्याची मारामारी सुरू होते. )

**पार्वती**-( आपल्याशीं ) आतां मात्र माझी कांहीं धडगत दिसत नाहीं; हे मेले भलतीच वासना

धरून आले नसतील ना ? हो काय नेम सांगावा जसा राजा तशी प्रजा ! ईश्वरा, मी तुझा असा काय अपराध केला होता ह्मणून हें असलं अरिष्ट तूं माझ्यावर आणलंस ! देवा, या संकटांतून सोडवून जर तिकडली व माझी गांठ पडेल तर खरोखर महांकाळाला मी सोन्याचा कळस करीन. ( रडूं लागते इतक्यांत शिरसिंग रागावलेला प्रवेश करितो.

**शिरसिंग**—कोणरे ते माझ्या लोकांशीं झटापटी करताहेत, दमधरा ( असें म्हणून दोनतीन जणांना वार करून पाडतो ) अरे या गाडींत रडतं आहे कोण ? ( गाडींत पार्वतीला बघून ) अँ हे काय ? कोण ही ? येवढा थोरला झक्पक् पोषाख ! शालून्, दागिनेन् कोण आहे बुवा ही ?

**भिमाजी**—महाराज या बाई एका शूरसरदारांच्या पत्नी आहेत. मार्गानं चालत असतां हे दोघे एकदम आले व गाडी उघडून बघूं लागले तों त्या आपण वार करून पाडलेल्यांची व यांची झटापट सुरू झाली व इतक्यांत आपण आलांच.

**शिरसिंग**—मग तुह्मी त्यांना बघून कां दिलं नाहीं ? माझा त्यांना तसा हुकूमच आहे ( गाडीकडे) चला आंत कोण आहे ते खाली उतरा.

**पार्वती**—ज्या गोष्टींच मघाशीं मला भय वाटत होतं ती येऊन ठेपलीचना ! बरं आतां धीर सोडतां

उपयोगी नाहीं, जशी वेळ येईल तसं वागलंच पाहिजे ! ईश्वरा मला तुझं साह्य असूं दे एवढंच तुझ्या जवळ माझं पदर पसरून मागणं आहे ( उघड ) महाराज ! ही उतरलें, आपलं काय ह्मणणं आहे ?

शिरसिंग—( सौंदर्यानं आश्चर्य चकीत होऊन ) ( आपल्याशीं ) अरे ही देवागना आहे कीं यक्षिण आहे कीं गंधर्व कन्या आहे, आहे तरी कोण ! अहाहा ! काय ही सौंदर्यप्रभा ! विचारूं का ईला तूं कोण आहेस ह्मणून ! प्रमाद तर नाहींना होणार, विचारावंच ( उघड ) बा—बा—बाई आपण कोण आहांत ?

पार्वती—( आपल्याशीं ) यानं प्रथम बाई तर ह्मटलंन, यावरून वासना तर बरी दिसते; पण नेम काय सांगावा ? पुरुष हे ! वेळीं पशू सुद्धां यांच्या कृतीला लाजतील ( उघड ) महाराज मी वीरपत्नी आहे !

शिरसिंग—काय ? वीरपत्नी ! अन् मृत्युलोकींच्या कीं स्वर्गलोकच्या ?

पार्वती—मृत्युलोकचीच.

शिरसिंग—खरें कीं काय ? अहाहा ! ईश्वरा ! ही अद्वितीय लावण्यचारुगात्री ज्याच्या पदरांत घातली असशील, तो किती बरें धन्य समजला पाहिजे ? हें पहा, आपल्याबद्दल त्या गृहस्थानीं

मघाशीं सांगितलें कीं आपल्याला शिंद्याच्या छावणींत जायचें आहे, तर मी ह्मणतों कीं लष्कर इथून बरेंच लांब आहे ह्मणून पांच चार दिवस माझ्याघरीं विश्रांति घ्या, व मग चला.

पार्वती–छेः, मला लवकर तिकडे गेलं पाहिजे, तिकडली प्रकृति फार बिघडली आहे.

शिरसिंग–बरें, आपल्या यजमानांचें नांव काय ? ते माझे मित्र किंवा शत्रु ?

पार्वती–आपलं नांव काय ?

शिरसिंग–मला शिरसिंग ठाकूर असें ह्मणतात.

पार्वती–खरंचका ? मग आपलीन् तिकडली बरीच ओळख आहे.

भिमाजी–त्यांनां महादजी उर्फ पाटीलबोवा शिंदे असें ह्मणतात.

शिरसिंग–काय शिंदा ! तो तर माझा पुरा हाड वैरी आहे ! त्याच्या ह्या पत्नी कीं काय ! सूड घेण्याचा मोका तर खूप नामी आहे बुवा ! ( तिचा हात धरून ) चला, आतां काय, उद्यांच्याच मुहूर्तावर उरकून टाकूंनि काय.

पार्वती–मेल्या कांहीं लाज असूं दे ! इतक्यांतच मेल्या मला बाई ह्मणून हाक मारलीसनां ? चल सोड मला, मेला ह्मणतो उद्यांच्याच मुहुर्तावर उरकून टाकूं !

**शिरसिंग**—असें काय बरें ! तुला मी आपला दुसरा प्राण मानीन. चल घरीं ! एथें रानांत किती वेळ उभें राहायचें ? ( भिमाजीस ) कांहो यायचनां ?

**भिमाजी**—महाराज जो निव्वळ बैलाचीच कृती करूं लागला त्याला बैलोबाच ह्मणावं कां ?

**शिरसिंग**—( तलवार उपसून वार करण्यास धांवतो ) काय ह्मटलेंस ? माझा अपमान्, अन् तो प्रत्यक्ष माझ्या डोळ्यां देखत ( इतक्यांत भोपाळचा दिवाण येतो व हात वरच्यावर धरतो )

**दिवाण**—ठाकूर साहेब ! काय हें ? आतां आपल्या हातून ब्रह्महत्या घडत होतीनां ! वाः फार चांगलं ! पार्वतीबाईसाहेब, आपण इकडे कोणीकडे आलांत ? अन् हें आहे काय ?

**पार्वती**—असायचं काय ! तें पहा मेल्याचं कसं खापरासारखं तोंड झालं आहे तें ! मला तो लग्न लावायचं-( जांबिया काढून ) याच्याशींच लग्न लावलं असतं चांडाळा ! अशाच गाई रानांत गांठून त्यांचा छळ करतोसनां ? मेल्या ! कित्येक पतिव्रतासाध्वींनां भ्रष्ट करून त्यांचे श्राप बोडक्यावर घेतले असशील ! तोंडाला त्या आग नाहीं लागली निलाजऱ्याच्या ! सत्यनास हो मेल्याचा !

**दिवाण**-बाईसाहेब जरा शांत व्हा ! मी आपली उज्जनला सुखरूप पोंचवण्याची तजवीज

लवकर लावतो. पण आपण मला ओळखलंत कां! इतकें दिवस आपलेंच अन्नांवर वाढून सध्यां ज्याला भोपाळची दिवाणगिरी मिळाली आहे तो हा आपला जुना सेवक आहे.

पार्वती–भोपाळचे दिवाण ते आपणच का!

दिवाण–होय आईसाहेब!

पार्वती–खरंच आपण जर या प्रसंगीं इथें अवचीत आलां नसतां तर या चांडाळानं काय अनर्थ केला असतान् कोणाला ठाऊक!

दिवाण–मीही भोपाळला जाण्याकरितां प्रवास-क्रमांतच आहें! हें पहा ईश्वर व्यसनार्णवीं बुडत असलेल्याला कोणच्यान् कोणच्या तरी रूपानें हात द्यायला तयार असतोच! बरें चला. आपल्याला श्रम बरेच झाले आहेत! तर चला गावांत जेवण करून उंज्जनचा रस्ता धरूं.

पार्वती–बरं, चला. या उपकाराबद्दल ईश्वर तुह्माला सुखी ठेवो!!

प्रवेश पहिला समाप्त.

## प्रवेश दुसरा

**स्थलः**–रस्ता.

**पात्रें**:–गंगाधरयशवंत विचार करीत येतो.

**गंगाधरः**–पाटिलबोवा ठार झाले, ह्मणजे नूरजहान हस्तगत होईल. अशी फाकड्याला त्याचा प्राण जावा ह्मणून मी सल्ला दिला. पण शेवटीं पाटिलबोवांनीं त्याला कैदच केलें; हं तरी त्याच्यावर माझे उपकार झाले आहेत कीं नाहीं? फाकडा जर त्यावेळीं पाटिलबोवांकडून ठार झाला असता तर आज स्वस्थ हरि हरि तरी ह्मणत बसलों असतों. मग आजपर्यंत उपटलेला पैसा परत करणें कसलें न् काय कसलें. बरें ही स्वारी कैदेंतून सुटल्यावर तरी ज्याबद्दल कैदेंत पडली त्या गोष्टीची वार्ता सोडून देईल ह्मटलें तर तें कांहींच नाहीं. पुन्हां आपले पहिले पाडे पढो पंचावन्! बरें पण आजपर्यंत पैशाच्या हावेनें ते वाघाचें काळिज नूरजहान त्याला मिळवून देतों, ह्मणून थोड्या का मी गप्पा मारल्या, तशांतलीच आज ही एक द्यावी ठोकून. पुढला विचार पुढें! हो! काल त्याला एक सुक्की थाप दिलीच आहे! आणतो बरें! तिला याच रस्त्याच्या मुरलीधराच्या देवळाच्या मागच्या आंबराईत, तुला तिच्या जागीं तोच भेटवितों. मग त्या एकमेकांचे जीव, त्या मांगाला तर मुळींच भिती नाहीं. एकदां तूं ठार झालास कीं झालेंच माझें काम! जावें आतां व द्यावी त्या मांगाला इशारत. ( जातो व फाकडा येतो )

मानाजीः–गंगाधर अजून कां बरें आला नाहीं. त्याच्या कालच्या वचनांत कांहीं फसवा फसवी तर नसेल ना ? जर का बच्चमजी यावहाद्दराशीं तसें कांहीं केलेंत, तर गोता खाल्लातच ह्मणून समजा ! छे ! पण ही माझी काल्पनिक स्थिति चुकीचीच असली पाहिजे ! आजपर्यंतच्या अनुभवावरून तो तशांतला आहे असें मी कधीं ह्मणणार नाहीं, असो, आतां या वृक्षांच्या संथशा छायेत, कोकिलगणांचा माधुर्य शब्द श्राव्य करीत बसावें ! ठरल्याप्रमाणें तो इकडे येण्यास कधींच चुकायचा नाहीं ! वस्तु तर बहुतकरून प्राप्य झालीच असली पाहिजे ! आतां ती सौंदर्यखनी या आंबराईत आली ह्मणजे मानाजीराव द्या मग उडवून न् बहार ! हः हः हः हः ! फाकड्या, तूं खरोखर लल्लाटवान् आहेस. नाहीं तर कैदेंतून सुटला असतास का ? ( गंगाधर येतो )

गंगाधरः–( बघून आत्मगत ) स्वारी तर येऊन स्वस्थ वाट पहात बसली आहे. आतां जराशी मजा उडवावी ! ( पुढें होऊन ) सरकार ! आपल्याला एथें येऊन बराच वेळ झाला वाटतें ?

मानाजीः–दिवाण, वेळ कसला न् काय कसलें आह्मी आपला सर्व देह या कामीं कैलासवासी

घालून देऊं ? आणि ह्मणे बराच वेळ झाला वाटते !

गंगाधरः—मला तरी तेवढेंच पाहिजे आहे ? आपला मनोनिग्रह तसा झाला असला ह्मणजे मग काय ! आकाश सुद्धां आपण पालथें पाडूं, मग त्या यवनीची हो काय कथा ?

मानाजीः—तें जाऊं द्या ! पण ती आली ना ?

गंगाधरः—मग शंका आहे कीं काय ?

मानाजीः—कुठें आहे ? इकडे बोलवा कीं ?

गंगाधरः—अहो इथें नाहीं आली ती ! याच शहरांत आहे.

मानाजीः—मग ती इथें येणार केव्हां ?

गंगाधरः—उद्यां किंवा परवां ! परवां नाहीं आली तर तेरवांच्या दिवशीं खात्रीपूर्वक येईन असें तिनें मला वचन दिलें आहे.

मानाजीः असें काय ! आतां मात्र तुमचें सर्व कृत्य आमच्या वक्षस्थलीं बिंबायमान् झालें ! असल्या फसवाफसवीच्या गोष्टी आह्मांला सांगतां का ? आजपर्यंत बिनतक्रार दाहापासून दाहालाखपर्यंत किंमतीची मी आपली चीजवस्त तुमच्या नादीं लागून खराब केली. तुमच्या नादानें पाटीलबोवांस ठार करण्याकरितां गेलों. त्याप्रसंगीं मी स्वर्गींच गच्छायमान व्हावयाचा पण त्यांचें व

माझें भावाचें नातें लागतें ह्मणून दयाळू होऊन त्यांनीं मला फक्त कैदेंतच ठेवलें.

**गंगाधरः**–अन् कैदेंतून सोडविलें कोणी ?

**मानाजीः**–बस्स करा ! मोठे उपकारच केलेत ! आजपर्यंत चैन कोणाच्या जिवावर मारलीत ? अन् ह्मणे कैदेंतून कोणीं सोडविलें ? तुह्मीं असें लौच्य कराल असें माझ्या स्वप्नीं नव्हे तर जागृतावस्थेंत सुद्धां मनिषीं प्राप्त झालें नव्हतें. इतके दिवस वाटेल तसें माझें द्रव्य उपरायमान करून माझ्या शरीराला मात्र चिंतेची काळकळय लावून तें घाण करून टाकलेंत ! आणि आतां पुन्हां आह्माला उद्यां, परवां, तेरवां त्याच्या तेरवां अशा लांबवा लांबवीच्या गोष्टी सांगता का ? बस्स, आजपर्यंत आमचा खर्च झालेला पैसा आमचा आह्मांला आतां द्या. नाहींतर ( तरवारीला हात घालतो ) इथेंच उडवतो.

**गंगाधरः**–हं ! महाराज संभाळा ! मी एथें एकटाच असेन असें बिलकूल समजूं नका ! ( हाक मारण्याचं सोंग करतो ) कोण आहे रे बाहेर, कुशाबा, चला पकडा ! महाराजांना वेड लागलें आहे !

**मानाजीः**–( घाबरून ) नाहीं तसें नाहीं दिवाणजी ! मी आपलें तुमचें मन बघितलें ! आह्मी शूर पुरूष कंदर्पाच्या जाज्वल्य तैखव्यानें कसें

हुळुके झालों आहोंत हें तुझांला नाहीं का माहीत? मग असें काय करतां बरें ?

गंगाधरः-( आपल्याशीं ) गर्दभा, असा नीट शुद्धीवर ये ! ( उघड ) महाराज, आपणा सुंदर मोहक रत्नाकरितां पैसा, वेळ व शरीर यांची हानी करूं नये तर कशाकरितां करावी ! अहो, वेश्या ह्मणजे देवांच्या बायका प्रतिअप्सराच ह्मणानात ! अप्सरा प्राप्त करून घेण्याला स्वर्गांत जावें लागतें हें तर आपल्याला माहीत आहेनां आतां ? या कलियुगांत तें सर्व बंद झालें आहे. ह्मणून त्याचा लाभ करून घेणेंहीं बंदच झालें आहे, असें मात्र आपण समजूं नये ! आपल्या सारख्यांवर खूष होउन त्या कधीं कधीं पृथ्वीवर ही उतरून ये- तात. मेनका विश्वामित्रावर भुलून पृथ्वीवर आली होती असें पुराणांतरीं लिहिलेलें आहे तें आपण ऐकलेंच असेल ! तेव्हां मेनकेप्रमाणेंच ही नूरजहान वेश्याही आपल्यावर खूष झालेली आहे. ह्मणून घ्या आतां स्वर्गसूख ! ती मवांशीं मला ह्मणाली कीं, " कामज्वरानं माझ्या अंगाची अशी लाही होतें नि वाटतं कीं त्या फाकडे बहादराना जाऊन एकदम घट्ट प्रेमालिंगन घ्यावें. पण मला धीरच होत नाहीं.

मानाजीः-काय ह्मणतां काय हें ( आनंदानें )

खरेंच का ती असें ह्मणाली ! छेः कांहीं तरी बोलता !

**गंगाधरः**—अगदीं अस्सें ह्मणाली.

**मानाजीः**—मग त्याला युक्ती आहे !

**गंगाधरः**—ती कोणची ?

**मानाजीः**—अहो तरुण जोडप्याची प्रथम स्थिति कशी असते तशीच इची स्थिती झाली आहे. अन् दुसरें काय ? याला धीर चेपायला उपाय ह्मटला ह्मणजे कान करा ( कानांत सांगतो ) असाच रंग एथें ही उडवला पाहिजे ! कां असेंच किं नाहीं ?

**गंगाधरः**—काय आपण युक्ती काढलीत पण ? अगदीं बेमालुम !

**मानाजीः**—काढणारच ! ते सर्व खरें, पण ती आज नाहींना मिळत ? कां मिळतें ? दिसतें, चिन्ह दिसतें आहे ! तोंडावरचा तजेलाच सांगतोन्.

**गंगाधरः**—पण बक्षीस काय द्याल ?

**मानाजीः**—मागाल तें.

**गंगाधरः**—पहा बरें, हटाल सरकार !

**मानाजीः**—आजपर्यंत कधीं हटलों नाहीं व पुढेंहीं हटायचा नाहीं !

**गंगाधरः**—फारसें कांहीं नको ! ती तेवढी हतांतली ( आपल्याशीं ) पण हा आतां ठार मेल्यावर याची अंगठी मजजवळ आहे अशी बातमी

लागल्यावर मींच याला ठार केला असें ह्मणून माझ्याच मुसक्या अवळल्या जातील. नाहीं, पण मी याचा दिवाण आहे हें सर्वांना माहीत आहेच. शिवाय मोल्यवान अशी याच्याजवळ ही एक अंगठीच राहिली आहे. बाकी तर धुतला गेला आहे. घ्यावी झालें ( उघड ) आंगठी द्यावी. ह्मणजे तिची व आपली पहिली भेट करून दिल्याची माझ्याजवळ खूण राहील !

**मानाजीः**— एवढेंचना. ही घ्या ! ( आंगठी देतो ) दाखवा आतां ?

**गंगाधरः**—माझ्या देखत ती आपल्याशीं शृंगार करायला लाजेल ह्मणून मी इथून जातो. त्या पलीकडच्या चवथ्या आंब्याच्या झाडाखालीं ती बुरखा घेऊन उभी आहे. मी दृष्टीआड झालों ह्मणजे मग, क्रीडेला सुरुवात करा ! प्रसंगविशेषीं प्रार्थनाही करा ! ( मनांत ) मानाजीपतंगा आतां त्या मांगाच्या लखलखीत खड्ग जोतीवर तुझी झडप पडून तूं स्वर्गातल्या अप्सरेचा उपभोग घेणार बरें, तूं मेल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. ( उघड ) जातो सरकार, मी सांगितलेलें लक्षांत आहेना ? ( जाता-जातां मांगास खूण करितो. )

**मानाजीः**—सर्व लक्षांत आहे. ( गेलासें पाहून ) आतां जावें पुढें. ( पुढें होऊन ) हे लावण्य लतिके,

गुणशीले, नूरजहान तरुणी ! हा तुझा दास मानाजी तुझा मुखगांध्य पिण्याची इच्छा करितो आहे ! चल ये, दे याला एकदां कडकडीत भेट ! नको अंत पाह्यला लावूंस ! तुला मी शरण आहे ! अहाहा ! कायहा तुझा सडपातळ ठेंगणा ठुसका नाजुक गोंडस गुळगुळीत बांधा ! हे अप्सरे, माझ्याशीं क्रीडा करून मला स्वर्गसूख दे ( मांग बुरखा काढून स्वर्गसूख देण्याकरतांच मी हें नग्न हत्यार आणिलें आहे, असें म्हणून पुढें उभा राहतो. मानाजीची बोबडी वळून तो घाबरून जातो. व म्हणतो. ) ना–ना–ही–ही–र–ति–सू–सू–ख नको. मला, देवाधिदेवा, महारुद्रा, जीवदान द्या. आजपासून मी परस्त्री-इच्छा कधींही धरणार नाहीं. सर्व स्त्रिया मला माते समान आहेत.

**मांगः**—तुह्मांला जीवदान दिल्यावर उपकारांची फेड कशी कराल ?

**मानाजीः**—सांगाल तशी !

**मांगः**—मी जातीनें मांग आहे. आज तुह्माला ठार करण्याकरतां मी शंभर होन घेतले आहेत, त्याच्या दसपट होन मला देऊन गंगाधरयशवंताच्या केंसाला धक्का न लावतां व तुह्माला मी सोडिलें ही बातमी त्याला न कळवितां मोठ्या त्वरेनें इथून निघून जावें.

**मानाजीः**—मला कबूल आहे ! मी आपला पुण्यास जाऊन पेशव्यांच्या पाशीं स्वस्थ राहतो ! मला कोणी नको. (आपल्याशीं) वक्कें गाडून देतो म्हणून श्रीमंतांच्या पोरानां नादी लावून हे लोक असें धुपाटणें हातीं देतात ना ! यानां भडवे म्हणतात तें अगदीं बरोबर आहे. एकंदरींत या नादापासून जितकें अलिप्त राहवेल तितकें जगानें रहावें या सारखें सुख नाहीं (उघड) बरें चल, तुझ्या कबूलाती प्रमाणें मी तुझी फेड करतो व तत्क्षणीं हें शहर सोडून पुण्यास चालता होतो ! (जातात)

**प्रवेश दुसरा समाप्त.**

---

## प्रवेश तिसरा.

**स्थलः**—उज्जनीमधला पार्वतीचा महाल.

**पात्रें:**—पार्वती सचिंत विचार करीत बसली आहे.

**पार्वतीः**—खरंच आह्मा बायकांची जात कोणच्या वेळीं काय करील याचा कांहीं नेमच सांगवत नाहीं, असं जे ह्मणतात तें अगदीं खरं, अशी माझी, त्या नूरजहानच्या कृतीवरून पक्की खात्री झाली.

तिला इकडून घरांत ठेवायची झाली आहे पण हें मुद्दाम विषाचं भाडं घरांत आणायचं झालं, असंच मी ह्मणते. त्या मेलीचा इंग्रजांशीं, नेहमी पत्रव्यवहार होत असतो ह्मणून मी लक्ष वेळा तिकडे सांगितलं. पण मदनबाधेनं धुंदी चढलेल्या त्या नेत्रांवर त्याचा कांहींच प्रकाश पडत नाहीं! देवा आमच्या घराण्याच्या अब्रूची जर तुला कांहीं कींव येत असेल तर, रानांमध्यें कीचक जातीचे वेळू भुंग्यानीं कोरले असतां त्या नळयांतून वायू वाहून मनोहरसा आवाज निघूं लागला ह्मणजे हरणं जशीं कान देऊन सलक्ष तो आवाज ऐकत उभीं राहतात, त्या प्रमाणें माझी वाणी मधुर करून तिकडे माझं बोलणं सलक्ष ऐकण्याची बुद्धी दे; नाहींतर माझे तरी एकदांचे डोळे मिटीव ह्मणजे पुढे होणाऱ्या हाल अपेष्टा व दुर्लौकिक पाहण्यांचं व ऐकण्याचं माझ्या नशीबीं येणार नाहीं. हें इंग्रजांकडून तिला आलेलं गुप्त पत्र आतां मी तिकडे दाखवून कायतो निकाल करून घेणार. गुप्त पत्रें पकडण्याविषयीं आजपर्यंत मी किती तरी खटपटी केल्या पण कालच हें पत्र कसं अचुक माझ्या हातांत आलं! असो! इतकंही होऊन जर तिकडचे डोळे उघडले नाहींत तर माझं दुर्दैव! ( पाटील येतात. )

पाटील:—कां, काय, विचार कसला चालला आहे ? चेहरा अगदीं उदास झाला आहे ? पण दुर्दैव कसलें व कोणाचें ?

पार्वती:—आपणा सर्वांचं न् दुसरं कोणाचं ?

पाटील:—ह्मणजे काय बुवा ?

पार्वती:—दुसरं तिसरं कांहीं नाहीं, आपली नुरजहान ह्मणजेच दुर्दैव.

पाटील:—अलीकडे तूं बिडाहून येथें आल्यापासून तिचा अधीकच द्वेष करूं लागली आहेस हें चांगलें नाहीं; यापूर्वीं मी तुला या गोष्टीबद्दल बऱ्याच वेळां सांगितलें होतें ना ?

पार्वती:—मी सुद्धां, ती कोणत्या तऱ्हेची बायको आहे याबद्दल पुष्कळ वेळां सुचवलं होतं कां ?

पाटील:—असेल ! बरें मग ह्मणणें काय ? पण मी याच का गोष्टी ऐकण्याकरितां तुझ्या महालांत आलों आहे ! ज्या कामांत बायकांची सल्ला घ्यावयाची त्याच कामांत घेतली पाहिजे; शिवाय नूरजहान माझ्याशीं दगलबाजी करील असें मला मुळींच वाटत नाहीं. त्यांतून त्या गोष्टीची चवकशी करतां येईल.

पार्वती:—चवकशी करतां येईल असं ह्मणून स्वस्थ बसण्याची वेळ आतां उरली नाहीं ! आ-

तांच्या आतां त्या गोष्टीचा कायतो निकाल लावला पाहिजे.

पाटीलः—काय, आतांच्याआतां निकाल लावला पाहिजे ?

पार्वतीः -होय.

पाटीलः-संभाळबरें, नूरजहान फितुरी करणारी नाहीं अशी माझी पक्की खात्री असतांनां, सवतीमत्सरानें, ती तशीच आहे ह्मणून पुनः पुन्हा तूं मला प्रपादते आहेस ! तर संभाळ ! या गोष्टीः बद्दल तुला चांगलाच पुरावा आणावा लागेल.

पार्वतीः एवढेंचना ? तिचान् इंग्रजांचा गुप्तपत्रव्यवहार चालतो, ती इकडल्या सर्व कारस्थानांच्या बातम्या फोडते व तेवढ्याकरतांच तिला त्यानीं इथें ठेवली आहे ह्मणून जें मीं वारंवार इकडे सुचवीत असतें, तें बिन पुराव्यानं सुचवतें अशी आपली समजूत झाली आहे ह्मणावयाची ? तशी जर समजूत झाली असेल तर मग मी आक्रोडाच्या झाडाला एरंडचा आणणारी आहे असं ह्मटलं असतां चालेल. महाराज, इंग्रजांकडून तिला नेहमीं जीं पत्रं येत असतात त्यांतलंच हें मीं काल मोठ्या दक्षतेनं पकडलं आहे तें आपण वाचून पाहिल्यावर हिऱ्याचीन् कोळशाची आपल्यास सहज पारख करतां येईल ! ( पत्र देते. )

**पाटील:**—( पत्र वाचून ) तिला घालवून द्यावी एवढ्याकरितांच हें सर्व कुभांड तूं रचलें नसशील कशावरून ?

**पार्वती:**—हें मी मुद्दाम सर्व कुभांड रचलें आहे अशी जर आपली समजूत होत असेल तर माझा नाइलाज आहे. पण, आपण राज्यकार्यधुरंधर, मराठी राज्याचे आधारस्तंभ व वीराग्रणी, असं आपल्य [illegible]त असून, शत्रूंनीं आपल्या छातीशीं कामरूपीं सुदर्शनचक्र जें लावून ठेवलं आहे, त्याचा बोभाट आजना उद्यां केव्हांना केव्हां तरी होणारच; आणखीं तसं झाल्यावर मग दुर्लौकिक कोणाचा होईल ?

**पाटील:**—काय ? दुर्लौकिक ! आणि तो माझा ? पार्वती तूं हें सर्व विचारपूर्वक बोलते आहेस ना ? ज्यामुळें माझा दुर्लौकिक होणार आहे ती गोष्ट तूं मला मी शहाणा असून अज्ञानांधःकारांत बुडालों आहे व कामरूप लोहशृंखलेनें जखडबंद झालों आहे असें समजून, बजावून सांगते आहेस ! तेव्हां या सर्व गोष्टी जर खऱ्या ठरल्या तर मग मी तुझ्यावर आतांपेक्षां जास्त प्रीती करीन, इतकेंच नाहीं तर तुझ्या अर्ध्यावचनांत राहीन; आणि जर खोट्या ठरल्या तर मग मात्र, प्रसंग भयकर येईल याचा नीट विचार कर.

पार्वतीः—प्रत्येक गोष्ट मी विचार करूनच करीत असते.

पाटीलः—( आपल्याशीं ) ही जेव्हां वारंवार बजावून सांगत आहे, तेव्हां यांत कांहीं तरी तथ्यांश असला पाहिजे. ( पत्र पुन्हा पाहून ) काय ? इचें पत्र' वेळेवर पोंचलें ह्मणून हिला इंग्रजांकडून आभार दर्शक पत्रें ? जिला मी आपला प्राण असें ह्मटलें, त्या माझ्या नूरजहान सुंदरीचें माझ्याशीं असें वर्तन अँ ! सुंदरी कसली ! ही प्रत्यक्ष राक्षसीण ! माझ्या डोळ्यादेखत माझ्या छातीवर विषदिग्ध-खडकाचा प्रहार अँ ! छे, आतां मात्र हें असह्य होत चाललें ! भ्रमरपंखाप्रमाणें काळे भोर ते तुझें कुरळेकेश तुझ्या मस्तकावर असल्या कारणानें त्यामध्यें नागराजाच्या मस्तकांतल्या अप्रतिम, मण्याप्रमाणें तुझ्याही मस्तकांत तसाच अप्रतिममणीमेंदू असेल असें समजून मी आजपर्यंत राजकारस्थानाच्या सर्व गोष्टी तुझ्याजवळ बोललों, परंतु त्या दिव्यमणिमेंदूत ज्याचा एकच थेंब संपूर्ण जगाचे भस्म करण्यास समर्थ होईल असें महा भयंकर कालकूट वीषच भरलें आहे ना ? हाय हाय ! ! यापेक्षां माझें दुर्दैव तें कोणचें ! माझ्या गुप्तगोष्टी शत्रूला कळून माझे सर्व बेत नेहमी ऐनप्रसंगीं फसतात कसें ? याचें मला

आजपर्यंत मोठें गूढ होतें ! जी आजपर्यंत मला केवळ सौजन्याची मुर्तीच वाटत होती, तिनें असलें हें काळसर्पिणीचें वर्तन चालविलें आहे अँ! छे, आतां मात्र हा क्रोधानल जास्त भडकूं लागला, दुर्दैवाचा सपाटा, राहूकेतूंची व्याप्ती आणि भूगोलावरचे भयंकर अनर्थापात, हे काय करतील व काय नाहीं हें कांहीं सांगवत नाहीं ! अवदसे ! केवढा निमक हरामपणा हा ! विवाहित असोत, गतभर्तृका असोत अथवा वेश्या असोत, स्त्रिया ह्मणजे निमकहराम, साहसी व पूऱ्यादुष्ट अशी माझी पक्की खात्री झाली. पार्वती ! चुकून–समजून–उमजून तर नाहींच, परंतु पूर्वपुण्याईनें अथवा सुदैवानें जर कदाचित् तुझें ह्मणणें खरें ठरलें व नूरजहान माझ्याशीं दगलबाज होऊन, आजपर्यंत मी समजतों आहे त्याप्रमाणें तिचें माझ्या विषयींचें प्रेम खोटें ठरलें तर खरोखर आजपर्यंत मी तिच्यावर केलेल्या प्रीतीची रांखरांगोळी झाली समज. बस्स ! झाला इतका संबंध ! आतां या शस्त्रानें पुढे होणाऱ्या दुर्लौकिकापेक्षांहीं कमीच वाटणारें असें जें स्त्री हत्येनें पातक तें मी करणार! काय, पण नूरजहानला ठार करूं ? छेः ! जी आपल्या सौंदर्यानें, सुस्वभावानें व अकलेनें माझ्या गळ्यांतला ताईत बनली आहे व प्रत्येक गोष्टींत

जिच्या विचाराविरुद्ध मी एक पाऊलही गेलों नाहीं व जिला या हस्तांनीं कुरवाळून प्रेमालिंगन देतो, तिला त्याच या हातांनीं या जगांतून उडवूं? नाहीं हें साहस तर आपल्या हातून कधींही होणार नाहीं. हायरे दुर्दैवा ! ( खाली पडतो व पुन्हां उठून ) नाहीं ! अवदसे ! माझ्या अपरोक्ष ज्या गोष्टीं तूं करते आहेस त्यांचा उलगडा माझ्या डोळ्यां देखत झाला पाहिजे, व मग मीच यम-दूत नव्हे तर प्रत्यक्ष यमाचाही शास्ता बनून तुला असह्य यातना भोगण्यास लावीन; होणारी भावी स्थिती आज मला कळली हें केवढें माझें सुदैव ! ती होणारी भावी स्थिती कोणची तर दुर्लौकिक. हाय ! हाय ! विजांचा भयंकर कडकडाट ! दावाग्नीचा लोळ ! ! व भूकंपाचे जबरदस्त प्राणनाशक धक्के, हें सर्व, मनुष्य प्राणी सहन करील पण होणाऱ्या दुष्कीर्तीच्या यातनें पुढें तें सर्व व्यर्थ होत ! माझ्या ह्दयासीं चिकटून राहून नागिणीचा प्रकार करूं पहात आहे ! रांड ! यापेक्षां निमक-हरामीचें, साहसाचें व नीचपणाचें ढळढळीत उदाहरण तें कोणचें ? बस्स झाला निश्चय ! खरें ठरलें तर कैदकरून सर्व उज्जनभर धिंड काढून देहांत शासन हीच शिक्षा ! चल, पार्वती ! पण लक्षांत ठेव चांडाळणी ! तुझें सर्व ह्मणणें व करणें

जर खोटें ठरलें तर माझी प्रियकरणी नूरजहान पूर्वी प्रमाणेच शुद्ध आहे असें समजून फक्त सवती-मत्सरानें हें सर्व कौटाळ तूं रचलें आहेस असें समजून तिला जी शिक्षा देण्याचें ठरविलें आहे ती तुझ भोगावी लागेल विचार कर !

**पार्वती**:—हा सूर्य नि हा जयद्रथ असं झालं ह्मणजे भ्रमाचा भोपळा फुटणारच.

**पाटील**:—चल, ह्मणून तिच्याच महालांत चल. ( जातात. )

प्रवेश तिसरा समाप्त.

---

## प्रवेश चवथा.

**स्थल**:—नूरजहानचा महाल

**पात्रें**:—नूरजहान विचार करीत बसली आहे.

**नूरजहान**.—किसतोरकी मै नमकहरामहूं ! मगर इस्मे क्या है ? इस वख्तूमे दौलतकेलिये कौन क्या करनेका नहि ! और सच देखने ज्याय तो आंग्रेजके तरफसे दगा करने खातर मै आपने दिलसे इन्के तरफ आईहूं. और इनोने मेरे खूबसु-

रतीको और जवानीपर खुष होके बिना कौन्सी हरकत लेते मुजको आपनी दिलजान बनाई, तो फेर उन्के साथ मुजको इमानसे नही क्या चलना चाहिये ? नही, मगर इमान्से क्यौंकर चलना ? शिंदिया सरकारके साथ दिल्लगी रखके हरतौरसे उन्के दिलके सहाह तुमको खबर करती ज्याउंगी ऐसा जो मैने आंग्रेजके साथ यकरार किया है, वो किसतोर हांसल होयेगा ? आब सच देखें तो औरतको ज्यवानीमे उमर लायक खबसूरत ज्यवानके साथ दिल इष्कमे रमाना, वोतो शिंदिया सरकारके साथ दिलकी आश्रा मै चैनमे पूरी करती हूं. मगर आंग्रेजके तरफसे इस कामगारीके बदले एकदम मुजको बहोत खजाना मिलनेका है ! एकवख्त हमारी जवानी ज्याती रही, फिर बुढेपनमे हम नायकनोको कौन पूछता है ! हमको उसवख्तमे फकत दौलत काम आवेगी. वास्ते दोनोके रिसते हालमे तरकीबसे कायम रखके आपना काम पुरा करलेना, वैसा दुसरा आराम नही. मुवा ! वो मानाजी फांकडा, रातदिन हातमे माल लेके खुदाके मुवाफक् मेरे नामसे बंदगी करता है. मै जो कभी दिलमे लाऊंगी, तो उस्का सबकुछ एक पलखमे छीन लेउंगी. मगर वैसा आपनेको करनेकाही नही. क्यौंके, बहोत मर्दोंके साथ

दिल्लगी रखनेवाली बेसवा बाजारकी औरतोंकी कैसी हालत होती है उस्का अजमायष मुजको मेरे बदनके चलन उपरसे होती है. भर जवानीमे कोई नाजनीने जोबन बनाय और चितवन सजायके, अपने उपर आषख होगा उस मर्दके तरफ आधी आंखें मिच्याके हासते चेहरेसे देखके एक वख्त लटका किया के, उस मर्दने खूषही होना चाहिये. फिर दौलतको क्या कम है ! तमाम खजाना एक लेहजेमे भरता हाय, मगर उस मर्दने खजाना बंद किया आगच्चे उसीके पासकी दौलत कम होने लगी के, उस औरतने अपना लटका बंद कियाहि जानो ! ऐसी हवाल होती है, लेकिन एक वख्त उस औरतकी जवानी निकल गयी के, उस्को जो अफसोस् होता है सो अजमायष बिना खबर होनेका नही चाह्यसो हुवे, आपनी हालकी चली है यह तरकीब आखिर तखके बिनाखामीसे चलीके बस्स है ! मगर वो पटेलबावांकी तिसरी औरत पार्वती हालमे मुजको बहोत सताने लगी है ! कह्य करती है के, महाराज सवारीमे गये, घरको होयेंगे, आगच्चे किस इतल्लेमे होयेंगे तोभी ये नूरजहान पास रहती है, मय कह्यतांहू के, मैने क्यौंकर पास नही रहेना ! हमेषा पास रहेनेकी मैने जो तरकीब

रखी नही, और आपने लटकेसे उन्को झूटाप्यार बताके उन्को आपके फंदेमे गिरफ्तार किये नही, तो जिस कामके लिये मै यहां रहीहूं सो मतलब किसतोर बनसकेगा। अंग्रेजने मुजको इस जायपे मतलबगार करके रखी है, सो फक्त ऐशंआराम अजमानेके खातर नही है। उस पारबतीको चाह्ये इतनी मेरी आदेखाई करनेदेव; लेकिन उस्के हाथसे कुछभी होनेका नही. मगर मै जिस मतलबके लिये यहांपे रहीहूं, उस्का आंदेसा उस्को आया है, इस्मे बिलकुल शक नही. क्यौंके इत्ने दिन मै दिलसे उस्के साथ मिठा चलन रख्तीथी, लेकिन मैने उसरोज अंग्रेजको लिखाहुवा खत, उस्ने छुपके देख दिनसे फकत वो मेरेसाथ तेड करने लगी है, अलबत कौन प्यार रखेगा! जो कभी मैंने वो खत उस्के रूबरू फाड डाला और उसे बहेकानेकी बहोत बाते सुनाई, तोभि वो किसतऱ्हां सच मानेगी? च्याहेसो होवे, फक्त खुदा मेरा मददगार होगा, तो फिर मै किसीकीभी तमा न रखुंगी. लेकिन अंग्रेजके तरफसे येक खत मुजको कलही पहूंचना च्यहेताथा, सो अबतख् क्यौं पहूंचा नही? (पाहून) या अल्ला! हुजूरकी सवारी आती है, (उठून) आज चेंहरा इसतोर घूस्सेमे क्यौं मालूम

होता है ? और पार्वतीको काहेके लिये साथ लाये हो ? खुदा जाने ये क्या है ?

**पाटील**:-हं, आटप, बोल आतां ! ह्या पत्राची काय भानगड आहे ती आतांच्या आतां खरी करून दाखविली पाहिजे ! ( पत्रे दाखवून ) सूर्य व जयद्रथ पाहिजेना ? हे पहा.

**पार्वती**:-खऱ्याला काय मरण काहे. ( पुढें होऊन ) कायहो नूरजहानबाई, खरं सांगा, या पृथ्वीवर जे कोणीं तुह्माला श्रेष्ठ असेल त्यांची शपथ आहे ! तुमचा व इंग्रजांचा पत्रव्यवहार होतो कीं नाहीं ? काय असेल तें खरं बोला. नाहीं तर माझ्या प्राणावर येऊन बेतली आहे.

**नूरजहान**:-( स्वगत ) चाहे अबी के अबी मर जा ! कोईदीन तोभी मरनेका है ? जिस-वख्त् बीडसे तूं आतीथी उस् वख्त् रस्तेमे उस् शिरसिंग ठाकरको मैंने ही तुजको ठार करनेको कहाथा. मगर उस वख्त् तूं बचगई है. सो तेरी मौत अब आ पहूंची होगी, तो तूं अबी मर जायगी. मुजको उस्की क्या दरकार है ? मगर महाराजके हांथमे कागज् कायका है ? होगा काहेकाभी ! ( उघड ) बाई, ये तुम क्या कहते हो ? मेरा खलिता रहनेका क्या सबब है ! मेरे सरपे, ये क्या आफत् ?

पाटीलः—ये आफत है क्या ? वैसा कुछ तोभी रिश्ता होनेके बिना अंग्रेजके छावनीमेसे तुजको खत आनेका कौनसा सबब है ? जो कुछ सच होगासो जल्द कबूल कर.

नूरजहानः—( जवळ जाऊन ) महाराज मै सच कहतीहूं के, कोई तोभी दुष्मन्ने अपने प्यारकी आखर करनेके लिये यह आफत् लाई है। और दुसरा कुछभी नही है।

पाटीलः—( आपल्याशीं ) या इच्या साशंकित भित्र्या मुद्रेवरून तर स्पष्ट दिसतें कीं, इथें कांहीं तरी काळेंबेरें आहे. ( उघड ) देख इसतोरके दिल्लगिके और आशनाईके बातोंसे यह महादजीपटेल ठगजायगा, ऐसा तूं दिलमें बिलकल न समज, बिना इन्कार करते जो होगा सो कुबूल कर. और आलग होजा. नहींतो तेरी जान मुफत् जाती रहेगी. इस्का पूरा बिचार कर.

पार्वतीः—अन् जें लिहिलेलें पत्र फाडून टाकिलें त्याबद्दलही विचारायचं !

पाटीलः—हो बरी आठवण केलीस, वोह् अंग्रेजको लिखाहुवा खत इसने देखतेही तूने काहेके वास्ते फाड डाला ? इसतोर कसाईका करतब करती है। खरोखर भिंतीला कान असतात

ह्मणतात ते हेच. ईश्वरा अजून तरी आह्मां मराठ्यांना जागे कर! हं बोल!

**नूरजहानः**–महाराज, लेकिन छुपके लोगोंका खत बाचना ये आपके दिलको आछा लगता?

**पाटीलः**–अय शैतानकी सूरत, अब तेरी बदकारी और दगलबाजी मेरे ख्यालमें तमाम आ चुकी है! हाय! किसतोरकी ये बदमाषी है! अय नाहिंज्यार, आजदिनतख्के मै तुजको मेरे जानसे आला समजता था! तेरे मोहोबत्के खातर मानाजी फाकडा मेरी जान लेनेको तयार हुवाथा, तोभी मैने उसवख्त गम खाई, और तेरे उपर मेरे दूसरे औरतोंसे जादा प्यार किया! उस्का बदला अय बदख्तर तूं तोरसे करती है! कहैती है के छुपके खत बांचना मंजूर है क्या? ठेर अब तेरी गधेपर बिठाके उज्जेनमे सरगस निकालके, धड के हाथसे सतासताके और कायल करके तेरी जान लेताहूं! खरोखर, या बायका कधीं व केव्हां केसानें गळा कापतील याचा कांहीं नेम नाहीं. या अवदसेचें हें ढळढळीत दुसरें उदाहरण! रघुनागरावांची पत्नी आनंदीबाई, तिला राज्यतृष्णा सुटली आहे व या रांडेला भेदतृष्णा सुटली आहे; या बायकांवर विश्वास ठेवून यांच्या मतानें चालणारे पुरुष मीं तर निव्वळ शिखंडीच

समजतों. मग ते आपल्या कर्तबगारींत कितीका जागृत व हुषार असेनात; ज्या या अवदसांच्यापायीं राष्ट्रांच्या राष्ट्रें धुळीला मिळतात,तेथें माझ्यासारख्या एक किंवा दहा वीरांची ती काय कथा? आजपर्यंत मी आपल्याला मोठा राज्यकारस्थानी समजत होतों; पण, या सठव्या दुष्ट नीच राक्षसीच्या पुढें त्याचा काय पाड!

**नूरजहान**:-ॲय मेरे सरताज, शेहदमे जेहर किसतोर पैदा होगा? मैने वो खत् किधरभी भेजनेखातर नही लिखाथा; आप हामेशा मुजको जो कुछ् कह्यते हो, उस्की यादगारी मुजको हरवख्त रहनेखातर मै वो, पहिले कागजके उपर लिखती हूं:-

**पाटील**:-और वो किसेभी खबर न होते छुपाके अंग्रेजके तरफ भेजदेती हूं ऐसाहि है, के नही? हां कहदे! अब काहेकेलिये सरमाती है? ॲय बेवफा! जो कुछ बिनमोल चीजोंका खजाना तेरे दिलमे रखाथा उस्को उसजायसे उठाके, उसजायको तूने पिशेमानीका ठिकाना बनाया? आब तेरे बदकारीका बदला अजमाले!

**नूरजहान**:-सरकार, आप च्याहेसो करो, कौन्सीभी बाब हो, मगर वो बिना कागजके उपर लिखके मेरे ख्यालमे रहती नही!

**पाटील**:–क्या ऐसा है ? मगर अब उस्की ज्यादी वयाद काहेके चाहिये; मै अब हिंदुस्थानमे मोहीम करनेवास्ते जानेवालाहूं, ऐसा तूने अंग्रेजको जल्द खबर किया, वास्ते उनोने तेरा बहोत ऐसान जानके तुजको यह खत भेजा है; ओर थोडे देरकेबाद तूनें जो कुछ कहा उसीके उपरसे सब मतलब मेरे ख्यालमे आया है। ( चाकरास ) कौन हैरे उधर ? उस्को एकदम कैद करके कैदखानेमे ले जाव !

**नूरजहान**:–( आत्मगत ) ॲय बज्जा पार्वती ! मै अपने कर्तबगारीसे खुद मै मरनेके पहिले तुजको न दोजख पहुंच्याउंगी तो यह नूरजहान हिंदुस्थानकी नागन नही. ( कैद करून घेऊन जातात. )

**पार्वती**:–आमच्या अन्नपूर्णाताई जर यावेळीं जिवंत असत्या तर या मेलीचे त्यांनीं असे हाल केले असते:–

**पाटील**:–लाडके ! आतां काय तिचें ! पानिपताहून ती हाल सोशीत परत आली नसती तरी मला त्याचें फारसें वाईट वाटलें नसतें ! पण आतां मात्र ती मला आपल्या गुणाचा व सुस्वभावाचा चटका लावून परलोकीं गेली, याबद्दल घटकोघटकीं दुःख होतें !

**पार्वती**:–बरं पण इतक्या दिवस मी त्या अवद-

सेची कृत्यं सांगत होतें याबद्दल माझी हेटाळणी करायची होत होती! पण आतां तर खात्री झाली ना!

**पाटील**:—बरें पण कळलें, आपण इतक्या धूर्त आहांत त्या!

**पार्वती**:—यांत काय झालं? आपलं चांगलं होण्याविषयीं खटपट करणं हें माझं कर्तव्यच नाहीं का? मग यांत मी अधिक तें काय केलं?

**पाटील**:—अधिक कांहींएक केलें नाहींत. हें तुमचें कर्तव्यच आहे! आतां तर झालेना? बरें चला, राणाखानभाई माझी खलबतखान्यांत वाट पहात बसले असतील, तिकडे मला लवकर गेलें पाहिजे. ( जातात. )

प्रवेश चवथा समाप्त.

## प्रवेश पांचवा.

**स्थळ**:—पुण्यांतल्या नानांच्या वाड्यांतली खासगी विचार करण्याची खोली.

**पात्रें**:—नानाफडनवीस विचार करीत बसले आहत.

**नाना**:—मराठ्यांची राज्यसत्ता अशा तऱ्हेनें विभागली जावी ॲं? मराठे हें नांव ऐकल्याबरोबर शत्रूंनीं वचकून जावें, असें असून आतां त्या मराठे या व्यापक शब्दाच्या ऐवजीं, शिंदे, भोसले,

होळकर, गायकवाड, या घराण्यांनीं, स्वकार्यें साधूप्रमाणें आपमतलबाकरितां, निराळयाच तऱ्हेनें श्रीमंत पेशवे हे लहान असल्या कारणानें त्यानां न जुमानतां, अगदीं तिऱ्हाइताप्रमाणें आपल्याच हिमायतीवर राज्य पैदा केलें, असें समजून स्वतंत्र पणानें वाटेल ती राज्यकारणें करण्यास सुरवात करावी काय ? कोण नीचपणा हा ! आणि हेंहीं वास्तवीकच आहे कीं, हीं घराणीं ज्या शक्तीचे अवयव ती शक्ति, श्रीमंत वयानें लहान असल्याकारणानें, लयालाच गेली असें समजून, त्या मध्यवर्ती शक्तीच्या या हातापायानीं जागच्या जागीं हलण्यास सुरवात केली आहे ! माधवराव जर सध्यां जिवंत असते, तर खचित पेशव्यांचा कमजोर न होतां गृहकलहामुळें त्या घराण्याची अशी स्थिती कधींच झाली नसती. तो एकटा नरश्रेष्ठ नाहींसा झाल्यामुळें सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या लहानमोठ्या सरदारांची मनें आकलन करून या नवीन टोपीवाल्या शत्रूंस या भरतभूमींतून हांकलून देण्याची ईर्षा उत्पन्न करण्याची शक्ति कोणामध्येंच राहूं नये काय ? केवढें हें आह्मां हिंदूंचें दुर्दैव ! ज्या राजबिंड्याचें अल्पकाळांतच पानिपतच्या महाघोररणकंदनाचें, आपल्या विजयीं स्वाऱ्यांनीं अगदीं विस्मरण

पाडिलें होतें व ज्या महाराष्ट्राचें सर्व लक्ष त्या शूर, तरुण, प्रजापालनदक्ष व भाग्यशाली नरवीराकडे लागलें होतें, तो अकालीं मृत्युमुखीं पडल्यामुळें, सर्वांच्या आशेचा भंग होऊन, शेवटीं पेशव्यांच्या वैभवसागराला ओहोटी लागण्याचीं चिन्हें दिसूं लागावीं काय ? इतके दिवस महादजी-पाटील श्रीमंतांची एकनिष्ठपणें सेवा करीत होते, परंतु, नारायणरावांच्या वधापासून आह्मां ब्राह्मणांचें झालेलें वर्चस्व त्यांना सहन न होऊन ते आमचा हेवा करूं लागले आहेत, इकडे हैदर व निजाम हे संधीं साधून आहेतच ! आमच्यामध्यें दुफळ्या होतात केव्हां व आह्मी हें राज्य घशांत टाकतों केव्हां अशी आ करून वाटच पहात बसले आहेत. इकडे इंग्रज अस्वलें दादांचा पक्ष धरून त्यांना गादी मिळवून देतों ह्मणून आंतून गुदगुल्या करून आमच्या राशतींत बोट शिरकवूं पहात आहेत. खरोखर या टोपीवाल्यांनीं, जीं कांहीं कृष्णकारस्थानें चालविलीं आहेत, व मराठ्यांशीं असलेला स्नेह व केलेले तहनामे वगैरे गुंडाळून ठेवून आपमतलबानें जें युद्ध सुरू केलें आणि साष्टी वगैरे ठिकाणें लबाडीनें घेतलीं व अशींच इतर नीच व हलकट कृत्यें करून साहाकारी राष्ट्रांप्रमाणें परस्परांशीं वागण्याचे जे

नियम, त्यांचें उल्लंघन करून उलट आह्मीं राजनीती निपूण आहोंत व न्यायमार्गाचेंच नेहमीं अवलंबन करून सत्यतेनें वागतों आहोंत ह्मणून सिंहाचें कातडें पांघरून बसले आहेत ना! वाः केवढी त्यांची ही थोरवी! पण यांत त्यांना तरी दोष देण्यांत काय अर्थ आहे, बेबंदशाहीचा प्रकार सुरू झाला ह्मणजे, चोर हे त्यांत शिरायचेच! परंतु टोपीवाल्यांनीं एवढें पूर्णपणें लक्षांत ठेवावे कीं हा नाना जोंपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत आपल्या करामतीनें गोरकार्यांची स्थिती नाचण्यांच्या लाह्याप्रमाणें करून टाकणार! असो, आतां प्रथम पाटीलबोवांना एक विनंतीपत्र लिहावें, जर येत नाहीं ह्मणून जबाब आला तर येऊं पाहणारें किटाळ टाळण्याकरितां आपणच तिकडे जाऊन त्यांची समजूत घालून त्यांना इकडे घेऊन यावें. ईश्वरा! तूं माझा पाठीराखा असलास ह्मणजे या विजारभटांनीं किती जरी चटोरपणा केला तरी मी त्यांचें कांहीं चालूं देणार नाहीं. (पडदा पडतो.)

---

## प्रवेश सहावा.

---

स्थलः—खलवतखाना.

पात्रें:—पाटीलबोवा व राणाखान विचार करीत बसले आहेत.

पाटील:—भाईसाहेब! पूर्वापार तहनाम्यानें ठरलेला संबंध खोडसाळपणानें विसरून जाऊन केवळ स्वार्थबुद्धीनें आपले स्नेही राष्ट्रकचाट्यांत सांपडलेले पाहून साष्टी बेटावर हल्ला करून तें इंग्रजांनीं बळकाविलें, हें कृत्य नीच व अप्पलपोटेपणाचें नव्हे काय? साष्टी वगैरे जागा आपल्या फार उपयोगीं आहेत व आपण जर त्या न बळकावल्या तर कदाचित् फिरंगी लोक घेतील अशा खोट्या सबबीवर त्यानीं त्या बळजबरीनें काबीज केल्या, ही गोष्ट त्यांच्या नीतीमत्तेस लांछनास्पद नाहीं असें कोण ह्मणेल? या त्यांच्या वर्तनावरून असें खास ठरतें कीं, हे जे तहनामे वगैरे करतात ते केवळ वेळ मारून नेण्यापुरतेच असतात. एवढा अपराध करून जरी इंग्रज लोक थांबते तरी पुरे होतें, परंतु, ज्यानां सर्व महाराष्ट्रमंडळ दोष देत आहे, ज्यांचा सर्व मोठमोठे सरदार व प्रमुख राजे धिःकार करित आहेत, ज्यानीं आपल्या पुतण्याचा प्रत्यक्षपणें वध केला व जे माझ्या हातावर तुरी देऊन पळून गेले अशा दादासाहेबांचा पुन्हां पक्ष घेऊन व तोतया सदाशीवरावाला पाठीशीं घालून प्रत्यक्ष माझ्याशीं

केलेल्या करारांचें या हरामखोरांनीं उल्लंघन केलें, तर या त्यांच्या स्वार्थपरवर्तनाला राष्ट्रनीती ह्मणावीं कीं काय ?

**राणाखानः**—वो अंग्रेज जब् आपके ठरे हुवे तहनामे मुआफक चलता नही, तो आपही उस्के लब्ज् कायकू पूरे करना ? " बेपारकू मनाई नंही करते, हमकू तुम् चौलबंदर देएंगे, तो अंग्रेजको हम् बडी फौज लाके इस देससे हकाल देंगे " ऐसा तहनामा करनेखातर, एक शटलबीन नामका फिरंगियोंका सरदार अपने पेसवेके पूनेके दरबारमे आया है, उसवास्ते मै यकीन कहता है के, यही मौका बहोतही उमदा है.

**पाटीलः**—संधी तर मोठी मजेदार आहे खरी, शिवाय इंग्रज जरी आपल्याशीं असें वर्तन करताहेत तरी आपला हेतू साधेपर्यंत आपण त्यांच्याशीं मैत्रीनेंच आहोंत असें दाखविलें ह्मणजे त्यांत आपले दोन हेतू साधण्यासारखे आहेत, एक अयोध्येचा नबाब असफउद्दवला हा त्यांच्या हातांत आहे व तो जर दिल्लीचा कारभार आटपूं लागला तर आपलें कांहीं चालणार नाहीं । व पादशाहीही आपल्या ताब्यांत येणार नाहीं, दुसरें ते जे सध्यां ह्मणताहेत कीं तुह्मी मध्यस्त होऊन आमचा व पेशव्यांचा तह ठरवा आणि मग दिल्लीचा बादशहा

आपल्या ताब्यांत द्या. तेव्हां त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें तह करण्याबद्दल आह्मी मध्यस्ती करतों वगैरे ठरवण्याबद्दल आपला वकील त्यांच्याकडे गेलाच आहे तो आजउद्यां बहुतकरून परत येईलच, शिवाय दादासाहेबांना पुनः ते आपल्या स्वाधीन करण्यास कबूल आहेत; मग कसा काय तुमचा विचार; नानांच्या मताप्रमाणें वागायचें नाहीं ह्मणून मी बेत केला होता परंतु आतां जर त्यांचें लीनतेचें पत्र आलें तर मग मी त्यांच्याकडे जाणार.

राणाखानः—हां, यही मसलत नेहायत उम्दी है ! दादासाहाबको अपने तालुक् होनेसे पूनादरबारके आफ्सर, अहेल्कारान् वगैरे लोगोंको रुवाब गालिप् हो जाएगा. और नानाफडणवीसके दिल्मे जो कुछ् आपके बाबत्मे कमतरीन् बिचार आतेहै, और बबायस उस्के उनोने आपके साथ जिस तर्‍होंका चलन रखाहै, वोसब खामोष हो जायगा. और उन्को मालुम होगा के, आपने जब् कुछ् कमबेषी किया तो न मालुम, बेजामौका पाटिलबोवासे आवेगा और आपने हुकुमत्मे खलल् आवेगा.

पाटीलः—ठीक आहे, मलाही तसेंच वाटतें, तर मग उद्यां आपल्या वकीलाला गाडराकडे

स्वतंत्र तह करण्यास धाडावें. असेंच कीं नाहीं ?
( एक नोकर येतो. )

**नोकरः**—सरकार, पुण्याहून एक पत्र आलें आहे व तें नारोपंत वकील स्वतः आपणाकडे घेऊन आले आहेत. तेव्हां ते आंत येण्याची परवानगी विचारीत आहेत.

**पाटीलः**—जा त्यांना आंत घेऊन ये. ( नोकर जातो. ) हें काय एक मध्येंच लचांड आलें. मला वाटतें नानांकडून हे पत्र आलें असावें.
( नारोपंत येऊन पत्र देऊन बसतात व पाटील वाचूं लागतात.)

## पत्र.

" राजश्री सकल गुणालंकरण अखंडीतलक्ष्मी आलंकृत पाटीलबोवा यांसी स्नेहांकित बाळाजी-पंत नाना अखंड दंडवत—आपल्या पत्राशीं उत्तर. कारभारी जे असतील त्यांस विकृती होईल. आह्मी कारभारी नाहीं. श्रीमंतांचे सेवक. सुचेल तें लिहावें बोलावें करावें इतकें जाणतों. जेंथवर आपली वस्तुसेवा होईल तेथवर करावी. सर्व कारभार पाटीलबोवांवर असतां अशीं बोलणीं बोलून तुह्मांकडून लिहावीं याचें कारण कांहीं दिसत नाहीं. जे दौलतीहे स्तंभ व ज्यांची दौलतीवर मदार आणि आमचा अकृत्रीम भाऊपणा असतां " जामगांवीं-च आमचें पारिपत्य करीत होते हें बोलणें आपले

पत्रीं कसें निघालें ईश्वर जाणें. तो डाव चुकला ह्मणून इंग्रज गायकवाड यांस मिळून पारिपत्य करावें, हे तों त्याहून विशेष कल्पना चालली त्याचें उत्तरच नाहीं. यांत एक खरें कीं, निष्ठेत अंतर नाहीं येणें करून इंग्रज व गाईकवाड फजीतच पावत गेले व ज्यांनीं लबाडच्या केल्या तेही फल पावत गेले. हेहीं यथार्थ. पाटील बोवांची निष्ठा-तशीच आहे, सूत्रें, अनुसंधानें सोबत्यानीं वगैरे खेळवली छापे आणविले ह्मणून लिहीलें. त्यांस जो एक निष्ठेनें खाविंदाचे काम करितो त्यापुढें कोणाचें चालत नाहीं. पाटीलबोवा मेहनत करून लडाया करितात ह्मणूनच दर झुंजास माणूस घोडे मरतच गेले. जो तमाशा पाहणार, त्याचें कशास मरेल. वेंडाऱ्यास मना करविलें हें तर अपूर्व वाटलें. असो, जे असें करतील ते भोगतील. दुरून चाकरी करून बेईमान होणार नाहीं. रेवा उतरणें नाहीं हीं बो-लणी मात्र बोलावयाचीं त्यांची मर्जी असल्यास त्यांणी बोलावीं परंतु श्रीमंत लहान सर्वभार पाटीलबुवांवर, त्यांनां संभाळावयास कोण आहे, हे सर्व अर्थ त्यांस समजतात. त्याप्रमाअें समजून करतात. ज्याचें घराण्याचें एकनिष्ठतेचे बाणे चालत आले त्यांच्या चित्तात " दुसऱ्याच्या छायेस पोट भरूं " हीं अक्षरें येणार नाहींत, ही. खातर जमा

स्वतंत्र तह करण्यास धाडावें. असेंच कीं नाहीं ?
( एक नोकर येतो. )

**नोकरः**–सरकार, पुण्याहून एक पत्र आलें आहे व तें नारोपंत वकिल स्वतः आपणाकडे घेऊन आले आहेत. तेव्हां ते आंत येण्याची परवानगी विचारीत आहेत.

**पाटीलः**–जा त्यांना आंत घेऊन ये. ( नोकर जातो. ) हें काय एक मध्येंच लचांड आलें. मला वाटतें नानांकडून हे पत्र आलें असावें.
( नारोपंत येऊन पत्र देऊन बसतात व पाटील वाचूं लागतात. )

**पत्र.**

" राजश्री सकल गुणालंकरण अखंडीतलक्ष्मी आलंकृत पाटीलबोवा यांसी स्नेहांकित बाळाजीपंत नाना अखंड दंडवत–आपल्या पत्राशीं उत्तर. कारभारी जे असतील त्यांस विकृती होईल. आह्मी कारभारी नाहीं. श्रीमंतांचे सेवक. सुचेल तें लिहावें बोलावें करावें इतकें जाणतों. जेंथवर आपली वस्तुसेवा होईल तेथवर करावी. सर्व कारभार पाटीलबोवांवर असतां अशीं बोलणीं बोलून तुह्मांकडून लिहावीं याचें कारण कांहीं दिसत नाहीं. जे दौलतीहे स्तंभ व ज्यांची दौलतीवर मदार आणि आमचा अकृत्रीम भाऊपणा असतां " जामगांवींच आमचें पारिपत्य करीत होते हें बोलणें आपले

पत्रीं कसें निघालें ईश्वर जाणें. तो डाव चुकला ह्मणून इंग्रज गायकवाड यांस मिळून पारिपत्य करावें, हे तों त्याहून विशेष कल्पना चालली त्याचें उत्तरच नाहीं. यांत एक खरें कीं, निष्ठेत अंतर नाहीं येणें करून इंग्रज व गाईकवाड फजीतच पावत गेले व ज्यांनीं लबाडया केल्या तेही फल पावत गेले. हेहीं यथार्थ. पाटील बोवांची निष्ठा-तशीच आहे, सूत्रें, अनुसंधानें सोबत्यानीं वगैरे खेळवली छापे आणविले ह्मणून लिहीलें. त्यांस जो एक निष्टेनें खाविंदाचे काम करितो त्यापुढें कोणाचें चालत नाहीं. पाटीलबोवा मेहनत करून लढाया करितात ह्मणूनच दर झुंजास माणूस घोडे मरतच गेले. जो तमाशा पाहणार. त्याचें कशास मरेल. पेंढाऱ्यास मना करविलें हें तर अपूर्व वाटलें. असो, जे असें करतील ते भोगतील. दुरून चाकरी करून बेईमान होणार नाहीं. रेवा उतरणें नाहीं हीं बो-लणी मात्र बोलावयाचीं त्यांची मर्जी असल्यास त्यांणी बोलावीं परंतु श्रीमंत लहान सर्वभार पाटीलबुवांवर, त्यांनां संभाळावयास कोण आहे, हे सर्व अर्थ त्यांस समजतात. त्याप्रमाणें समजून करतात. ज्याचें घराण्याचें एकनिष्ठतेचे बाणे चालत आले त्यांच्या चित्तात "दुसऱ्याच्या छायेस पोट भरूं" हीं अक्षरें येणार नाहींत, ही. खातर जमा

आहे पाटील बोवांचें वांकडें व्हावें हे चित्तांत नाहीं. अखत्यार इंग्रजाच्या मसलतीचा आपणावर आहे. कोणेही प्रकारें मसळत शेवटास जावी. भाऊपणा दिवसेंदिवस अधिक चालावा. आंतून ग्रहस्थ पाठवून दादा इंग्रज गाईकवाड यांशीं राजकारण केलें नाहीं. वर्ष लागो दोन वर्षें लागोत. इंग्रचांचे पारिपत्य करावें हाच निश्चय पक्का आहे तर करणें तरी चौघांच्या ( पेशवे निजामअल्ली भोसले व हैदरअल्ली ) विचारें करावा, जे निश्चय ठरतील ते कायमच. सध्यां मुंबईकर लढाईच्या तयारीत आहेत. आपण आले शिवाय फत्ते होणें नाहीं. येणेचे करावें. अंतरीं कांहीं नाहीं. याबद्दल श्रीवरील तुळशी धाडल्या आहेत. बहुत काय लिहीणें लोभ कीजे हे विनंती.

**पाटीलः**–या नानांच्या पत्रांत, बराच तथ्यांश दिसतो आहे. तुह्मांला कसें काय वाटतें ?

**राणाखानः**–हुजूर, आपका कह्यना जाह् है, इसलिये मुजे मंजूर है,

**नारोपंत वकीलः**–( आपल्याशीं ) नाना मला वारंवार लिहीतात कीं इंग्रजाचा वेध जसा पुण्यावर आहे तसा माळव्यावर हीं आहे, तरी पाटीलबोवांची समजूत घालून ते वळतील असें करून

मला पत्र धाडा. नच वळले तर मी स्वतः येऊन त्यांची विनवणी करीन तेव्हां आतां तोंड काय काढावीं ? आजपर्यंत मी हवी तितकी खटपट केली परंतु यांचें मन न वळतां उलट विरोध मात्र जास्त वाढत चालला आहे. पाटीलबोवा तर नानांनां " धनीपणाचा कारभार जिकडे असेल त्यांनीं करावा. एकाचाच पक्ष धरून लिहणें बोलणें चांगलें नाहीं " अशा प्रकारची उत्तरें धाडितात. तेव्हां आतां करावें काय ( थांबून ) मला वाटतें असेंच करावें ( उघड ) सरकार, त्या पत्राचें उत्तर काय धाडायचें याची हा सेवक आज्ञा मागतो आहे. ( नोकर येतो. )

**नोकरः**–सरकार वकील साहेब आले आहेत.

**पाटीलः**–जा त्यांनां आंत घेऊन ये ( नोकर गेल्यावर ) काय मजकूर आणला आहे कोणाला ठाऊक ( वकील येतो. )

**वकीलः**–सरकार, मी हिष्टिंग साहेबाकडे जाऊन कालच परत आलों.

**पाटीलः**–मग त्याचें ह्मणणें काय पडलें !

**वकीलः**–आपल्या ह्मणण्या प्रमाणें तो कबूल नसून शिवाय त्यानें सैन्याचीही बरीच तयारी करून गाडर साहेबास त्याचें आधीपत्य देऊन सुमारें आठ दिवसांपूर्वीं त्याची आपल्या मुलखावर

रवानगीही झाली. तेथें गेल्यावर माझा, वकील या नात्यानें योग्य मान मरातब न ठेवितां उलट बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्यानें माझी हेटाळणी केली !

**राणाखानः**—क्या इस् रियासत्के उपर, और उसे कब्ज करनेके लिये फौज् भेजके हमारे वकीलकी बेआद्बी ? हुजूर, फरमाईये, अदम्‌गुंजायश् ! इसीवख्त आपके फौजको तयार करनेके लिये जर्नैलको हुक्म देताहूं.

**पाटीलः**-असूंद्याहो असे डरता काय ! शेखी दाखवून आपल्याशीं टक्कर देण्याला हे लोक टिकतील असें तुह्माला वाटतें काय ! अहो हा वीर आपल्या विस्तीर्ण सेना समूहासह ' हर हर महादेव ' नांवाच्या ध्वनीनें रण मैदानावर कर्कश गर्जना करून शत्रूला ' त्राही त्राही भगवन् ' करणाऱ्या राणोजी सिंव्हाचा बच्चा आहे, व त्याशींच आपली गांठ आहे हें त्या इंग्रजाला अजून कळलें नाहीं आणि ह्मणूनच त्याची इतकी गडबड चालली आहे. दुसरें काय ! परंतु त्यानें इतकें खास लक्षांत ठेवावें कीं. हा सिंव्हछावा आपली आयाळ उभारुन एकदां डुरकण्या फोडूं लागला ह्मणजे मग त्याच्या सर्व सैन्याची दुर्दशा करून पटापट आपल्या मक्षस्थलीं एकेकाला

टाकील ! अरे चोरानों माझ्याशीं दगलबाजी करता काय ! ठीक आहे पाहतो आतां. भाईसाहेब, आपली निघण्याची तयारी करा !

**नारोपंत वकील**:–सरकार, मग नानांना उत्तर काय लिहावयाचें !

**पाटील**:–नानांना, मी सांगतों त्या प्रमाणें पत्र लिहा, चला ! आतां केव्हां जाऊन त्या टोपीवाल्याचा फडशा उडवितों, असें झालें आहे. त्या हरामखोरांच्या सैन्याला जागच्या जागीं गारद करून टाकीन तरच शिंद्याचा बच्चा ! माझ्या वकीलाचा अपमान करून रंडीच्या वतीनें माझ्या गुप्त गोष्टी फोडून माझ्याशीं दगलबाजी करता काय ! पाहून घेतों आतां !

( पडदा पडतो )

**अंक तिसरा समाप्त.**

## अंक चवथा.

### प्रवेश १ ला.

स्थलः—नानांच्या वाड्यांतला आंतला दिवाणखाना.

पात्रेंः—नाना व हरिपंत तात्या सेनापती विचार करीत बसले आहेत.

**हरिपंतः**—नाना, शिंदे व होळकर हे दोघे मातबर सरदार गुजराथ इंग्रजांस मोकळी सोडून घरीं गेले ह्मणून बातमी कळली हें काय? आपण इंग्रजांविषयीं जें काहूर उपस्थित केलें आहे तें यामुळें विलग नाहीं का होत?

**नानाः**—निजाम, हैदरखान व भोंसले यांच्याशीं सख्य करून एकच वेळीं चहूंकडे या इंग्रजांनां तंबी द्यावी अशी जी आपली इच्छा ती यामुळें फसेलशी दिसते. शिवाय मराठी राज्याच्या इमारतीचे आधारस्तंभ जे हे दोघे सरदार ते कळलेली बातमी त्यांनां कळल्यावर त्यांच्याही मनांत उघडच आपल्याविषयीं संदेह उत्पन्न होईल व मग आपला सर्व मनसबा बिनसेलसा दिसतो. पण उपाय काय आपलेच दांत नि आपलेच ओंठ! कसें तरी करून मसलत सिद्धीस नेलीच पाहिजे! गुजराथेंतून

आपली फौज निघतांच, गाडरानें खानदेशावर स्वारी करून पेशव्यांच्या मुलखांतून बोरघाटांतून पुण्यावर इष्टुर फाकड्याबरोबर दुसरी फौज धाडावी. अशी इंग्रजांनीं केलेली मसलत मला कळल्यामुळें मी हैदरखानाला वचन देऊन त्याचें सैन्य भर पावसाळ्यांत बाहेर काढिलें. त्याचप्रमाणें भोंसल्यानें बंगाल्यावर चालून जावें. चिकाकोलकडे निजामानें जावें आणि शिंदेहोळकरांनीं कोंडाईबारीवर फौज घेऊन रहावें ह्मणजे टोपीवाल्याला कोंडमारा होऊन तो पुण्याकडे येणार नाहीं असें मला वाटलें होतें; परंतु आतां उपाय काय ?

हरिपंतः—कलकत्तेकराकडून पाटीलबोवांनीं पंन्नास लाख रुपये घेऊन, आह्मी तुमच्याविरुद्ध उभे राहणार नाहीं अशी मसलत केली आहे व ते उज्जनीस आल्यावर आपलें सैन्य कमी करून स्वस्थ बसणार आहेत अशी मला बातमी कळली आहे. ही गोष्ट जर हैदरासारख्या आपल्या स्नेह्याला कळली तर त्याला काय बरें वाटेल ?

नानाः—पाटीलबोवांना, आजपर्यंत मी बरीचशीं विनंतीची पत्रें धाडून सुचविलें होतें कीं, खानदेश, गुजराथ व माळवा हीं तिन्ही संधानें तुह्मी दोघां मातबर सरदारांनीं संभाळावीं, व असें केल्यानें आपल्या स्नेही राष्ट्रांस धीर व भरंवसा येऊन इंग्रजांस

चोंहींकडें ताण बसेल आणि अशा तऱ्हेनें इंग्रजांचा बेत जो कांहीं कालानें पुण्यावर येण्याचा तो पूर्णपणें फसेल व श्रीमंतांची छाप सर्वत्र बसेल. कांहीं दिवस ते माझ्या मताप्रमाणें वागले. परंतु आतांशें माझ्या पत्रांची त्यांच्याकडून अशा कांहीं चमत्कारिक अर्थाचीं उत्तरें येतात कीं, हे माझे सर्व बेत फक्त माझें स्वतःचें वैभव वाढावें आणि शिंदेहोळकरांस केवळ गुलाम नोकर करावें अशी माझी इच्छा आहे. ( हुजऱ्या येतो. )

**हुजऱ्याः**–( मुजरा करून ) सरकार, एका सांडणी स्वारानें हें पत्र खुद्द आपल्या हातीं देण्याकरितां दिलें आहे व तोंडीं असें सांगितलें आहे कीं, रामचंद्र शिवदेव वकील रात्रीं भेटीला येतील. ( पत्र देतो व जातो. )

**नानाः**–कोणाकडचें याचा तर वकिलाच्या नावावरून निकाल झालाच. बरें आंत आतां काय लिहितात तें तर पाहावें ?

**पत्र.**

॥ श्री ॥

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य महादजी शिंदे दंडवत विंनंति उपरी आज्ञाकडील अर्थ राजश्री रामचंद्र शिवदेव यांनीं आपणास

सांगितल्यावर आपण शपथपूर्वक खातर जमा करून श्रीवरील तुळशी घाडून दिल्यावर निश्चयपूर्वक लिहिलें कीं सरदारी माझी व फडणिशी त्यांची बंधुत्वानें चालवुं. "जो अनिष्ट चिंतील त्याचें पारिपत्य करूं" ह्मणून बोललां तो मजकूर मशारनिल्हेनीं लिहिला, तो सर्व समजुन चित्तास परम संतोष जाहाला! आह्मी श्रीवरील बेल भंडार घाडला आहे व हें पत्र शपथपूर्वक लिहिलें आहे! आपण बंधुत्वाविषयीं संषय न मानावा. मशारनिल्हे बोलतील तें आमचें बोलणें समजावें. ही सरदारी आपली व फडणिशी आमची असा निश्चय झाला. जेथें आपण आहां तेथें मी आहे. हें शपथपूर्वक जाणावें. पत्राच्या मागोमाग पुण्यास श्रीमंतांच्या सेवेला येणेचें क़रितों. रवाना छ॥ २५ सफर. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

हरिपंतः—असो हा एवढा मोठा सरदार जो रुसून स्वस्थ बसण्याच्या विचारांत होता तो त्याच्या मनाला उपरती होऊन आपल्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास कबूल झाला हें एक आपलें दैवच उगवलें ह्मणायचें?

नानाः—अजून नेम नाहीं! ही स्वारी केव्हां फिसकटेल कोणाला माहीत! असो आतां सुभेदार होळकरांनां जास्त फौज उभारण्याविषयीं लिहून

पाटिलबोवांचाही बेत कळवूं. पण काल त्यांच्या वकीलानें सांगितल्याप्रमाणें ते उदईकच येथें येऊन दाखल होतील असें दिसतें ! कारण त्यांचा राग पाटिलबोवांसारखा जाऊन तेही आपल्या धन्याची इमानें इतबारें चाकरी बजावण्यास तयार झाले आहेत व त्यांत अंतर पडणार नाहीं; याच्या सत्यत्वाविषयीं बेल भंडारही त्यांनीं उचलला असें त्यांचा वकील माझ्या जवळ काल सांगत होता. बरें, आतां ते दोघे येथें आले ह्मणजे त्यांनां, कोंडाईबारीची मसलत फसली तरी कांहीं हरकत नाहीं. वगैरे हुषारीच्या गोष्टी सांगून त्यांची मनें सुप्रसन्न करावी ह्मणजे झालें. कसें असेंच किं नाहीं ?

**हरिपंतः**–असेंच आणि दुसरें काय ! तसें केल्याविना गत्यंतरच नाहीं !

**नानाः**–बरें ! कोंकणांत, आपली फौज दसरा करून कूच करण्याच्या आधींच इंग्रजानें बराच मुलूख काबीज केला व नंतर वसई घेण्याकरितां कलकत्याहून खुद्द गाडरला रवाना केलें ही बातमी मला कळतांच तिकडे, रामचंद्र गणेश, परशुरामभाऊ, आनंदराव रास्ते वगैरे सरदारांस मी त्यांच्या तोंडावर धाडलें. त्यापैकीं लढाईत

रामचंद्र गणेश सरकार कामास आले. पुढें आतां ते टोपीवाले आपला मोर्चा फिरवून पुण्यावर चालून येणार वगैरे गोष्टींची तुह्माला माहीती आहेच!

हरिपंतः—हो हो! ही सर्व हकीकत मला वाटेंतच कळली. चार दिवसांपूर्वी, मी इकडे येत असतांना, गाडर घांट उतरून पुण्यावर येतो आहे ही बातमी मला कळतांच, मीहीं आपला तळ खडकाळयास दिला व त्याच्या सैन्याला चोंहोंकडून कोंडमारा करून दाणा वैरणीची अगदीं टंचाई करून टाकली; त्यामुळें तो तवाई सोशीत घाबरत घांट उतरून पीछेहाट करूं लागला. हें पहातांच मी जलदीनें लगट करून त्याला पार मुंबईकडे पिटाळून लावला. हेंहीं तुह्माला माहित आहेच?

नाना' तें तर त्याच वेळीं कळलें! आपल्या फौजेनें कोंकणांत अशाच ब-याच टकरा देऊन त्यांची अगदीं खोड मोडून टाकली. गाडरचें नुकतेंच चार दिवसांपूर्वी मला तह करण्याविषयीं पत्र आलें होतें. पण आह्मी तयार नाहीं असें मी त्याला उत्तर धाडल्यामुळें तो निरुत्तर होऊन स्वस्थ बसला आहे. मद्रासेकडे हैदर व टिपू

या दोघां बापलेकांनीं मोठा कहर उसळून देऊन त्यांना "त्राहि भगवन्" ह्मणायला लावलें व सर्व मुखलाचा पार फन्ना उडवून दिला. तसेंच भोंसले आपली फौज कटकेकडे धाडून त्यांची खाय खाय जिरविण्याच्या बेतांत आहेतच; या सर्व हकीगतीवरून भिऊन हिस्टींग आपल्याशीं तह करण्याच्या बेतांत आहे अशी, आज बातमी लागली आहे; तेव्हां आतां या टोपड्यांचें ठाणें यापुढें या भूमीवर फार दिवस टिकेल असें कांहीं दिसत नाहीं! फक्त सध्यां जशी आपल्यामध्यें एकी आहे तशीच सदोदित राहिली पाहिजे! ह्मणजे मग बघतों त्यांच्या सर्व चेष्टा!

**हरिपंतः**—ते पक्के मारवाडी आहेत हें मात्र लक्षांत ठेवा! बरें घेतों तर मग आतां आपला निरोप.

**नानाः**—ठीक आहे! नुकतेच दमून आलां आहांत. श्रम बरेच झाले असतील. जरा विश्रांति घ्या! मीही पण आतां गृहकृत्याकडे वळतों! बोलतां बोलतां बरीच संध्याकाळ झाली. ( पडदा पडतो. )

प्रवेश पहिला समाप्त.

## प्रवेश दुसरा

**स्थल.**—वानवडीची शिंद्यांची छावणी.

**पात्रें.**—ठरल्याप्रमाणें उज्जनीहून निघून वानवडीस आपल्या तंबूंत पाटीलबोवा व राणाखान बोलत बसले आहेत.

**पाटील**:—हिंदुस्थानांतल्या बहुतेक स्वाऱ्यांबरोबर भाई आपण होतांच. फक्त शुक्रतालची माहिती तुह्मांला नाहीं. भाई, खरोखर आज मी आपल्याला मोठा धन्य समजतों. माझ्या एकजात कडव्या पंधराशें रणशूर लग्गीवाल्या पठ्ठ्यांनीं त्यावेळीं कशी शिकस्त करून सोडली व माझें यश रक्षण केलें! त्यामुळें मलाही मी आपल्या धन्याची उत्तम प्रकारें नोकरी बजावली असें वाटूं लागलें आहे! आह्मी नर्मदा उतरून जों जातों तों सेनापती विसाजीकृष्ण बिनीवाले हे बराच सैन्याचा जमाव घेऊन चालले होते. त्यांनां मी मिळालों व तसाच पुढें कूच केला. नंतर जयपूर, जोधपूर वगैरे रजपूत संस्थानिक, पानिपतास मराठ्यांची फजीती झाल्यामुळें ते पुन्हां इकडे येत नाहींत अशा समजुतीनें त्यांनीं या प्रांतीं राहणाऱ्या मराठ्यांस बराच त्रास दिला होता. त्यामुळें त्यांचें पारिपत्य करून नंतर गोल बांधून आह्मी आपला गोट आंवळला व उ-

त्तरेचा रस्ता सुधारला. पुढें जाटांचें पारिपत्य करून खंडणी घेतली. याप्रमाणें भरतपूर मुक्कामीं जय मिळवून पावसाळ्यांत दीग किल्ल्याखालीं छावणी देऊन राहिलों. नंतर दिल्लीचें राजकारण उरकण्याच्या खटपटींत, होळकर, विसाजीकृष्ण वगैरे मंडळी गुंतली होती, त्या मसलतींत माझें मत नसतां, सर्वांच्या अत्याग्रहावरून मला कबूल करणें भाग पडलें. प्रथम सलुखा करण्यास माझें मन कां घेईना याचें कारण आपण ताडलेंच असेल!

राणाखानः—आक्सर करके, पानिपतमे उसी नजीबखानने आपने बापदादोंको मिस्मार किया, और आपने भाईयोंको और चाचाके लडकेको कत्तल किया, इसलिये, उस्का बदलालेनेके, आप उस्के कहेने मुजब आपकी राय न दियी होगी!

पाटीलः—अगदीं बरोबर ताडलेंत. पुढें मला रोहिल्हांचें पारिपत्यकरण्यास सांगितलें. मी अंतरवेदींत जाऊन उतरल्याची बातमी झबेताखानास कळतांच तो भिऊन, जो शुक्रतालकिल्यांत पळून गेला तो आंतल्या आंतच गार झाला. नंतर शहाआलम बादशाहास, त्याचे दोस्त इंग्रज त्याला मराठ्यांकडे जाऊ नको ह्मणून सांगत असतां तो त्या सांगण्याची हेटाळणी करून आमच्याकडे आला. नंतर आह्मी त्याला दिल्लीस तक्तावर बस-

वून, तेथें जो अनंतराव ह्मणून आमचा वकील होता त्याजकडून एक खलिता तयार करवून त्यावर शहाआलमची सही घेऊन मंजुरी घेतली. या प्रमाणें पूर्वीं पानिपत येथें लागलेला काळीमा साफ धुऊन काढून सर्व हिंदुस्थानभर भगव्याझें-ड्याचा अंमल बसवून आह्मी श्रीमंतांना खलिता देण्याकरितां जयजयकार करीत पुण्यांस येणार तों वाटेंत रावसाहेब माधवराव कैलासवासी झा-ल्याचें वर्तमान कळलें। तेव्हां या दुःखातिशया-च्या व जय मिळाल्याच्या अत्यंतानंदाच्या वि-स्तीर्ण लाटांमध्यें आह्मी उचंबळूं लागलों असतां इतक्यांत नारायणरावांचा खून झाल्याची बातमी आह्मांला येऊन पोहोंचली. यामुळें व रघुनाथ-राव इंग्रजांनां मिळून त्यांनीं चालविलेल्या खट-पटींमुळें मनाला अतीशय दुःख होऊन, वाघा-सारखेवीर, ही भरतभूमी सिंहासारखा जबडा पसरून, त्या उघड्या थडग्यांत एकामागून एक गडप करून टाकते आहे या मुळें या पुढें आतां हा राज्यवृक्ष पुन्हा खचणार, ह्या अशा भयंकर कल्पनांनीं डोकें भणाणुन जाऊन, पुन्हा दक्षिणेंत जाणेंच नको असा विचार झाला. पण टोपीवाले हे पुण्यावर चालकरून येत आहेत अशा आशयाचें पत्र मला नानांच्या कडून आलें व माझ्या वकी-

लाचाही इंग्रजांनीं अपमान केला हें तुमच्या सर्व लक्षांत आहेच.

राणाखानः–वो तो सब हो चुका; मगर वो आपका मानाजी, उस्का इन्तजाम क्या किया है ? उसे खुले दस्त छोडना मुमकीन नही है ! क्यौं के न मालुम वो फिर पहिलेसरीखा इत्तफाक् लावेगा !

पाटीलः– तें कांहीं नाहीं ! तो आतां पूर्णपणें निवळला आहे. त्यानें उज्जन सोडून येथें ह्मणजे पुण्यास श्रीमंतांच्याच आश्रयाला शेवटपर्यंत राहण्याचें कबूल केल्यामुळें त्याला मी कैदेतून सोडला. बहुतकरून तो येथें आला असेल किंवा येईल. बरें, आतां तुह्मी उदईक येथून निघून परत उज्जनीस जावें असें मला वाटतें ! कारण तेथें कोणींच नाहीं. दुसरें असें कीं उज्जनीच्याजवळच जो प्रांत वंशपरंपरा तुह्माला तोडून दिला आहे त्याच्या सनदा मी लाडकीजवळ ठेवल्या आहेत. त्या आपल्या हस्तगत करून घ्या. मी इकडचें सर्व राजकारण आटपून लवकरच तिकडे येईन ! शेवटीं सांगावचें एवढेंच कीं नीट सर्व मंडळीस जपा.

राणाखानः–उस्का कुइ जिक्र नही !(हुजऱ्या येतो)

हुजऱ्याः– सरकार, पुरंदराहून बोलावणें आलें आहें.

पाटिलः—निघालोंच ह्मणून आलेल्याला सांगून माझा घोडा तयार करव.

हुजऱ्याः—जी सरकार ( जातो )

पाटिलः—( उठून ) परमेश्वरा, आमचा सांभाळ करणारा तुझ्याशिवाय कोणी नाहीं. ह्मणून या भरतभूमीवरून नष्ट अविंधांची नामोनिशी करण्याचा जो मी विडा उचलला आहे त्या कामीं मला तुझी पूर्ण मदत असूं दे. ( पडदा पडतो )

**प्रवेश दुसरा समाप्त.**

## प्रवेश तिसरा.

**स्थळः**— पुरंदर किल्यांतील श्रीमंतांच्या गादीचा दिवाणखाना.

**पात्रें**:—नानाफडनवीस, बापु, होळकर व हरिपंत फडके गादीपुढें विचार करीत बसले आहेत.

नानाः—बापु, सुभेदारहोळकर, दादासाहेबानीं इंग्रजांशीं मसलत करून राज्यप्राप्ती साठीं त्यानां राज्यापैकीं दोन आण्याचा हिस्सा देऊं केला होता, परंतु सुरत मुक्कामीं इंग्रजांची पुरी टेर उडाल्यामुळें ते सर्व प्रकर्ण विझल्यासारखें दिसत होतें ! परंतु

आतां दादानीं पुन्हा कल्याण मुक्कामीं राहून त्या मुंबईकरांशीं अशी मसलत चालविली आहे कीं, राज्यावर जर बसवून दिलें तर राज्यापैकीं पाहिजेल तिथला पुणें शिवायकरून चार आण्याचा-हिस्सा त्यांनीं घ्यावा. हें सर्व आपल्याला विदितच आहे. तेव्हां आतां ह्मणायचें इतकेंच कीं, हा गृहकलहाग्नी पेटून त्याच्या टिणग्या व ज्वाला ज्या भडकूं पाहताहेत त्यांनां कांहींतरी तोड जोड काढून होतां होईल तितक्या लवकर दडपून टाकल्या पाहिजेत! कारण हे परकी जे आपल्या घरांत शिरूं पाहताहेत ते रस्त्यावरच उभे केले पाहिजेत. नाहींतर "भटाला दिली ओसरी न् भट पाय पसरी" अशांतली स्थिती व्हायची!

**होळकरः**—पण केवढा मूर्खपणाहा! आपलें भांडण घरांतल्याघरांत न मोडतां शेजाऱ्याला त्यांचा निकाल करायला आणायचें नां! हे दादासाहेब आपल्याला मोठे कर्तेसवर्ते ह्मणत असून हा असला वेडेपणा कोठला त्यांच्या डोक्यांत शिरला आहे कोणाला ठाऊक? मला वाटतें कीं, यांच्या असल्या वर्तनानें आपल्यावर केव्हां व काय प्रसंग येईल याचा कांहीं नेम नाहीं! ज्या दादासाहेबांनीं आजपर्यंत मराठेशाहीचा पूर्ण अभिमान बाळगून, अभिमानानें परकीय शिखानष्ट,

शत्रूंस बिल्ली बनवून सोडिलें होतें. तेच आतां आपली हिम्मत, शौर्य, धैर्य, शहाणपणा वगैरे सर्व विसरून जाऊन अमिष्टासारखे मराठ्यांच्या पूर्ण शत्रूची पायधरणी करूं लागले अँ! केवढें आश्चर्य हें! आर्यमाते, बिचारे नशीब तुझें. ज्या सुवर्ण भूमीवर, युधिष्ठिर, रामचंद्र, भीष्म, द्रोण, कर्ण, अर्जुन, श्री छत्रपती शिवाजी, रावबाजी, इत्यादि वीरमणी राजहंसांनीं अवतार घेऊन ती शोभविली त्याच ठिकाणीं त्यांच्याच मालिकेंत जाऊन बसण्याच्या योग्यतेचे जे दादा, त्यांनीं धूम्रवर्ण कलापी बगळ्यांच्या समूहामध्यें शिरून बेटक्या खाण्याचा प्रयत्न करावा ना? किती ही शर्मेची गोष्ट! हे माते वसुंधरे, तूं एकदम सहस्त्रावधी ठिकाणीं आपलें उदर फाडून या बर्फातल्या उदी अस्वलांना एकदम गट्ट करून आपल्या पाठीवरचें ओझें कमी कर! विनाकारण आर्यांच्या धेनुमातेचा छल होतो आहे ह्मणून अश्रु ढाळून धाय कां मोकलतेस?

( शिपाई येतो. )

**शिपाई**: ( मुजरा करून ) पाटीलबोवांची स्वारी आली. ( पाटील येतात. )

**नाना**:–( त्यांस सुस्थलीं बसवून ) कां, क्षेम कुशल आहेना?

**पाटील**:—श्रीमंतांच्या आशिर्वादानें व आपणा सर्वांच्या मेहेरनजरेनें यथास्थित आहे!

**सु० होळकर**:—ईश्वरा, तूं आमचा खरोखरच साह्यकारी आहेस; कारण पाटीलबोवा सुद्धां ऐन प्रसंगीं येऊन पोंचले. आतां काय या टोपीवाल्यांचा नुसता धुव्वा उडवून देतों. कां पाटीलबोवा, आहे का नाहीं राज्यकारस्थान ?

**पाटील**:—अहो सुभेदारसाहेब, यांत त्यांचा कांहीं दोष नाहीं. हें सर्व दादा. त्यांची राज्यतृष्णा त्यांना परदास्यत्व करायला लावते आहे. याच दादासाहेबांना आपण पूर्वीं गादीवर बसावें, आपल्याला लोकांनीं राजा ह्मणावें वगैरे कोणच्या तरी गोष्टीची इच्छा होतीका ? परंतु एकदां का अवदसेचा पाया घरांत शिरला कीं अशी स्थिती व्हायचीच! ज्या गनीमानीं, भाऊसाहेब, विश्वासरावादि रणपुंगव शूर मराठे पट्ठ्यांना निर्दयपणानें आर्यमातेवरून हुसकावून परलोकची वाट दाखवली त्या शिखानष्टांचा मेरुमणी जो अहमदशहा अबदल्ली, त्याच्या छातींत अटकनजीक लाथ मारून त्याचें नरडें आपल्या दांतांनीं काडकन फोडलें व कंठरुधिराचा कढत घुटका घेऊन झालेल्या शोकपर्यवसायीं कृत्याचा सूड घेतला व अक्षय विजयीं भगवा झेंडा अटकेवर फडकावून

आपल्या शौर्यानें मराठी साम्राज्यास लागलेला काळीमा साफ धुतला व छत्रपतींस स्वर्गी आनंदानें डोलायला लावलें आणि अजरामर कीर्ती संपादन केली. त्याच या दादासाहेबांच्या सध्यां पाठीस लागलेलें गरगर फिरविणारें आनंदीबाईरूपीं सुदर्शन चक्र जर त्यावेळीं यांच्या संन्निध असतें तर त्यांच्या हातून कांहींएक न होतां उलट गृहकलह मात्र अधिक वाढले असते !

बापू:—( आपल्याशीं ) करा, आणखी शंख करा. हा बापू ह्मणजे लुडबुडचा व दुटप्पी वर्तन करणारा नाहीं का ? दमधरा. यांहीं पेक्षां अधिक कलहाग्नीं माजवतों ! आज नाहीं उद्यां, कधीं तरी हा सखारामबापू दादांना गादी मिळवून देणार ! ( उघड ) होणारास उपाय काय ? जसा वारा येईल तशी पाठ देणें जरूर आहे. हा टोपीवाला इतका बेमान व काफर होईल असें मला तरी निदान वाटलें नव्हतें ! पुरंदरच्या तहाला झुगारून देऊन त्यानें हें जें नीच वर्तन चालविलें आहे त्याबद्दल त्याला योग्य बक्षीस अवश्य मिळालें पाहिजे. त्याला अजून आमचा मराठी पेंच कळला नाहीं ह्मणून त्यानें हें असलें उद्धटपणाचें व बेपर्वाईचें वर्तन चालविलें आहे ! हें पहा सुभेदार, पाटीलबोवा, आतां एकदां सवजण आपापल्या

कंबरा बांधा व त्यांना आपल्या देशांतून अखेरचेंच घालवून द्या. ह्मणजे दादासाहेबही चुरमुरे खात ( आत्मगत ) बहुतकरून तुह्मालाच चुरमुरे खावे लागतील. त्यांच्या कवाइती सैन्याबरोबर लढणें फुकाचें नाहीं. ( उघड ) आयतेच गुचचुप परत येतील. कां मी ह्मणतो हें पटतें का ?

**हरिपंतः**—तसें केल्याशिवाय सोयच नाहीं; परंतु पहिल्यापासूनच आपल्या लोकांची चूक झाली, या विजारभटांना जर पूर्वीपासूनच आपल्या आर्यावर्तावर वसाहत करूं दिली नसती तर आज हा प्रसंग येईल असें स्वप्नीं तरी आलें असतें का ? काय शिंच्यांचा मारवाडी कावा ! प्रथम व्यापाराला मोकळीक करून घेऊन नंतर मालसंरक्षणाच्या निमित्तानें फौज ठेवायला सुरुवात केली व अलीकडे तर फितुरी करून तंटे लावायचा धंदा पत्करला आहे. हाच गुलामांचा व्यापार ! पण या सर्व गोष्टींत त्यांना तरी दोष देण्यांत काय अर्थ आहे ! आमचेच लोक अर्धवट. माकडापाशीं खवा वजन करायला देऊन मग नाहींसा झाला ह्मणून गुरगुरण्यांत फायदा काय ? ती ताम्रमुखी जात खादाड आहे हें तर जगप्रसिद्ध आहे. बरें अजून तरी आमच्या लोकांचे डोळे उघडाताहेत का ? या गोरकायांना आर्यमातेवरून घालवून देण्याची मस-

ळंत न करितां उलट आपल्या घरांत कुठें काय आहे हें सर्व त्यांनां दाखवून घरभेदे बनवताहेत ! तें कांहीं नाहीं ! हा हरिपंत फडके जिवंत जीव आहे तोंपर्यंत अश्रांत श्रम करून यांना पिटाळून लावणार ! बेत सिद्धीस नेणारा गजानन समर्थ आहे ! झाड उगवूं लागलें आहे तोंच उपटून टाकिलें पाहिजे. नाहींतर एकदांका वाढून तें जून झालें ह्मणजे त्याच्या मुळया केव्हां इमारतीला धक्का देतील याचा कांहीं नेम नाहीं. कां बापू असचेंना ?

बापूः–( आपल्याशीं ) निदान वरकर्णी तरी तुमच्या सारखें बोललें पाहिजे. अंदरकी बात हमे और दादासाब फक्त जाने. ( उघड ) तात्या, माझ्या मसलतीशीं तुमची मसलत अगदीं जुळली ! कसें तरी अरिष्ट टाळलेंच पाहिजे. " नाकापेक्षां मोती जड" काय उपयोगी ?

नानाः–आपण सर्वजण मिळून जर हातभार लावला तर ही गोष्ट तडीस जाईल. श्रीमंत वयानें लहान, तेव्हां या झाडाच्या भोंवतालची कांटेरी झुडपें छाटून टाकून त्याला वाढायला साफ जागा करून देणें आपलें काम आहे. ह्मणून ह्मणतो कीं, एकवार आपण इंग्रजाला असें पत्र लिहूं कीं, तुमचा व आमचा पुरंदर मुक्कामीं तह झाला असून तुह्मी त्यांतल्या कलमांचें उल्लंघन करीत आहांत.

तर तुमच्या सारख्या न्यायी ह्मणवणाऱ्या परद्वी-स्थांनां असलें हें नीच कृत्य योग्य नाहीं. तर वेळींच उमजून आपलें वर्तन सुधारावें आणि इत-उत्तर आमच्या कोणच्याही भानगडींत न पडतां साहाकारी राष्ट्रांच्या नियमांचें अवलंबन करावें आणि दादांना मुकाट्यानें आमच्या स्वाधीन करावें हें ठीक. तसें न करितां चालू क्रम जर पुढें असाच कायम ठेवाल तर आह्मांला कांहीं निराळीच तज-वीज करावी लागेल ! याचा नीट विचार करा !

**सु० होळकरः**—हो, हीच युक्ती ठीक दिसते पण नाना साहेब, मला तर खास वाटतें कीं, या आपल्या पत्राची ते हेटाळणी केल्याशिवाय कधीं राह्यचे नाहींत. मग तुमची काय समजूत असेल ती असो.

**पाटीलः**—सुभेदार साहेब, समजुत काय असा-यची; त्यांचा सुरतेस पराजय झाला तरी अजून रग नाहींना जिरली ! त्यांनां ह्मणावें येतो येतो असें भिंती अडून कां ? प्रत्यक्ष पुढें येऊन हा आलो ह्मणून दंड ठोकून साम्न्याला उभे रहा ह्मणावें ? ह्मणजे मग हा बहाद्दर कशी तोफेच्या गोळ्यांची मेजवानी देतो ती पहा ! चोर, कावा लढवताहेत ! ( एक हेर येतो ).

**हेरः**—(मुजरा करून) धनीसाब, ममईकर, टोपी-

वाला इष्ठुर फाकडा आणि लइ मोठा लढाईचा सरांजाम बराबर घेऊनशेनी लढाई देन्यास्नी बोर-घाटाप आला है! सम्द लोक घाबरल हैती! दादासाबबी बराबर हैती!

पाटील:–काय इष्ठुर फाकडा दादांना बरोबर घेऊन आमच्याशीं लढण्याकरतां बोर घाटापर्यंत आला काय? अरे हरामखोरा! श्रीमंतांशीं बेमान-पणा अँ! कांहीं हरकत नाहीं! नानासाहेब, आतां आपल्यालाही व्यवस्था लवकरच केली पाहिजे! कसें सुभेदार, तात्या?

नाना:–( घाबरून ) कशी काय व्यवस्था करा-यची हें तुह्मांला नवेंच सांगायला पाहिजे असें नाहीं कारण तुह्मी, सुभेदार, सेनापती तात्या वगैरे सर्व कसलेलेच अहांत. तेव्हां तुह्मीच सर्व व्यव-स्था करा!

पाटील:–मला वाटतें प्रथम, मी व तात्या यांनीं न जातां पानशांचा तोफखाना व सुभेदारानीं जावें. सध्यां सुमारें एक लक्ष सैन्य असलें ह्मणजे पुरे आहे. फाकड्याचें सैन्य घांट उतरून यायच्या अगोदर तळेगांव मुक्कामीं आपल्या सैन्याला तळ देऊन रांह्यला सांगावें ह्मणजे छातीवर एकदां का कट्यार दिसली ह्मणजे मग पुढें त्याला हातपाय

हलवतां येणार नाहींत ! मग कसें सुभेदार, तात्या ?

**सु० होळकरः**–ठीक आहे ! आह्मी करतो निघण्याची तयारी ! मात्र तुह्मी तयार असावें ! वेळ आलीच तर हेर धाडीन !

**नानाः**–( हेरास ) जारे सरदार पानशांना बोलावून आण ! ( हेर जातो ) चला तर मग आपआपल्या तयारीला लागा. आतां बोलत बसण्याची वेळ नाहीं. श्रीमंतांचें यश रक्षण करणारा जगदीश समर्थ आहे.

( पडदा पडतो )

प्रवेश तिसरा समाप्त.

---

## प्रवेश चवथा.

**स्थळः**–बोरघांट पायथा.

**पात्रेंः**–दादा व इष्टुरफाकडा दोघे तंबूत विचार करीत बसले आहेत.

**इष्टुरः**–कां डाडासाब, हामी आपला आर्मी कसा फाइन टयॉर केला हाय. उस्का ड्रिल, परेड,

वगैरा सब कैसा हाय ? आच्छा है ऑर न्हाय ? आटां टुम हमाला ऐसे बोलेल कीं टूमचा अर्मी आमच्यापाशीं फाइट करनेकु स्टयांड होइल क्या ? टूमचे ऑल पीपल आक्षि म्याड म्याड है ! आमच्या लोकाच्या ऍडव्हाइस बरोबर वागून आपला आर्मी टयार करेल, ऍन्ड आमचा एक दोन इंग्लिश माणुस ठेवुनशेनी टयेना आपल्या फोर्सचा कम्यांडर, कर्नेल करेल, टर रियलि टूमच्या लोकांचा बडा प्राफिट होऊनशेनी ज़ाईल.

दादाः—खरेंच साहेब, तुझें ह्मणणें खरें आहे ! बाकी हें खास कीं तें सैन्य जरी कवाईत शिकलेलें नाहीं तरी एकाएकी ह्मणजे आपल्याला हार जाईल असें मुळींच नाहीं. ( आपल्याशीं ) गुलामानों तुमची ती मातब्बरी किती ! सध्यां आमच्यांत वांकडें आलें आहे ह्मणून तुमची गरज. उद्यां आह्मी सर्व हिंदुस्थानवासी एक झालों ह्मणजे तुम्हा परद्रव्यापहारी नीच मारवाडी भाईची ती काय कथा !. शुड्मुगाच्या शेंगासारखें दाणल्या खालीं झोडपून आंतलें दाणेरूप जे कांहीं प्रांत सध्यां तुमच्या ताब्यांत आहेत, ते घेऊन तुह्मा टरफलांनां देऊं फेंकून, आहांत कुठल्या नादांत ! ( उघड ) साहेबा, काय करूं ! शिंदे होळकरांनीं मला राज्यावर बसावेण्याचें अभिवचन देऊन आयत्यावेळीं फस-

विलें ? नाहीं तर मग त्या नानाचें व हरिपंताचें काय आहे तें बघितलें असतें !

इश्नुर:—बट डाडासाब, टुमी श्रोनके टू एअर नसटां यूसलेस्ली राइट कां शांगटा ? आटा हमी टो टूमच्या साइडनें फाइट देण्याला स्टथांड होणार. बट टुमी लोक ट्येला काय ह्मनता, यस् यस् "सव्याला ऑलवेज जय" त्ये करतां, हामी जरी टूमची साइड धरली आहे टरी हामाला सक्सेस मिळेल असा वाटत न्हाय ? ऑल राइट लेट इट गो. बट टुमी आपल्या यूथ मंदी राज घेतला न्हाय और अबि ट्राय करटे ! अबिटो टुम व्हइ ओल्ड जाला! आमच्या कंट्रिमिढे असा कडिबि न्हाय होएल् ट्रु एअरलाच श्रोन मिळेल! टूमबी ट्रु है. न्हाय ऐसा न्हाय ! बट अबिटो हिज् हायनेस सवाइ मांडुराव है क्या न्हाय ! टे बॉर्नजाला नशटे देन टुमी गाडी मिळाला असता ! युवर होल नेशन टुमाला अव्यूज करटे कीं टुमी आमच्या साइडला नॉट जावा! रिअलि टुमारे समढे पीपल आक्षि स्टोन है! हामी ये बोलते कीं जेला किस्कोबी हेल्प मिळणार न्हाय टो क्या आयमीन तेने काय करावा ! आमच्या सारख्या जस्ट ऍन्ड गुड गव्हर्मेंटकडून हेल्प घेटलीच पायजे ! डाडासाब, टुम ऐसा बोलेलकीं

हमी इंग्लिस लोक टुमारे साथ ब्रदरके माफक नहीं वागटे ? टो टुमारे लोक हमकू कायकू अब्यूज करटे ! हम टो टुमारेसाथ ऑलवेज इंपाशली वागटे ! हमकू क्या ? टुमारे सरीखे बडेलोकनी जर हमकू आश्रय दिला टर हमचा वेपार नीट चालणार ! नहीं तो हमकू क्या ! उद्या हम ब्यासें इंग्लंडकू निकल जाऊं ! रिअलि ठुमारे सब लोगोंकू बिलकुल अक्कल न्हाय ! टे बडे खराब है ? ब्रेन टो उस्कू टोटली नै हाय ? लेकिन राजकैसा करटे आय डोंट अंडरस्थ्यांड ! टुमीबी इकट्या बॉरस् ये स्टोनकेसाथ कैशा केल्या ! उस्कू डिफीट देना बडा मुष्कीलका ऑर मोस्ट डिफिकल्ड टास्क है; ऐसा हम बिलकुल नहि जानते !

**दादा**:—( आपल्याशीं ) गुलामा, माझ्या समक्ष माझी व माझ्या राष्ट्रांतील लोकांची निंदा ! आमच्या आर्यविरांचेच नव्हे परंतु माझें स्वतःचेंच नुसतें नांव ऐकलें कीं पुरे, शत्रूंची काळजें फाटून जाऊन वाट फुटेल तिकडे पळत सुटत. फार कशाला, राघुभरारी ह्मटलें कीं पुरे, त्यांचे घोडे सुद्धां पाणी पित नसत व दाणा खात नसत. तोच मी आज हतवीर्य होऊन तुझ्या जवळ मदत

मागायाला आलों ह्मणून असा अपमान अँ ! माझ्या समक्ष माझी निर्भत्सना करून मला खालीं पाह्यला लावतोस काय ? थांब, मला गादी तर मिळूं दे ! ह्मणजे मग तुह्मा गौरकायांचें नख तरी या आर्यमातेवर टिकूं देतो का पहा ! खरोखर परदास्यत्वाचे कोरडे फार कठोर आहेत ! लोकहो, अजून तरी सावध व्हा ! मी जर पहिला राघोबा असतो तर हे असले शब्द याच्या तोंडचे सहन केले असते का ? खाडकन समशेर उपसून जागच्या जागीं छाटून टाकला असता ! पण उपयोग काय ? माझें काम मला करून घेणें आहे ना ! ( उघड ) अरे साहेबा, लोकांनीं किती जरी मला दूषणें दिलीं तरी मला त्याची बिलकुल पर्वा नाहीं ! गादी मिळाल्याशीं कारण ! मग तिकडे कांहींका होईना ?

इग्रजः—टेटो ट्रु है ! आमच्या क्या. हमी टो बेपारी लोक. हमाला जे साइडना प्राफिट होइल टे हमी करणार. एकंडर हमाला टोटा न्हाय जाला देन ऑल राइट. और हम ये बोलटे कीं टुम, टुमारे भाईबंदकेसाथ टंटा नहीं केला टर लई चांगला. बट हमी ऐसा बोलटे कीं, काय वी करा, पन आमच्या वर्कबद्दल हमाला प्राइझ टुमी डिला पाहिजे ह्मणजे हमी टो लइ ग्ल्याड होइल ?

दादाः—तें सर्व मग होईल.

इष्टुरः—युवर लॉर्ड शीप, हमी टुमाला इन्सल्ट व्हावा ये ऑब्जेक्ट धरून बोलटे न्हाय ? माझ्या सारखा इंग्लिशमन टुमाला कंदी मिळणार न्हाय ? हमाला काय कंपनी जशी ऑर्डर सोडील टशी सर्व्हिस करना ! बट हमी टुमाला टुमच्या चांगल्याची गोष्ट सांगटे त्येच्या मंधी टुमाला आमचा घुस्सा येनार नाहीं टर हमी टी गोष्ट टुमाला बोलेल पण जाऊदे टेचा काय जाला टुमकू सक्सेस जाल्यावर हमाला ब्राईबचा दो लाखरुपया देनार त्ये कवा !

दादाः—गादीवर बसलोकीं लगेच थैल्या ओततों !

इष्टुरः—बहोत आच्छा ! आटां टुमारो मार्च करूनशेनी पूना कांकर करणार ! और टुमकु थ्रोन पर इन्स्टाल करकर हम् टर्न होईल ! हजी झाला कीं न्हाय ?

दादाः—तेवढेंच मला पाहिजे ! पण प्रथम शिंदे, होळकर, नाना वगैरे कुल लोकांना कैद केले पाहिजेत ! त्याशिवाय कांहीं एक जुळणार नाहीं !

इष्टुरः—टेटो हमी पहिले करेल ! त्येच्यामंदी आपुन बिलकुल डाउट नॉट घेइल ! टेटो हमारा फर्स्ट वर्क. देन अदर्स.

( एक नोकर पत्र घेऊन येतो व दादानां देतो. पत्र वाचून )

दादाः—सायबा, पुण्यास एकदम जाण्याचा बेत फसला! पत्रांत अशी बातमी लिहिली आहे कीं, मराठ्यांची एक लाख फौज सुभेदार होळकरांच्या सैनापत्याखालीं, तळेगांवाजवळ तळ देऊन राहिली आहे. मग आतां कसा काय विचार?

इट्टुरः—मंग काय जाला? उदर हंम उस्कु फाइट देगा! और सबकु कतल करकर पूना जायगा! टुम ऐसे डरटेक्या? हंम टो टुमारे साथ है क्या न्हाय?

दादाः—बरें आहे बुवा; ( आपल्याशीं ) ह्मण आहेना! "वेळ पडे बाका, तो गद्धेकु कहेना काका" त्यांतलेंच हें! तूं ह्मणशील तसेंच! कारण मी आजपर्यंत लढाई केली नाहीं! आतां तुझ्यापाशींच प्रथम शिकायला आलों आहे! या लढाईत जय येईल असा मला तर निदान भरंवसा येत नाहीं! मग होणें जाणें परमेश्वराधीन आहे! ( उघड ) बरें आहे! साहेबा, मी जातो आतां.

इट्टुरः—बहोत उम्दा, हमी बी आतां जरा रेस्ट घेऊनशनी टयारी करण्याला फोजकू ऑरडर डेटे!

( पडदा पडतो. )

प्रवेश चवथा समाप्त

## प्रवेश पांचवा.

**स्थलः**–पुरंदरचा किल्ला.

**पात्रें**:–नाना, तात्या व पाटिलबोवा विचार करीत आहेत.

**नानाः**–पाटीलबोवा, आतां पुढें कसें काय करायचें ? आजपर्यंत आपल्याशीं झुंजण्यास फक्त परकीय असे एक मुसलमानच काय ते होते; परंतु आतां हे ताम्रमुखे इंग्रज, फिरंगी वगैरे परद्वीपस्थ नवीनच उत्पन्न झाले आहेत! खरोखर सांगतो पाटीलबोवा, ते मुसलमान फार बरे पण हे टोपीवाले अती दुष्ट. गुलामांनीं कावा पहा कसा चालवला आहे तो! आमच्या घरांत घुसून वास्तविक घराचे जे मालक त्यांना खोटे ठरवून, जे खोटे आहेत त्यांना खरें ठरवूं पहाताहेत! कोण हा नीचपणा! हे दादासाहेब जर त्या चांडाळणीच्या राक्षसी मोहजालांत सांपडले नसते तर, असला हा रणधीर प्रतिज्ञतांत योद्धा, असल्या या नीच, खडतर व ज्याचा परिणाम पुढें अती वाईट होऊन सर्व हिंदुंची दैनावस्था होणार आहे, अशा कृत्यांत कधीं तरी पडला असता का ? पण आतां उपाय काय? आलेलें संकट कसें तरी टाळलें पाहि-

जे! आज सर्व राज्याचा भार आपण आपल्या शिरावर घेतला आहे तर नेट देऊन कसें तरी हें हाकारलेलें जहाज सुखरूप तिराला पोंचविलें पाहिजे! हरप्रयत्न करून कधींही धुतला न जाणारा, पानपतच्या संग्रामाच्या वेळीं लागलेला काळीमा एकवार साफ धुवून गेला आहे, तर तो आतां पुन्हां लागूं पहातो आहे. तेव्हां तो लागूं न देण्याविषयीं आपल्याला जीवाच्या पलीकडे श्रम केले पाहिजेत. पण आतां या इंग्रजांची कशी काय वाट लावायची? त्यांना या भरतभूमीवर राहूं देणें ह्मणजे निदान आपल्या राज्यकारस्थानाला तरी हें बाधणार आहे! कारण त्यांनीं आमच्या देशांत येऊन एक एक प्रांत लुच्चेगिरीनें घशांत टाकण्यास सुरुवात केली आहे! यावरून नेम तरी काय सांगावा. उद्यां हें आपलें सर्व राष्ट्र फितुरी करून एकदम घशांत टाकतील! ह्मणून ह्मणतों कीं, आपण मनाचा निग्रह करून आपलें साम्राज्य प्रस्थापित करण्याची जी मनिषा व जो हुरूप धरला आहे त्याला झुगारून न देतां व आपल्या प्राणाची पर्वा न करितां अव्याहत श्रम करूं. मग पुढें प्रभुसत्ता.

**पाटील**:—नाना, अंतर्यामीं स्थिति काय आहे हें न जाणणाऱ्या सामान्य जनास आकाश जरी निरभ्र

दिसत होतें तरी एकाएकीं मेघराजानें काहूर करून आपल्या अंतरिक्षीं छपवून ठेविलेल्या, तीव्र, भयंकर व प्रज्वलित सौदामिनीस, आम्ही मराठ्यांनीं भक्कम चिरेबंदी पायावर उभारलेल्या अति प्रचंड अशा मजबूत इमारतीवर घाला घालून ती जमीन दोस्त करून टाकण्यास उद्युक्त केलें, हें केवढें आह्मा महाराष्ट्रियांचें दुर्दैव व शोचनीय स्थिति! दुःखांत सुख एवढेंच कीं, ही इमारत जरी सध्यां ढांसळून पडली आहे तरी ती श्री छत्रपती महाराजांनीं पायाशुद्ध बांधली असल्याकारणानें, तिचा अगदींच मागमूस नाहींसा न होतां, छप्पर एकीकडे, खांब दुसरीकडे व पाया तिसरीकडे, अशी जरी स्थिती झाली आहे तरी त्या सर्व वस्तु आपल्या ताब्यांत असल्या कारणानें, आपल्याला पुन्हां पूर्ववत इमारत उठवण्यास परिश्रम असे किती लागणार? फक्त सांधे जुळण्याचाच काय तो अवकाश कीं, पुन्हां जशीच्या तशी तयार! ह्मणून माझेंहीं ह्मणणें असें आहे कीं, आतां ही गोष्ट बिलकुल दिरंगाईवर टाकतां कामा नये! दादांनीं आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठीं, या टोपीवाल्यांच्या साह्यानें जी खटपट चालविली आहे तिचा प्रथम उच्छेद करून टाकला पाहिजे! दादांनीं, इंग्रजांच्या साह्यानें किती जरी भक्कम व

अघटित राज्यतृष्णेचा व्यूह रचला तरी आपण त्या व्यूहाच्या खालीं वीतभर जास्त खणून असा टोलेजंग सुरुंग लावून देऊं कीं, तो व्यूह धाडकन ढासळून पडला पाहिजे !

**नाना**:—पण मी असें ऐकतो कीं इंग्रज लढाई-च्या कामांत मोठे पटाईत आहेत ! त्यांच्या कवाइती पलटणाबरोबर नेहमी आपला टिकाव कसा लागणार ! पण त्यांतलें आह्माला कांहीं गम्य नाहीं ! तें तुह्मीच काय तें करा ! आह्मीं आपले लेखणी बारगीर !

**तात्या**:—नाना, तुह्मी असे भितां का ? श्रीमंतांच्या पुण्य प्रतापानें आमच्या सारखे निधड्या-छातीचे वीर जिवंत असतां तुह्मी या टोपीवाल्यांनां भ्यावें ? आजच्या या लढाईमध्यें, मराठे आपली खरी कर्तबगारी दाखवून, स्वराज्य व स्वधर्म निष्ठेनें, श्रीमंतांच्या मसनदीचा अभिमान बाळगून, खास यश संपादन करणार व दादांना बंदिवान करून श्रीमंतांच्या पुढें हजर करणार ! ( एक हेर घाबऱ्या घाबऱ्या येतो व हकीकत सांगतो. )

**हेर**:—सरकार, येळ अक्षी खराब आलीया पगा ! टोपीवाल्यानं आपल्या सैन्याची फार नासाडी चालविली हाये ! सुभेदार होळकरांनीं, दुसऱ्या सरदारांनीं अक्षी पगा जिवापाड श्रम

चालवल हैती, पन त्येंच्या त्या मर्दुमकीचं कांइबी चीज व्हनार न्हाय असं दिसतं । काय इचिभन आमचं सम्द सरदार इक्त अंगावंर तुटूनशेनी पड-त्याती, पन त्यो गोरा योक पाउलभर बी मागं हाटाना ! सुभेदारसाब तर इचारामंदी अक्षी बुडून ग्येलॅ हैती ! आपल लस्कार जराका जोर धरूं लागल कीं, त्यो गोरा अशी कांही योकांदी युगात काढतो कीं, काय इचारू नगा ! सरकार योकंदर आपल्या चार टकरा फसल्या ! त्ये कारणानं आपल लस्कार धूम माघारी पळत सुटल हाये !

**नाना**:—तूं थेट तिकडूनच आलास ना ?

**हेर**:—जी व्हय. तकुंठच थेट आलों ! घोडा भाइर हाय !

**नाना**:—जा ! असाच जा ! आणि सरदार पान-शांनां इकडे बोलावलें आहे ह्मणून सांग जा ! ते आतांच पायथ्याशीं गेले आहेत.

**हेर**:—जी ! सरकार ( जातो. )

**पाटील**:—नाना ! हेरानें बातमी वाईट आ-णिली यांत तर शंकाच नाहीं; पण आमच्या लो-कांनीं चारी टकरा फसल्या ह्मणून भेदरून पोछे हाट करावी काय ? कोण नामर्दपणा हा ! लढा-ईला जायचें आणि आपले जीव बचावण्यासाठीं पळायचें ? ( पानशे येतात. )

**नानाः**–तात्या, पानशे, पाटीलबोवा, कांहीं असो ! आज आपलें दुर्दैव ओढवलें असें ह्मणायला कांहींएक हरकत नाहीं ! कांहीं दिवसा पूर्वी आपल्या दुर्दैवानें जो राज्यवृक्ष अर्धवट तोडला गेला होता, त्यालाच धाकटच्या रावसाहेबांनीं आपल्या मर्दुमकीचें ओतप्रोत पाणी घालून तो पूर्ववत् करण्यास सुरवात केली नाहीं तोंच एकदम आमच्यावर जबरदस्त तीक्ष्ण धारेची आकाशांतली कुऱ्हाड पडून तें दिव्य रत्न आमच्यांतून गमावलें. पुढें आपण सर्वांनीं नेट धरून तो वृक्ष पूर्ववत् करण्याचा जो अश्रांत परिश्रम चालवला आहे तो हाणून पाडण्याकरतांच जणु ईश्वरानें हें एक दुसरें संकट आणून उभें केलें आहे ! सरदार पानशे, इंग्रजांबरोबरच्या तळेगांव नजीकच्या आपल्या चार टकरा फसल्या व आपले लोक पीछेहाट करूं लागले आहेत अशी आतांच बातमी कळली. तेव्हां तुह्मी, सेनापती, तात्या व पाटीलबोवा आणि तिकडे गेलेल्या सुभेदार होळकरादि तमाम सरदारांनीं एकवार अखेरीस जुटीनें त्यांच्याशीं साम्ना द्यावा असें मला वाटतें ! मग कसें काय ?

**पानशेः**–कसेकाय ह्मणून विचारणें कशाला पाहिजे ? अहो या टोपीवाल्यांची ती काय कथा ! माझे गोलंदाज शिस्ताई बांधण्यांत असे तरबेज़

आहेत कीं, एक सरबत्ती केली कीं पुरे! शत्रूंचें सैन्य रानोमाळ पसरून त्यांना " त्राहि भगवन् " झालेंच पाहिजे! चार टकरा फसल्या काय? ठीक आहे! कसें काय सेनापतीसाहेब?

**तात्या**:—वाटेल तेव्हां व वाटेल तेथें, श्रीमंतांची सेवा करण्यास हा मर्द तात्या अगदीं एका पायावर तयार आहे! शत्रूंचें सैन्य किती व कशाका तयारीनें असेना, त्यांना कंठस्नान घालून त्यांचा पाडाव करणें व श्रीमंतांचें यश संभाळणें हेंच माझें ब्रीद! हा निघालों असाच! पण पाटिलबोवा अनुभवानें आपल्यापेक्षां जास्त आहेत. तेव्हां त्यांच्यावरच सर्व भार टाकावा असें मला वाटतें! कसें सरदार पानशे, नाना?

**नाना**:—मला तुमचें ह्मणणें कबूल आहे. पानशे माझ्या बाहेर नाहींत.

**पाटील**:—हें पहा अधीक वेळ विचार करीत बसण्याची ही कांहीं वेळ नाहीं! पानशे साहेब, प्रथम आपण आपला तोफखाना पूर्वेच्या बाजूनें शत्रूच्या तोंडावर पसरावा असें मला वाटतें. कारण गेलेले लोक बरेच थकले असतील! मागें सेनापती तात्यांचें व माझें पायदळ उभें राहील आणि त्यामागें, मी आपले घोडेस्वार उभे करतों! अशा रीतीनें व्यवस्था करून आपण शेवटीं एकदां श-

त्रूंच्या अंगावर तुटून पडूं व आपल्या देशाच्या शत्रूंचें ह्मणजे आर्यविरहित लोकांचें पारिपत्य करणें हेंच आपलें व्रत असें जे आपले रणबहाद्दर स्वर्गस्थ ह्मणत त्यांच्याच पुण्यप्रतापानें आजच्या प्रसंगीं आपण आपली खरी कर्तबगारी दाखवून पूर्वजांचें विमल यश रक्षण करण्याची अशी तऱ्हा आहे. असें जगाच्या प्रत्ययाला आणूं व या टोपी-वाल्यानां " हरहर महादेव " करून गर्दीत मि-सळवून देऊं! आहेना पसंत।

**तात्या व पानशे**:—आपल्याकडे ज्याअर्थीं धूरी-णत्व दिलें आहे, त्याअर्थीं सर्व पसंत असलेंच पाहिजे.

**नाना**:—सरदारहो, निघा आतां! बोलून वेळ घालवूं नका! सर्वांनीं आपआपली व्यवस्था करून आपआपल्या सैन्यासह शत्रूवर भाले खेंचून जाऊन श्रीमंतांचें यश रक्षण करावें, हेंच माझें शेवटचें सांगणें आहे!

**पाटील**:—पराजीत होऊन आह्मी तोंड दाख-वायला परत कधींही येणार नाहीं! एक या इंग्र-जांना मारूं नाहीं तर मरूं! चला सरदारहो ह्मणा " भवानीकी जय "

(असें सर्व म्हणत असतां पडदा पडतो.).

प्रवेश पांचवा समाप्त.

## प्रवेश सहावा.

**स्थल:**—वडगांव डोंगर पायथा रणभूमी.

**पात्रें:**—रामसिंग कडाबिंदवाला व मुधोजी वगैरे भेदरलेले सरदार येतात.

**रामसिंग:**—काय सांगु मुधोजीराव, माझ्या कडाबिंदवाल्यापैकीं मी कायतो शिल्लक! मुंबई करांशीं चार टक्करा दिल्या परंतु एकींत तरी जय यावयाला पाहिजे होता! एकींतहीं जय न मिळून उलट मराठी लष्कराची खराबी मात्र अधीक होत चालली आहे! आठ नऊ हजार अस्सल मराठे तर शत्रूंनीं नुसत्या तोफांच्या भडिमारानें यमसदनीं धाडिले! व जे कांहीं अर्धवट वार होऊन रणांगणीं विव्हळत पडले होते, त्यानांही त्यांनीं अतिनिष्ठुरपणें जागच्या जागीं कापून टाकले! काय सांगु मुधोजी, या माझ्या तलवारीनें आजपर्यंत अशा खाशा खाशा कामगिऱ्या बजावल्या आहेत कीं, कांहीं विचारूं नका! एकवार म्यानातून ही बया बाहेर निघाली म्हणजे शत्रूच्या रुधिराचे सडे घालून आर्यमातेला शांत केल्याशिवाय कधींहीं परत आपल्या जागीं जाऊन बसली नाहीं! परंतु आतांच्याच प्रसंगीं ज्या अर्थी या

विजयी खडगावर अपयशाचा गंज चढून तें बोथट झालें आहे त्याअर्थी शत्रूचे तखदीर जोरावर आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं ! कालच्या प्रसंगीं आपले मराठेवीर किती निकराने लढले हें तुह्माला ठाऊकच आहे ! आतां या गोष्टीला तोड काय काढावी ?

**मुधोजीः**–तोड कसली न् काय कसलें ! आपण तर बुवा आतां इथे राहूं शकत नाहीं ! कारण नेम काय सांगावा ! उद्यांच्या नाहीं आतांच्याच टकरीमध्यें, जिवंत राहिलेले आह्मी विनाकारण प्राणास मुकायचे ! शिवाय फत्ते नाहीं ती नाहींच. छेः आपण तर आतां याच पावलीं घरीं जाणार ! कारण मी जर आतां या टकरीमध्यें पडलों तर माझी बायका पोरें विनाकारण उघडी पडून त्यांची अन्नानदशा होईल ! बरें लूट बरीचशी मिळाली असती तर मग कांहीं हरकत नव्हती ! पण तीही मुळींच नाहीं !

**रामसिंगः**–अहाहा ! काय पण शौर्य ! खरो-खर, स्वदेश, स्वधर्म व स्वराज्याकरितां आपले देह धारातीर्थी सुस्नान करून घेतात त्यांसच फक्त मी वीर ह्मणतो ! नाहींतर ह्मणे मी घरीं जातो ! वेड्या मेलास तर स्वर्गांत चढून जाशील ! धारातीर्थी मरण यायला पुण्यच लागतें ! सध्यां

शत्रूचे ग्रह उन्नत आहेत ह्मणून आपल्याला हटावें लागतें आहे न् दुसरें काय ?

**मुधोजीः**—आणि ह्मणूनच मी घरीं जाणार ! आपण आतां किती जरी खटपट केली, तरी जयश्री आपल्याला कांहीं साध्य होत नाहीं ! कालच्या प्रसंगीं जी आमच्या लोकांची कत्तल उडाली, तो प्रसंग डोळयापुढें उभा राहिला ह्मणजे त्या भयानें माझें आंग कसें लटपटुं लागतें !

**रामसिंगः**—तें तर खरेंच ! परंतु आजपर्यंत आपण ज्यांचें अन्न खाल्लें, त्यांना ऐनप्रसंगीं मदत न करणें ह्मणजे निमकहरामपणा नव्हे काय ! इतकेंहीं असून ज्याअर्थीं आपण कमरेला तलवार बांधून लढाईला आलों आहोंत त्याअर्थीं एखाद्या भेकडासारखे पळून जाऊन घरामध्यें मरणाच्या भीतीनें दडणें ह्मणजे नपुंसकत्वानें जास्त शोभा येतें असें ह्मणण्यासारखेंच नाहीं का होत ?

( पाटील, पानशे, तात्या वगैरे लोक येतात ).

**पाटीलः**—अरे असे भेदरून बायकांसारखे पळताहेत कोण ?

**पानशेः**—अरे शूर बच्चानों, असे भितां कां ? आह्मीं तुमच्या मदतीकरितां आलों आहोंतना ? अरे मरण हें सर्वांच्याच पाठीशीं लागलेलें आहे ! आतां आपण सर्वजण मिळून एकदम शेवटचे शत्रूं-

वर तुटून पडून, देऊं त्यांचा धोशा उडवून। चला फिरा माघारे।

**पाटीलः**—रामसिंग, मुधोजी, तुह्मीच का ? अरे तुह्मी अस्सल बीजाचे असून समरभूमीपासून कच खाऊन पळून जातां। तुह्मांला तुमच्या पूर्वजांनीं आपल्या देशाच्या शत्रूंचें पारिपत्य करण्याकरितां कशीं अचाट कृत्यें करून यश संपादन केलें याची कांहींच कल्पना नाहीं काय ? शूर मराठे हो, ही भरतभूमी ज्यावेळीं आर्यवीराला जन्म देते त्याच वेळीं विधाता त्याच्या भाळीं फक्त एकच "समरंगण" असा शिक्का मारून ठेवितो हें पक्कें लक्षांत ठेवा। चला फिरा माघारे आणि आपली मर्दुमकी गाजवून यश संपादन करा। अरे, हिंदुधर्मरक्षणाकरितां ईश्वरानें शिवछत्रपतींनां मुद्दाम निर्माण करून, जो धर्म नीच, शिखानष्टांच्या जुलमी कृत्यांनीं लयास जात होता, तो त्यांच्या हातून प्रस्थापित केला व पुढें त्याच जगन्नियंत्याच्या कृपेनें आपणां मराठ्यांमध्यें रावसाहेबांसारखीं अमोल्य रत्नें निर्माण करून त्यांच्या हातून त्या धर्माला जास्त बळकटी आणिली। असें असून त्या नरश्रेष्ठांच्या विमल कीर्तिला, तुह्मी आपल्या नामर्दपणानें डाग पाडूं पहातां। याची तुह्माला शरम। चला तुटून पडा,

**रामसिंगः**—महाराज! आह्मांला मदत न मिळाल्यामुळें आमची ही अशी दशा झाली आहे, आपली मदत आह्मांला मिळाली; आतां आह्मी शेवटले एकदां शत्रूंवर तुटून पडणार! मग आमचे जीव जावोत अथवा राहोत पीछेहाट ह्मणून करायची नाहीं. हाच निश्चय!

**पानशेः**—शाबास रामसिंग, शाबास! चला तर मग व्हा पुढें! मघांपासून माझ्या गोलंदाजांनीं कशी खाशी कामगिरी चालविली आहे! रामसिंग, पाटिलबोवांच्या कडाबिंदवाल्यांचे तुह्मी मुख्य व्हा व त्यांना बरोबर घेऊन मारा सुरू करा आणि मीही आपले सर्व गोलंदाज बरोबर घेऊन, करतो तोफांचा भडिमार आणि त्या टोपीवाल्यांना जमीनदोस्त करून टाकतों!

**तात्याः**—शूरहो, तुमची कच्ची झाली असतां पुन्हां तुह्मी आपल्या जीवावर उदार होऊन शत्रूंशीं टक्कर देण्याकरितां तयार झालांत हें पाहून मला आनंदाचें भरतें आलें आहे! या तुमच्या कृतीवरून मला असें झालें आहे कीं, तुह्मांला मी कुठें ठेवूं आणि कुठे न ठेवूं. आज बरींच वर्षें तुह्मीं आपल्या समशेरी म्यांनांत ठेविल्याकारणानें त्यांना गंज चढला असेल तर, या शिखानष्ट विजारभटांच्या रक्तानें तो साफ

धुऊन काढा ! पहा, कांहीं दिवस आपल्या दुर्दैवानें आपल्यामध्यें दुफळया झाल्यामुळें, आपण पारतंत्र्याच्या जाळयांत सांपडतों कीं काय, असें वाटूं लागलें होतें; परंतु आतां आपण सर्व एक झालों आहोंत, तेव्हां या गौरकाय परद्वीपस्थ मारवाड्यांनां या देशांतून हुसकाऊन लावायला उशीर तो किती ! उसाचें शेत दिसलें कीं, कोल्हे यायचेच; परंतु उसाची फार नासाडी होऊं लागली कीं, शेताच्या मालकानें कुत्र्यांची योजना करून त्यांना फाडून टाकलेंच समजा. सरदारहो, ही वेळ मोठी तरफदारीची आहे ! वारा आपल्या पाठीवर असून शत्रूंच्या तोंडावर आहे ! यामुळें आपल्या तिरंदाजांनां मारा करणें फारच सोपें पडेल व तोफांच्या माऱ्यानेंही शत्रूंच्या बाजूला सर्व धूम्रमय होऊन जाईल ! ह्मणून जलदी करा व लगट करून, द्या "हर हर महादेव" उडवून ! या वेळीं तुह्मीं आपली खरी कर्तबगारी दाखवून श्रीमंतांचें यश संपादन केलेंत तर तुह्मांला मोठमोठीं इनामें मिळून तुमचा मोठा जयजयकार होणार आहे ! चला, असेच चला ! हा पहा मी तुमच्यापुढें झालों !

**रामसिंगः**–हं चला शूरहो शत्रूंवर धावा ! मुधोजी, चला ! खरोखर हा भेकड मर्द जर

सौनपतपानपतच्या भयंकर प्रसंगीं असता तर, याची नुसती तो देखावाच पाहून गाळण उडाली असती ! चला आपण त्या इष्टुर फाकड्याचें डोकें छाटून आणून सरकार वाड्यावर लटकावून देऊं ! असें काय करता, चला ! ( त्यास ओढीत घेऊन जातो. पाटील व एक गोलंदाज असे दोघे राहतात )

पाटीलः-( गोलंदाजास) प्रसंग तर कठिण खराच ! पण उपयोग काय ? आपल्याला आपल्या सैन्याला जोर तर दिलाच पाहिजे. तो इष्टुर फाकडा मेला कीं झालें ! मग पाहतो इंग्रजांची काय शहामत आहे ती ! ( पाहून ) अँ हें काय ? सेनापती हरिपंततात्या तर शत्रूवर अगदीं पिसाळलेल्या वाघाप्रमाणें तुटून पडले ! खाशी, खाशी तात्या ! मघाशीं मीं त्यांनां मार देऊन पिटाळून लावले होते पण पुन्हा वरचढ करून आले काय ? थांबा नीचानों ! तुमची या देशांतून नामोनिशींच करून टाकतो ! ( एक हेर येतो )

हेरः—सरदार पानशे साहेबांनीं आपनास्नी तकुंडच बोलावलं है ! त्येनी असा तोफांचा भडिमार चालवला है किं काइ इचारायाला नग ! जकड तकड अक्षी धुराचा योकुच गोंधुळ होऊनशेनी ग्येला है ! टोपीवाल्याला काइबी आपलं लस्कार उमगात न्हाइ पगा !

**पाटील**:–तूं पुढें होऊन मी आलोंच ह्मणून सांग! घेऊंदे आतां त्यांचा समाचार! आज संध्याकाळपर्यंत त्या इष्टुर फाकड्याला ठार करीन तरच जिवंत राहीन! (पडदा पडतो.)

प्रवेश सहावा समाप्त.

---

## प्रवेश सातवा.

**स्थल**:–(पुरंदरगड. राजवाड्यांतील महाल.)

**पात्रें**:–(सवाई माधवराव पलंगावर निजले आहेत व नाना आणि बापू दोहों बाजूला सचिंत बसले आहेत असा प्रवेश उघडतो.)

**नाना**:–हेरांच्याकडून वेळोवेळीं बातम्या तर अति वाईट येतात. याला आतां काय करावें?

**बापू**:–टोपीवाला आतां आवरत नाहीं हें खास. आतां पुढली कांहींतरी व्यवस्था केली पाहिजे. तो एकदां पुण्यांत शिरला ह्मणजे फिरंग्यासारखी चोहोंकडे बाटवाबाटवी करून श्रीमंतांच्या मसनदीवर सुद्धां जाऊन बसेल. मोठा कठीण प्रसंग आहे.

**नाना**:–त्याबद्दल काळजी नको. शनिवार वाड्यांत कडबा भरून, तो पुण्यांत शिरला कीं, एकदम वाड्याला आग लाऊन देण्याची व्यवस्था पूर्वींच मीं करून ठेविली आहे.

बापूः-( आत्मगत ) काय भित्रा ब्राह्मण आहे ? राज्याचा मुख्य मंत्री ह्मणवितो. पण तोफेचा आवाज ऐकला कीं, धोतराची खराबी. असो. ( उघड ) बरें पण काल जोतिषी आला होता, त्यानें श्रीमंतांचे ग्रह वर्तवून ते विष्णु अवतार आहेत. असें प्रतिपादन केलें आहे. त्याचा कांहींतरीं अनुभव घेऊन पहावा असें मला वाटतें.

नानाः-सध्यां त्यांचें वय तें काय व अनुभव तो काय पहाणार ? ( सवाई माधवराव जागे होऊन पलंगावर बसतात. )

स. मा.:-काय नाना,बापू,तुमच्या मुद्रा इतक्या खिन्न कां दिसतात? असा कोणचा प्रसंग आला आहे.

नानाः-श्रीमंत, प्रसंग अति बिकट आला आहे. हेर ज्या बातम्या आणितात त्यावरून इंग्रज लवकरच पुण्यांत शिरून श्रीमंतांच्या वाड्यांत बाटवाबाटवी करणार व मसनदीवर बसणार. असें दिसतें.

स. मा.:- काय, पाटीलबोवा, होळकर, तात्या, पानशे वगैरे आमचे शूर सरदार लढाईला गेले असतां अपजय येणार ? कोठें आहेत ती माझी समशेर. ( समशेर काढून आपल्या भोंवतीं पडताळितात. ) झाला इंग्रजाचा मोड. ( शिपाई येतो. )

शिपाईः-बाहेर मोठ्या घाईनें एक हेर आला आहे.

**बापू**:—त्याला लवकर आंत धाडून दे. ( शिपाई जातो व हेर येतो. )

**नाना**:—काय बातमी आहेरे ?

**हेर**:—श्रीमंतांचा विजय झाला. इष्टुर फाकडा रणमैदानांतल्या एका कोठीच्या झाडावरून दुर्बिणींतून आपल्या सैन्याची स्थिति पहात असतां शूर पाटील बोवांनीं त्याच्यावर आडून शिस्ताई बांधून अशी नेमकी तोफ डागली कीं, तो टोपीवाला वानरासारखा धुप्कन् जमीनीवर छिन्नविछिन्न होऊन पडला. तो पडलेला त्याच्या सैन्यानें पाहिल्याबरोबर तें जें पळत सुटलें, त्याचा कांहीं सुमार नाहीं. पार घाटापलीकडे पनवेलच्या बाजूला पळूं लागले व आपलेंही सैन्य त्याचा पाठलाग करीत चाललें आहे.

**नाना**:—हे घे तुला मोत्यांचें पेंडकें बक्षीस.

**हेर**:—येतो सरकार. ( जातो. )

**नाना**:—कां बापु, जोतिष्यानें सांगितल्याचा दाखला आला कीं नाहीं ?

**बापू**:—नेहमीं असाच येवो ह्मणजे झालें. (आत्मगत) कावळा बसायला व डहाळी मोडायला एकच गांठ पडली, झालें. ( उघड ) बरें चला, अनुष्ठानें उठवायची वर्दी देऊन गणपती पाण्यांतून बाहेर काढला पाहिजे. ( पडदा पडतो. )

**अंक चवथा समाप्त.**

## अंक पांचवा.

### प्रवेश १ ला.

**स्थळः**— तळेगांव डोंगर पायथ्याचे रणमैदान.

**पात्रेंः**— अर्जुना नांगऱ्या. खदखदां हांसत पळत प्रवेश करितो.

**अर्जुनाः**— ( बराचसा हंसल्यावर ) कशी इचिभन ममइकर टोपीवाल्यांची अक्षी लांडगं तोड झाली ! आतां कवा जाउन् शेनी ये सम्द आमच्या बाम्नाप सांगतो असं झालया !

**तात्याबाः**- कार, ये ल्योका अर्जुना, कार नांगर सोडूनशेनी लइ बिगिबिगि धावतो हैस ! अर नांगर धरायचा न्हाय व्हय ? (पुढें येतो.)

**अर्जुनाः**— मंग आताच काय त्येचं ! त्ये तर ल्योका रोजचचंच हाय ! लइ आलाया तत् म्हन अदुगर नांगार धर ! अरे ल्योका तातिच्या, त्ये इंग्रज पनवेलीला पळूनशेनी गेले, अन् तथं आपल्या पाटिल बोवानीन् शेनापतींनी त्यांस्नी पकडलं है म्हून अक्षी गुळचाट बातमी मास्नी आतांच कळ्ळी. तवा लेका आनंद न्हाय व्हनार व्हय ? पर

येपग त्या कवटीच्या झाडावरून त्या टोपडयाला कसा अक्षी वानरावानी धूप्कन् पाल्डा येतरी तुला झाइत हाय ? छेः ल्येको तुमास्नी काय त्येचं ? शिरिमंतांचा इजव झाला ही बातमी वंगाळ हायेना, म्नन म्नन !

तात्याबाः—कां लइ तोंड सोल्ड हैस ? परवां रातीच इसरलास व्हय ?

अर्जुनाः— अर जा मला मुजारी दावतोस व्हय ? मस्त पगितलं हैती तुज्या वानी ख्वाकडं ! मला बाम्नाचं भ्या दावतोस व्हय ! अर योकदाका शिरिमंतांचा इजव झाला म्हून बाम्नास्नी जाउनशेनी कळावल कीं, मला इनाम मिळालच म्हून समज ! मंग काय ? चाकरी कोनचा ल्योक करनार ? मंग घेइन इकत योक घोडा ! मंग करीन योक बाइल ! अन् मंग काय तात्या, हा अर्जुना जनु राजाच ! इचिभन ! ( हंसतो. )

तात्याबाः— अर त्ये व्हाउद्येरे ! अदुगार काइबी न्हेरीला काढ ! पोटामंदी भुकेन पग कसं तोडतोडु घेतलं है ! अर काइबि काढना ?

अर्जुनाः— काय म्नतोस ! न्ह्येरीला व्होव व्हय ? मगाचा तूंचका ? येच्ये ( गुद्दा मारतो व दोघे मारामारी करूं लागतात. तों अर्जुनाचें भाकरीचें गाठोडें खालीं पडतें तें गणु गडी येऊन खाऊं लागतो व म्नणतो. )

**गणु**:– कार भडव्यो इक्त हात घाईवर कशा पाइ आलात? चला सोडा! गाडवावानी लाथाळं काय करता! त्येपगा फाक्ड लावन्या ह्मननार आलं हैत. ( त्यांस सोडवितो व आपली भाकरी तिसऱ्यानेंच खाल्ली ह्मणून अर्जुना खिजतो. )

**अर्जुना**:–मंग हत का है! त्यास्नी चावडीप घेऊनशेनी जाव का न्हाय? त्यास्नी बक्षिशी द्येऊं व्हय! ही घ्यार! ( असं ह्मणून गणुस मारतो. )

**गणु**:–आनिक का योक लाइनास! भाकर तर खाया गवासली!

**तात्याबा**:–अक्षि खरं ह्मंगालास गन्या! पन योकांदी छक्कड म्हनून घेना हत! अपुनबी ऐकुं! बसा राव! त्येकांना वाइच ढुंगान!

**गणु**:-मंग त्येंच काय जातं! त्येंचं कुठं न्हाय हाय! यार या समद हाक्ड या! व्हउद्या योक हत. ( लावणी वाले येतात व लावणी ह्मणतात. )

॥ **लावणी** ॥

॥ अर्ध राज्यतें घेउनि इंग्रज गादि हो
द्येनार ॥ राघु भरारी मर्द आमुचा गादिप
बसनार ॥ जी ॥ पेशवाई ती इंग्रज घुसुनी
पोकळ करनार ॥ ग्रिह कलव्हानें सम्दि
राशत परका खानार ॥ जी ॥ चिन्ह वाइट
किरित्यानीया रांगुळि उडनार ॥ राज्य ब्रिक्ष

तो सम्दा जळेल न्हाइ पुन्हा दिसनार ॥ जी ॥
वस्ताद मोठे टोपिवाले हे फितुरी करनार ॥
उग्गा राव हो अजून नथ्या ह्मार करी हा
हुशार ॥ जी ॥

गणु:—कां अक्षि चटकदार हाये का न्हाय ?

तात्याबा:—अक्षि फाकडी बगा!

अर्जुना:—अन् येनं इनाम मिळल्या बिगार न्हानार व्हय ?

गणु:—बरं चलारे गड्यो! आमच्या दादोबा नायकाप चला!

( जातात. )

प्रवेश पहिला समाप्त.

---

## प्रवेश दुसरा.

**स्थल:**—( वडगांव. दादोबा नायकाची ओसरी. )

**पात्रें:**—( दादोबा नाइक कुळकर्णी, हिशोब करीत बसला असतां एक महार येतो. )

**दादोबा:**—काय त्रास आहे शिंचा! या ओसरीवर बसलें ह्मणजे या माशा कशा आंग तोडतात!

म्हारकु:-जोहार नाइकसाब ।

दादोबाः-अरे वरंडयाजवळ कां उभा, वर ये, असं, असं, बरोबर आहे । कायरे झस्क्या, कां आलास ?

म्हस्कु-नाइकसाब, हिसाब करून घाण सोडंवाया करता म्हून आलों है ।

दादोबा-मग आतां काय त्याचें ? मी हिशेब करून ठेवीन, मग दोन प्रहरीं ये जा. मला आतां काम आहे ।

म्हस्कुः-मी जातों, पन् मास्नी काइबी द्येवं । घरामंदीं खाया योकबी दाना न्हाय । पोरं कशी इवली इवली चिमनीवानी तोंड करून बसली हैती ।

दादोबाः-मग तुझें ह्मणणें काय । पैसे पाहिजेत ? कांहीं ठेवायला आणलें आहेस का ?

म्हस्कुः-( आपल्याशीं ) पगा, या कुळकर्ण्यांची कर्नी ह्मंजि अक्षि यमकर्नी हाये । घाण ठेवून ठेवून म्या आपलं सम्दं घारदार येच्या घरामंदी जिरावल । अन् अजून ह्मनतो कीं, काइबी आनल हैस का ? फाय कराव आता हत ? ( उघड ) नाइक, मी काइबी आन्ल न्हाय । द्यानात हातावर ।

दादोबा-हो अन् मग दाखविनस काढून वर । तुझ्या काय बाचें गेलें । श्रम मला करावे लाग-

तात ! पण तसें कशाला ! आतांच तुझा हिशोब करूं ह्मणजे झालें ! पंचाइत कशाला ?

म्हस्कु:–मग तर लई ब्येस झाल ?

दादोबा:–( चोपडी काढून ) हं हें पहा ! सोळा रुपये किंमतीचें गहाण ठेवलेलें रुपेरी गोठ नग आठ ! त्यावर माझ्या पासून सात रुपये आठ आणे नेलेस. त्याचें व्याज दरमहा दर शेंकडा रुपाया एक. आतां दिवस किती झाले मोज. आषाढ वद्य अमावास्येला ठेवलेंस ! मग किती दिवस झाले ? अरे चालू महिना कोण ? कार्तिक। आज तीथ कोण ? शुद्ध प्रतिपदा ! मग किती दिवस झाले ?

म्हस्कु:–त्ये समद आपुनच करा ! मास्नि काइबी उमगत न्हाय ! आपुन कराल त्ये अक्षी परमान ! त्ये इशी संशव इक्ताबि घ्येनार न्हाय ?

दादोबा:–बरें हे बघ! आषाढ वद्य आमावास्या! ह्मणजे आमावास्या हा महिन्याच्या शेवटचा दिवस. ह्मणजे एक महिना झाला किं नाहिं ? आतां श्रावण दोन, भाद्रपद तीन, अश्विन चार नि कार्तिक पांच ! बरोबर पांच महिने झाले ? आतां व्याज रुपयाला पैसा ह्मणजे सात पैसे उघड झाले ! बारा आण्याचा पाउण पैसा, ह्मणजे एक महिन्याचें बारा पावणें दाहा पैसे अन् पूर्वीचे सात ह्मणजे सतरा पैसे महिना व्याज !

ह्मस्कु:–नाइक, रुपये दिलं पावणआठ अजी व्याज त्येचं जादा कस झाल ?

दादोबा:–ऐकुन तर घे ! एका महिन्याचे सतरा ह्मणजे पांच महिन्यांचे किती ? अरे सतरा पाचीं शंभर. अन् पहिले मुद्दल रुपये पावणे आठ. शंभराचें काय झालें एक रुपया दाहा आणे. त्यांत मिळविले सात रुपये बारा आणे. एकंदर आतां झाले ९।– आणे. बघ आतां सतरा बितरा जास्त कांहीं आहे ? मूळ रक्कम ७॥ रु० अन् जास्त झाले व्याजाचे १।–. अन् ह्मणे जास्त झाले ? देतोस रुपये ! देत असलास तर डाग परत देतो !

ह्मस्कु:-(आत्मगत) मगा येका बाम्नापुन हिसाब केला तवा आठ रुपये दाहा पैसे अन् योक दमडी होते म्हुन सांगितली अन् यो सोदा ह्मनतो कीं नऊ रुपये सा आनं झाल ! इक्त पैस कंदीबी व्हनार न्हाय ? येच्या मंदी काइबी लुच्चेगिरी हाय ! सोनार, शिंपी अन् ये कुळकर्णी येंच्या संग कंदीबी येव्हार करू नये ह्मनतात त्ये अक्षी खरं हाये पगा ! (उघड) नाइक येतो जोहार ! (जातांना) बाम्ना कंदीबी घावशील योकला ! आज माज्या पोटास्नी उपाशी मारतो हैस ! जरना तुला येच्या बद्दल टक्कुर फोडण्याची बक्षिशी देईन

तर हा ह्मस्क्या, ह्माराचा बच्याच न्हाय.( जातो व अर्जुना, तात्याबा, गणु, पवाडेवाल वगैरे येतात. )

**अर्जुना**:—नाइक, ये पवाड ह्मननार आल हैती! लावन्या, पवाड, कटाव कस सम्द आक्षि चटकदार ह्मनत्यात!

**दादोबा**:-तुला कोणी हा धंदा सांगितला होता? अन् नांगर सोडून का आलास? कालच रात्रीं बदडलेंना? हात कोडग्या! निर्लज्य कारटं!

**अर्जुना**:—तसं न्हाय नाइक! पण आपल्या शिरिमंतांचा इजव होऊन टोपीवाल पनवेलीला पळत ग्येल म्हुन कळावन्या करतां आलों!

**दादोबा**:—अँ अन् खरें किंकाय? शाबास पाटिल बोवा शाबास! ह्मणारे ह्मणा एक या तळेगांवच्या लढाईवर पवाडा ह्मणा! तयार केलाच असेल! तुम्ही ह्मणजे शीघ्र कवीच! हं करा सुरूं?

## पवाडा.

तुह्मि ऐका राव पवाडा। गाइन थोडा।
लागला लढा। लढाईचा। अन् राव वड-
गांवच्या झुंजाचा ॥ जी ॥ त्यासि परथम
कारन। मिळना गादी दादान। ह्मनुन इंग्र-
जाप मदत मागुन। जाउं ह्मण योकदा
कुस्तीला। अन् घेउं शिकस्त टोपड्याला
र ॥ जी ॥ १ ॥ अन् मंग काय झाल॥ ममइ

केर टोपिवाल । उतरुन बोरघांट आलं । पांच हजार सैन्य सहि भालं । अन् पायथ्याप तळ देउन राहीलं व्ह ॥ जी ॥ ॥ २ ॥ कळलिर बातमी ही नानाला । त्योनि पाटिल बोवाना सवाल केला । ऐकून चल्डा मर्द लई कुरुधाला । अन् लागला र अस्तन्या सारायला र माझिया दादा व्ह दादा ॥ जी ॥ ३ ॥ मंग पाटिल बोवानी । चार वाटा रोखुनी । होळकर दीधला वर बीनी । सात तोफा तशा संगीनी । अन् धेऊं लागले टकरा जोरानीं ॥ जी ॥ ४ ॥ योक कडव्याचा आकार झाला । पैसा पडन वाघोबाला । पल्डि कोरड लइ नरडीला । तुनतुन लागल र कुचमायला । अन् लागलय ढुंगन दिसायला र माझिय दादा व्ह ॥ जी ॥ ५ ॥

॥ चौक दुसरा ॥

भिवराव यशवंत पानशे । सेनापति तात्या मर्द खासे । अवतरले जनु देव भासे । चार टकरामाजी । कच्चि खाउनी । मनी लागल तळपाया पान्याविन माशेरे ॥ जी० ॥ १ ॥ मंगं पाटिल बोवा चातुर । जाउन त्योनि झुंजावर । दिली जंगि टक्कर । तळ्याच्या

म्होर । तळ्याच्या म्होर । अन् भरारा पडुं लागल सत्रु सार व्ह ॥ जी० ॥ २ ॥ शिकस्त करुन अखेरीला । राव इष्टुर फाकडचाला । घालुन गोळा पाडला धरणीला ॥ जी ॥ ३ ॥ सम्दा गोंधुळ योकुच झाला । धीर सूटला । इंग्रज सैन्याला । तवां पळु लागल । पळ काढुन पनवेलीला गेल व्ह ॥ जी० ॥ ४ ॥

**दादोबाः**–जारे अर्जुना यांना एक मापटेंभर दाणे घाल जा ।

**नथ्याः**–योकच माप भर ?

**दादोजीः**–आणखी काय द्यायचें

**नथ्याः**–ववाळतो, ववाळतो । योक माप्टभर । काइ मुंडास बिंडास तर खर । अन् ह्यन योक माप्टभर घे । कार इटल्या मुंडास पाहिजे का नग ।

**इटल्याः**-अक्षि खरं मंगाला नथ्याजी हंबीर ।

**दादोजीः**–चल जा । ज्यास्त कांहीं एक मिळणार नाहीं । पाहिजे तर दाणे घे । नाहीं तर चालता हो । जारे, अर्जुना, तात्याबा, गण्या । तुह्माला लेको आज सुट्टी । जा आपआपल्या घरीं । मी जातों आतां स्नानाला.

**नथ्याः**–चलारे या बाम्नानी काय द्येव । जाऊ आतां पुन्याला न् हंनु बक्षीस चला. ( जातात ).

## प्रवेश तिसरा.

स्थलः—खबुतरखान्यापासला बापुंचा वाडा.

पात्रेंः—सखारामबापु ( विचार करीत बसले आहेत. )

बापुः—आजपर्यंत मी दादासाहेबांचा पक्ष धरून त्यांना पेशवाईची गादी प्राप्त करून देण्याकरितां गुप्त कारस्थानें करून नारायणरावांच्या वधा सारखीं हजारों अनुचित कृत्यें केली. अभेद्य व्यूह रचले व आश्रांत झगडलों; परंतु या तळेगांवच्या परवांच्या लढाईवरून सर्वच ओंफस् झालें अँ ! सुरत मुक्कामीं जरी कच्ची झाली तरी वडगांवीं सरशी होईल हा माझा अंदाज अगदींच चुकला काय ? या लढाईंत दादांना जयश्रीनें जर माळ घातली असती तर मग नाना, या सखारामबापूनें तुह्मां सर्वांचीं पाळें मुळेंच खणून काढिलीं असतीं ! पण आतां उपाय काय ? अजून तुमची सद्दी आहे ! बरें पण आतां काय बरें युक्ती काढावी ! ( थांबून ) हं ही एक आहे ! जमली तर पहावी ! ( विचार करून ) कसें बरें करावें ! हो, असेंच ! प्रथम दादांना असें एक गुप्त पत्र लिहायचें कीं जो हाडाचा खरा ब्राह्मण आहे, तो, जरी त्याला हीन दशा आली, तरी, आपल्या हुजऱ्याच्या अटकेंत राहुन, गुलामासारखा बांदिवान होईल

आणि मिळेल तेवढा तुकडा चघळीत परावलंबन करून कधींहीं राहणार नाहीं. तर हरप्रयत्नानें निसटून जाऊन आपला इच्छित हेतु साधण्याच्या तजाविजीला लागेल! बस्स, ठरला बेत! असेंच करायचें। दादासाहेब, या मजकुराचें पत्र, आपल्याला पोंचल्यावर आपण तेथून पलायन केलेंत कीं, माझें काम झालेंच। एकदां आपण निसटून गेल्यावर पुन्हां इंग्रजांची मदत घेऊन यांच्यावर चढाई करून यायला तो किती उशीर। बरें एकंदरींत ही माझी मसलत किती बरें निंद्य आहे! आपल्या हातांनीं आपल्या घराला आग लावली असें नाहींका यापासून होणार। पण, उपाय काय! अपमान कुणी सहन करावा! बाह्यंतरी जसा मी नानांशीं वागतों आहे तसा आंतूनही वागतों तर काय बहार झाली असती। पण तसें कुठलें व्हायला! ज्याला त्याला अहंपणा! खरोखर नानांचें व पाटिल बोवांचें वर्तन असें मानभावी-पणाचें नसतें तर, मी तरी अशा नीच खटपटी करून आपणा स्वतःला सर्व जगाचें निंदावसति-स्थान करून घेतलें असतें का? ज्याअर्थी आज-पर्यंत दादासाहेबांची एकनिष्ठपणें, मनोभावानें सेवकाप्रमाणें मी चाकरी बजावली, त्याअर्थी त्या भोळ्या रणवीराचे सर्व हेतु सफल होऊन त्याला

सदोदित सुख होईल, असेंच शेवटपर्यंत वर्तन ठेवणें मला इष्ट आहे! तर आतां आपण ठरविलेल्या उद्योगास लागावें! कारण, हीच वेळ मोठी महत्वाची आहे! तह होऊन एकदां का दादासाहेब पाटिल बोवांच्या स्वाधीन झाले कीं, मग आमच्या नाडींच्या थंडच्या पडल्याच! माझी गुप्त कारस्थानें आताशीं बाहेर फुटूं लागलीं आहेत व मी सर्वांच्या डोळ्यांवर आलों आहे, मग काय ऐशीं तेथें पंचायशीं! ( जातो. )

प्रवेश तिसरा समाप्त.

## प्रवेश चवथा.

**स्थल**:-दिवाणखाना.

**पात्रें**:-पाटिलबोवा ( विचार करीत बसले आहेत. )

**पाटील**:- हाय हाय अवदसे नूरजहान, माझ्या लाडकीला विषप्रयोग करून ठार केलेंस ऑं! रांडे, कैदेंतून पळून जाऊन तरी वांचायचें होतेंस? वाटेंत चोरव्यांनीं तुझा उपभोग घेऊन तुला ठार केली! खरोखर फार उत्तम झालें! ईश्वरानें तुला योग्य प्रायश्चित्त दिलें! पण लाडके पार्वती, तूं आतां मला कशी भेटशील? हर, हर! कोण हा भयंकर प्रसंग! फितुरी करून माझ्या वैभवसागराला ओहटी लावणार होतीस

नाहीं ? पण लाडके, आतां या माझ्या वैभवसागराची भरती कोणग पाहील ! आजपर्यंत तूं माझ्या ठिकाणीं ठेवलेली अखंड प्रीति आज लयाला गेली ना ? अरे पण मी हें काय चालविलें आहे ? मी येथें कोणच्या कारणाकरितां आलों आहे ! तह करण्याकरितां नां ? मराठेशाही पालथी घालण्याकरितां, अस्तन्या सारून कंबरा बांधून तयार असलेल्या हैदर निजामासारख्यांच्या अनिवार्य पेचांचा हाणून पाडाव करून टाकिला. मग विनाकारण देशाभिमानाच्या व बुद्धिबलाच्या जोरावर अजिंक्यपत्रें मिळवीत आलेल्या इंग्रजांची ती काय कथा ! मराठी राज्याचें मोडकळीस आलेलें तारूं, अफाट दर्याच्या खोडसाळ खडकांमधून मोठ्या चातुर्यानें व दक्षतेनें आपल्या बंदरांत आणून सोडण्यास नाना व तात्या यांच्यासारखें कर्णधारी आमच्या पक्षाला असल्याकारणानें तें कसें आतां सुखरूप येऊन पोंचण्याच्या बेतांत आहे ! पण हे इंग्रजरूपीं मगर मध्येंच त्याला आडवून बुडवूं पहाताहेत; परंतु त्यांची ती शक्ति किती ? आतां हें तरीं खास ठरलें कीं आह्मां मराठ्यांवर इतउत्तर कसलीही व कितीही पर्वतप्राय अनिवार्य संकटें येवोत, आमची केवढीही हानी होवो, किंवा आह्मीं

कशाही कचाट्यांत सांपडो, परंतु, पूर्वस्थिती थोडयाबहुत फेरफारानें कां होईना प्राप्त करून घेण्यास कधींही मागेंपुढें पाहणार नाहीं. कारण, झालेली जखम भरून काढणें हेंच जिवंतपणाचें लक्षण आहे व झालेल्या आणि होत असलेल्या दुःखाचें परिमार्जन करून आपलें नष्टस्वातंत्र्य परत मिळविणें हेंच आह्मां मराठ्यांचें ब्रीद. साडेसातीचा फेरा जोंपर्यंत असतो तोंपर्यंत मनुष्य नेहमी विपत्तींतच असायचा! तद्वतच आह्मां मराठ्यांची स्थिति झाली होती! जें मराठी राज्य, तीन चार वेळां टक्कर खाऊनहीं पुन्हां उदयाला आलें व पुन्हां जरीं नष्ट झालें तरीं त्याचा विजयसूर्य आपल्या किरणांनीं पूर्ववत कधींनाकधींतरीं चमकूं लागणार हें खास! असें असतां त्या राष्ट्रांत जोमच नाहीं. धूर्त, अक्कलवान व शूर पुरुषच नाहींत आणि तें कधींहीं जगांतल्या इतर राष्ट्रांशीं बरोबरी करणार नाहीं असें ह्मणणें ह्मणजे केवळ आपल्या अकलेचा टेंभा मिरविणें असेंच नाहीं का होणार? परमेश्वरा, आमच्यामध्यें अशीच एकी दृढ ठेवून या नवीन परंतु जुन्याच इंग्रज शत्रूंचें पारिपत्य करून त्यांना या भरतभूमीवरून पिटाळून देण्याची ईर्षा व हुरूप आमच्या लोकांच्या

मनांत पूर्णपणें वसेल असें कर ! ( एक शिपाई येतो. )

शिपाईः—सरकार, इंग्रजांचा वकील फारमर साहेब, नानासाहेब, सरदार पानशे, दादासाहेब, बापुसाहेब, सेनापती साहेब वगैरे सर्व मंडळी इकडे येण्याकरितां निघाली आहे, अशी वर्दी आली आहे.

पाटीलः—जा, आपल्या हलकाऱ्यांना व दिवाण साहेबांना सांग कीं, व्यवस्था नीट ठेवून त्या सर्व मंडळीस मोठ्या आदबीनें आंत घेऊन या ! ( शिपाई जातो ) बस्स ! आतां माझ्या मध्यस्तीनें हा वडगांवचा तह फारमर साहेबाकडून करून मुत्सद्दीपणाबद्दल एकेचाळीस हजार रुपये रोख व बक्षिशीदाखल भडोचपरगणा आणि हें सर्व मिळेपर्यंत दोन टोपीवाले ओलीस ठेवून घेतले ह्मणजे झालें आपलें काम ! मग काय, पुण्याच्या दरबारी मंडळीवर माझी छाप बसल्या सारखीच आहे. ( पडद्यांत आस्ते कदम मुलाजा वगैरे दरबारी तऱ्हेची आरोळी होते ती ऐकून उठतात व ) आली वाटतें सर्व मंडळी ( असे म्हटल्यावर, वर निर्दिष्ट केलेली मंडळी येते. त्यांस योग्य जागांवर बसवून, सन्मान पूर्वक सर्वांचें अभिनंदन करितात. )

नानाः—सरदारहो, आजपर्यंत आपल्याशीं या मुंबईकर टोपीवाल्यांनीं, दादासाहेबांचा पक्ष धरून

ज्या ज्या अनन्वित ह्मणजे, साहाकारी राष्ट्रांचे नियम उल्लंघून गोष्टी केल्या, आह्मां मराठी पादशाही तक्ताला विनाकारण त्रास दिला व पुरंदरच्या वगैरे इतर तहांना झुगारून देऊन जें नीचपणाचें वर्तन केलें, त्याचा शेवट नुकताच कांहीं दिवसांपूर्वीं तळेगांवानजीक झालेल्या लढाईवरून झाला. व त्यासंबंधीं आज आपण या ठिकाणीं सर्वजण तह करण्याकरितां जमलों आहोंत हें विदितच आहे. तेव्हां आतां श्रीमंतांच्या गादीच्या हुकुमाप्रमाणें शूर मुत्सद्दी पाटीलबोवांस मध्यस्त घालून तह करवूं. ज्या अटींवर तह करावयाचा, तीं कलमें आतां ते वांचून दाखवितील! मुंबईकरांकडून फार्मर साहेब या नांवाचे जे हे वकील तह ठरविण्याकरितां आले आहेत, त्यांजकडून या तहनाम्यावर, त्यांना तो पटला ह्मणजे त्यांची सही होईलच. असो. आतां शूर पाटिलबोवा आपलें काम हातीं घेतील!

पाटीलः—श्रीमंतांनीं, खरें पाहिलें असतां, मी त्यांचा जोडेराखु हुजऱ्या, त्या मला एवढें जोखमीचें व मुत्सद्दीपणाचें काम करण्यास लाविलें आहे, याबद्दल त्यांचे माझ्यावर किती उपकार आहेत! हे उपकार या शरीराच्या चामड्याचे जोडे केले तरी फिटणार नाहींत! असो. आतां साहेबांना

मी एवढेंच विचारतों कीं, आपण श्रीमंतांशीं तह करण्यास कबूल होऊन येथें आला आहांत, तेव्हा आपली संमत्ति आहे असें सिद्धच होतें!

**फारमरः**—युवर लार्डशिप्, हमी टो आप बोलेल टे सम्दा बनानेकू टयार हाय! हामी अक्षी ईल्ड आला है! बट हमी रेडी असूनशेनी फायदा क्या? आपके डाडासाब बोलटे कीं, ईल्ड नहीं होना! और युवर कम्यांडिंगसाव टाट्यासाब फरके बोलटे कीं, टुमी सर्व इंग्लिशलोक एकदम दो महिनेमें इंग्लंडकु एकदम जाव. इस देसमे बिलकुल रहेना नहीं! युवर लार्डशिप्, ऐसा कैसा होईल?

**पाटीलः**—सेनापती साहेब, सध्यांच्या वेळेपुरता आपण धरलेला हट्ट सोडाल अशी मला आशा आहे. कारण, आपण एकदम यांच्याशीं तसें वर्तन केलें तर होऊं शकेल. परंतु, यानें जगांत आपलें हसूं मात्र होईल! शिवाय हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणें ह्मणजे त्यांत कांहींच अर्थ नाहीं. याकरितां मी ह्मणतों कीं, सध्यां तहच करूं; आणि नंतर यापुढें त्यांचें वर्तन पहिल्याप्रमाणेंच कायम राहिलें, तर मग यांचा प्रतिकार करून यांना पिटाळून लावण्याला तो किती उशीर? कसें सरदार पानशे साहेब?

**पानशे**:—आपल्या व नाना साहेबांच्या मताप्रमाणें जें ठरेल त्याबाहेर मी मुळींच नाहीं. सेनापतीसाहेबही त्याचप्रमाणें कबूल होतील अशी मला उमेद आहे!

**तात्या**:—माझें असें ह्मणणें आहे कीं, साप हा आपल्या जातीवर जायचाच! ह्मणून ह्मणतो कीं, वेळींच सावध असलेलें फार बरें. नाहींतर आपल्या पुढच्या पिढीला याबद्दल विनाकारण त्रास सोसावा लागेल! ह्मणून ह्मणतों कीं, आतां जी आयती संधी आली आहे ती न दवडतां, त्वरित यांना स्वदेशीं पिटाळून लावावेत!

**नाना**:—तात्या साहेब, आपलें ह्मणणें खरें आहे; परंतु एकानें वासरूं मारिलें असतां दुसऱ्यानें गाय मारणें जसें, तसेंच या कृतीनें राज्यनीतीला अगदींच झुगारून दिल्याप्रमाणें होणार आहे. यांत कायतें समजा! तुमचा अंतरभाव येथें कोणालाच कळत नाहीं असें नाहीं. पण तसें करण्याची ही वेळ नाहीं.

**तात्या**:—बरें कांहीं हरकत नाहीं. आपल्या ह्मणण्याला माझी सला आहे. पण मी एवढें खात्रीनें सांगतों कीं, ते लोक दांतीं तृण धरतील, तोंडा-पुरतें हवें तितकें, मागें केलेल्या तहांप्रमाणें, तहनामे करतील, काय वाटेल तें करतील; पण दुसऱ्याचा जराका पडता काळ दिसला कीं, माने-

वर सुरी ठेवण्यास कधीं मागें बघणार नाहींत. असो. करा सुरू आपलें काम ! असेंचना बापु ?

**बापुः**–हो तर कायहो ! निव्वळ खाटीक आहेत खाटीक ! (आत्मगत) सध्यां तुमच्या तोंडापुरतें गोड बोलूनच सोन्याची सुरी तुमच्या काळजांत घातली पाहिजे ! दशा तह करून सध्यां. पाहूं पुढें.

**पाटीलः**–ठीक आहे. वकीलसाहेब, आतां आह्मीं तहनाम्याचीं कलमें वाचून दाखवितों. (वाचितात)

**कलम १ लें**:–साष्टी वगैरे मुलूख व गुजराथें-तील गायकवाडांचे व पेशव्यांचे महाल इंग्रजांनीं घेतले आहेत ते सोडावे.

**कलम २ रें**:–दादा साहेबांस, किंवा मराठी राज्याच्या दुसऱ्या कोणच्याही शत्रूंस इंग्रजांनीं मदत करूं नये व दादासाहेबांस बिनहरकत आमच्या ताब्यांत द्यावें.

**कलम ३ रें**:–मुंबईकरांच्या मदतीस कलकत्या-हून फौज येत आहे ती परत फिरवावी.

**कलम ४ थें**:–अंतरवेंदी व बुंदेलखंड या प्रांतांतील राजेरजवाडे पूर्वींपासून पेशव्यांच्या अमलाखालीं आहेत. त्यांना उपद्रव देऊं नये.

यां प्रमाणें आमचीं कलमें आहेत ! हीं सर्व तुह्मांला कबूल आहेत ? असतील तर सही करा !

फारमरः—ये पैकीं दुसरा कलम हमे कुबुल न्हाय !

दादा:—आग लाव त्या तुझ्या दुसऱ्या कलमाला. मी होऊन आज पासून तुमच्या ताब्यांत आलों आहे. पाटीलबोवा, आतां तुह्माला माझें काय करणें असेल तें करा ! त्या माकडाला काय पुसतां ?

पाटील:—मग कसें काय ? पुन्हा लढाई करायची असेल तर तयार हो !

फारमरः—नहीं, नहीं ! आटां हम लढाई करेल टो मरेल !

पाटील:—तर मग सही करा !

फारमरः— Allright ! आबी हमारी कुछ तक्रार नहीं. करटे ह—ह—ह हमी सिग्निचर ( खालि· त्यावर सही करून गुढघे टेंकून कागद पाटीलबोवांच्या स्वाधीन करतो. )

पाटील:—या देशाचे खरे मालक आह्मी मराठे. असें असून, या परद्वीपस्थांनीं आमचें राज्य घशांत टाकण्याचे जे अनेक उपाय चालविले आहेत, ते, इत—उत्तर कायम न ठेवितां, गरीबीनें, इतर साहाकारी राष्ट्रांच्या नात्यानें वर्तन ठेवून, आमच्याशीं बंधुप्रीतीनें राहावें यांतच त्यांना भूषण आहे. असें,

हे वकील साहेब कंपनी सरकारास आमच्या तर्फे कळवतील अशी मला पूर्ण आशा आहे. आमचे हिंदुलोक पलटणीमध्यें चाकरीस ठेवून त्यांनाच त्यांच्या देशबांधवांवर हत्यारें उपसावयाला लावावयाची ह्मणजे केवढा मूर्खपणा आहे! सध्यां, पलटणींत राहूं इच्छिणारे सर्व हिंदू जर आह्मीं आपल्याकडे नोकरीस ठेविले, तर, इतका खर्च झेंपणें आह्माला फार कठीण आहे! दुसऱ्या कोंणच्या तरी रीतीनें त्या सर्व लोकांस यांच्याकडे जाऊं न देतां पोसले असते, पण सध्यां तशी वेळ नाहीं. असो. आतां शेवटचें माझें कर्तव्य हेंच कीं, सध्यांच्या प्रसंगीं कंपनी सरकार ह्मणजे हेच साहेब, तेव्हां त्यांच्या चालीप्रमाणें एकमेकांच्या हातांत हात घालून मैत्री झाल्याबद्दल आभार प्रदर्शित करणें होय! तेव्हां आतां श्रीमंतांच्या तर्फे नानासाहेब, यांच्या हातांत हात घालून वकील साहेब मैत्रीच्या चिरकालत्वाविषयीं आभार प्रदर्शित करतीलच!

**फारमरः**— ( हातात हात घालून ) आय् दि रेप्रिझेंटेटिव्ह ऑफ् दि ईस्ट इंडिया कंपनी एक्स्प्रेस स्याटिस्फ्याक्शन ऍन्ड मेनि थ्यांक्स फ्राम दि बॉटम ऑफ धि हार्ट, फॉर दि काइंड फेव्हर ऑफ् अपॉलॉगाइझिंग अस, दो वुइ क्रॉस्ड दि रूल्स

ऑफ दि ब्रदर, बट सुपीरियर नेशन टु अस ॲन्ड ॲक्टेड एरोगंटली अगेन्स्ट दि पूना दरबार. ओ ग्रेशियस गॉड, आय सॉलेम्लि प्रे दी, द्याट दि रिलेशन ऑफ फ्रेंडशिप बिटवीन दीज टू नेशन्स एक्झिस्टिंग ऑन दि फेस ऑफ दि अर्थ, कीप हेन्स फोर्थ एव्हरलास्टिंग; ॲन्ड नो ब्रीच ऑफ फ्रेन्डशिप अलौ टु ह्यापन.
( दरबारांतील सर्व मंडळीला सलाम करून बसतो )

**नाना:**–श्रीमंतांच्या ह्मणण्याला मान देऊन आपण नम्र आलांत याबद्दल श्रीमंतांच्या तर्फे मी आपला फार आभारी आहें. आज पासून पुढें, आतां ठरल्या प्रमाणें आपण आमच्याशीं मैत्रीनें रहाल अशी आह्माला पूर्ण आशा आहे. ( हातांत हात घालतात. )

**बापु:**–(आत्मगत) आमच्या नाड्या या तहानें सध्यां तर थंड्या पडल्या ! बरें प्रभुसत्ता ! या बापूला अजून वैभव दाखवावयाचें असेल तर दादानां गादी देऊन. ईश्वर अजूनहीं तसें जुळवून आणील.

**पाटील:**-आतां दादांनीं जन्मपर्यंत मजजवळ राहून सुखानें दिवस काढावे असें मला वाटतें. मी तर पेशव्यांचा बोलून चालून हुजऱ्या ! तेव्हां यजमानांची बरदास्त ठेवण्यांत मी कुचराई करून

त्यांना दुःख देईन असें श्रीमंतांनीं मनांतसुद्धां आणूं नये. माझी जहागीर ती आपलीच असें समजून आनंदानें माझ्यापाशीं रहावें. आतां उदईक मी निघण्याची तयारी करणार आहे, तेव्हां सुभेदार होळकर साहेबही तसेंच करतील, व येथूली मंडळी श्रीमंतांना सुख देऊन राज्यकारभार मोठ्या आनंदानें करतील अशी मला आशा आहे. व या बद्दल ईश्वराला मी अनन्यभावानें शरण जाऊन त्याची दोन्ही हात जोडून प्रार्थना करितों.

बापुः—(आत्मगत ) तुह्मी सर्व आनंदांत आहांत. पण मी दुःखानें तळपतों आहे. तेव्हां ईश्वराची निंदाच करितों.

( पडदा पडतो )

**पांचवा अंक समाप्त.**

**समाप्त.**